

# हास्यरंगी रंगले

श्याम कुलकर्णी

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# हास्यरंगी रंगले

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# हास्यरंगी रंगले

## श्याम कुलकर्णी

# हास्यरंगी रंगले

**लेखक : श्री. श्याम कुलकर्णी**

पत्ता : द्वारा श्री. जयवंत कुलकर्णी, ''गन्धार''फ़्लॅट क्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे ४११०२९
संपर्क – व्हॉट्स ॲप क्र. ९७६५४५६५८१
Email : sgk6642@gmail. com

मुखपृष्ठ: श्री. मुकुंद कुलकर्णी, मुंबई

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १६ फेब्रुवारी २०२२ (माघ पौर्णिमा शके १९४३)

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री श्याम कुलकर्णी



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. 1975

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित.



**श्री. मुकुंद कुलकर्णी,** मुखपृष्ठाचे चित्रकार, हे लेखकाचेच दुसरे बंधु! हे प्रथम श्रेणीत अभियांत्रिकि पदवीधर होऊन निरनिराळ्या उद्योगात अभियंता म्हणून काम करून सेवानिवृत्त झाले आहेत. चित्रकलेचा छंद त्यानी बालपणापासून जोपासला आहे. त्यांच्या कौशल्याचा एक नमुना मुखपृष्ठासाठी वापरला आहे.

सध्या त्यांचे वास्तव्य मुंबईस शिवाजी पार्क भागात आहे.

# अनुक्रमणिका


दोन शब्द

१. माझा मराठाचि

२. माझा पहिला रेडिओ

३. धाडू नको बाजारी!

४. उंडे, दिंडे, मांडे आणि असेच!

५. विठ्ठल तो आला आला

६. किल्ली

७. पुनश्च हरी ओम्

८. हास्यरंगी रंगले

९. चोर येता घरा

१०. लाखमोलाची माणसं!

११.यज्ञोपवीतं परमं पवित्रं

१२. जावळ ते टक्कल

१३आम्हा सोयरी

१४. सख्खे शेजारी!

१५. पाककलेची ऐशी तैशी!

१६. ब्रह्माचा शोध

# दोन शब्द

हे ईसाहित्य कडून प्रकाशित होणारे माझे हे चौथे पुस्तक. यात निरनिराळ्या विषयावर स्वानुभव व इतरेजनांच्या अनुभवाची विनोदी पद्धतीने मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. “तुझी माझी जोडी” मधील अनुभवही विनोदी स्वरुपाचे आहेत पण त्यात मी व माझी पत्नी ही प्रमुख पात्रे आहेत, मात्र या पुस्तकातील बहुतेक लेखांमध्ये माझे पात्रच प्रमुख आहे तर काही लेखात मी स्वत:ही उपस्थित नाही.

“हास्यरंगी रंगले “ या नावाचा लेख ज्ञानेश्वरी वाचनानंतर मला सुचला. त्यात सर्व रसांचा परिपोष आहे असे सर्व विद्वद्जनांचे मत असले तरी त्यात हास्य रसही आहे असा उल्लेख कोणी केल्याचे आढळले नाही. आणि हे जाणवले व ते “ज्ञानेश्वरी” भक्तांच्या निदर्शनास आणावे अश्या विचाराने तो लेख लिहिला आहे हा लेख प्रथम मी माझ्या सर्व लेखनाप्रमाणे “मनोगत” वर ८ जुलै २००६ या दिवशी प्रसारित केला. ज्ञानेश्वर माउली “ज्ञानेश्वरी” सारख्या आध्यात्मिक पुस्तकातही केवळ गंभीरपणेच न लिहिता मधून मधून मिस्किल भाष्यही करत होते हेच दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

तीच गोष्ट “यज्ञोपवीतं परमं पवित्रं” या लेखाची! माझे वडील उत्तम कीर्तनकार होते व त्यावेळी आम्ही ज्या औन्ध संस्थानात रहात होतो त्या

संस्थानचे महाराज श्रीमंत बाळासाहेब पन्त हेही उत्तम संस्थानिक जसे होते तसेच उत्तम कीर्तनकार होते व त्यानी स्वत: उत्तम कीर्तने ‘‘कीर्तन सुमनहार’’ या ग्रंथात लिहिली आहेत व त्यात महाभारत, रामायण व शिवकाल यातील प्रसंगावर कीर्तने लिहिली आहेत, त्यांळेत त्या संस्थानच्या श्री. श्री. विद्यालय या शाळेत माझे वडील शिक्षक होते. ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, बॅ. अप्पासाहेब पंत, साने गुरुजी, अश्यांसारख्या विद्यार्थ्यांनी त्या शाळेत शिक्षण घेतले आहे. यातील पहिले तिघेही माझ्या वडिलांचे विद्यार्थी होते. वडीलांना कीर्तनाची गोडी व हौस असल्याने त्यानी स्वत: कीर्तने केली व लिहून माझ्या बहिणींकडून करून घेतली. संस्थानात आषाढ मासात दररोज कीर्तने राजवाड्यात होत व महाराज प्रत्येक कीर्तनास आवर्जून उपस्थित असत. माझ्या वडिलांच्या कीर्तनात सामान्य माणसांना रुचि उत्पन्न व्हावी म्हणून विनोदी आख्यायिका मधून मधून सांगितल्या जात. ’’यज्ञोपवीतं ----“ मधील फौजदाराचा प्रसंग त्या कीर्तनातून घेतला आहे. तसेच ‘‘ब्रह्माचा शोध “ मधील वाटीभर ब्रह्म ही कथा सुद्धा कीर्तनातून घेतली आहे.

याचा मुद्दाम उल्लेख करायचे कारण ‘‘यज्ञोपवीतं----“ लेख प्रतिलिपीवर प्रकाशित झाल्यावर त्यावर पावित्र्य विडंबनाचा आरोप एका वाचकाने केला आहे, पण हे कीर्तन जवळ पास ७५ वर्षापूर्वी महाराजांसमोर करण्यात आले होते व त्यावेळीच्या समाजातील कोणाही प्रेक्षकाने किंवा

स्वत: महाराजांनीही त्याकडे विनोद बुद्धीनेच पाहिले. म्हणजे आज समाज मानसिक दृष्ट्या उन्नत झालाय की मागासलाय याचाच विचार करावा लागेल.

कीर्तन हा एक सामाजिक शिक्षणाचा उत्तम मार्ग आहे हे गाडगे बाबा पासून अनेक कीर्तनकारांनी सिद्ध केले आहे. सध्या नुसत्या महाराष्ट्रात साडेतीन हजार प्रमुख कीर्तनकार असुन त्यात गोविन्दस्वामी आफळे, बाबामहाराज सातारकर, चैतन्यमहाराज देगलूरकर असे नामांकित कीर्तनकार आहेत.

या कीर्तनाच्या संस्कारामुळे कदाचित लिखाणाची प्रेरणा माझ्यात उत्पन्न झाली असावी, त्यामुळे हा लेखसंग्रह मी, उत्तम कीर्तनकार तसेच उत्तम शिक्षक माझे वडील कै. गजानन दामोदर कुलकर्णी यांना सादर अर्पण करतो.

श्याम कुलकर्णी

# १. माझा मराठाचि

अलिकडे मराठी भाषेतील बरेच शब्द नष्टच झालेत की काय असे वाटू लागले आहे अर्थात जेथे मराठी भाषाच आचके देऊ लागली आहे तेथे एक दोन शब्दांचे काय येवढे?

आता माडी हा एक शब्द कुठे दिसतो का? नाहीतर पूर्वी कसा 'माडीवर चल ग गडे जाऊ झडकरी 'असा ठुमकत यायचा. किंवा 'माड्या चढणे ' याला एक गहन अर्थ असायचा. आता पुण्यात एक माडीवाले कॉलनी सोडली तर माडीचा पत्ताच नाही. सगळीकडे सदनिका झाल्याचा हा परिणाम की काय? माडी पिणारेही नीरा (किंवा दुसरे काही) पिऊ लागले आहेत. त्यामुळे बिचारी माडी बेघर झालीय.

दुसरा असाच माझा आवडता आणि गायब झालेला शब्द म्हणजे चाणाक्ष. पूर्वी प्रत्येक कादंबरीत प्रत्येक पानावर एकदा तरी चाणाक्ष वाचक भेटायचे. आता वाचकच कमी झालेत हे खरे, पण चाणाक्षपणाचा तरी कळस झालाय त्यामुळे प्रत्येकजण प्रत्येक गोष्टीवर मत प्रकट केलेच पाहिजे अश्या हिरिरीने टिवटिव (ट्वीट ला हा प्रतिशब्द योग्य असावा) करत असतो मग त्या पद्मश्री कंगनाताई असोत किंवा वर्तमानपत्राचे फक्त पहिले पान

वाचणारे (आता त्यावरही जाहिराती असल्यामुळे तेही नाही) विक्रमजी असोत.

पण तरी चाणाक्ष या शब्दाला मात्र वनवासी व्हावं लागलय हे मात्र खरं!

काही काही मराठी वाक्यप्रचारही असेच वापरातून लुप्त होत चाललेत. माझ्या आईच्या बोलण्यात काही गमतिशीर वाक्यप्रयोग होते. महत्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून उगीचच बारीक गोष्टीकडे लक्ष देणाऱ्याला ती म्हणे 'मोरीला बोळा आणि दरवाजा मोकळा'. तर सगळ्याना काम करायला बोलावून काम मात्र नीट पार न पाडणाऱ्याला ती म्हणे 'ये ग साळू दोघ लोळू. 'मी कधीच कुठल्या कामात अडकत नाही असा तिचा दावा होता त्यामुळे ती मला 'लोण्यातला पावटा ' म्हणे.

एका बड्या मराठी दैनिकाच्या अग्रलेखाचे शीर्षक होते 'गाभण गाईला खंडीभर दूध. 'ते दोन तीन प्रकारे चुकीचे होते, एक म्हणजे गाभण जनावरे दूध देणे बंद करतात, दुसरे मूल म्हणीत गाय नसून म्हैस हे, आणि तिसरे खंडी हे परिमाण दुग्धमापनासाठी वापरत नाहीत. म्हणून मी वाचकाच्या पत्रव्यवहारात कळवणार होतो तेवढ्यात आणखी एका जागृत वाचकाने दुरुस्ती सुचवली की खंडी हे परिमाण दुधाला वापरत नव्हते म्हणून ते शंभर शेर दूध असे हवे, त्यानंतर तर खंडी, शेर या परिमाणाविषयीच चर्चा सुरू झाली कारण नुकतीच मेट्रिक पद्धती वापरात आली होती. शेवटी मी

त्याना पत्र लिहून कळवले की तो वाक्यप्रयोग 'मेल्या म्हशीला मणभर दूध' असा आहे. तरी बरं संपादक पु. ल. देशपांडे यांचे दोस्त होते आणि त्यानी “म्हैस” ही कथाही वाचली असणार, पण त्यावेळी पु. ल. स्वर्गवासी झाले होते नाहीतर त्यानी कपाळावर हात मारून घेतला असता.

शब्दांच्या लुप्त होण्यासंदर्भात मी सहज म्हटले किती शब्दांचा वापर आपण करत नाही पाहूया आणि ढवळ्यानी प्रकाशित केलेल्या दि न्यू स्टंडर्ड डिक्शनरी घेऊन बसलो तर त्यातील ६०, ००० शब्दापैकी निम्मे शब्द तरी वापरात नाहीत असे दिसले.

काही मराठी शब्द वापरणाऱ्याची पंचाईत करून टाकतात. परवाच माझ्या मुलाच्या कंपनीतून फोन आला आणि मुलगा घरात नसल्याने मी तो घेतला. मी तो बाहेर गेला म्हणून सांगितले, त्यावर फोन करणाऱ्याने आपण कोण असे विचारल्यावर मी गडबडलो, म्हणजे प्रश्नाचे उत्तर देता येत नव्हते म्हणून नाही पण 'मी त्याचा बाप' असे उत्तर दिल्यावर फोन करणाऱ्याला त्याचाच बाप काढल्यासारखे वाटेल आणि मग तो फोन दाणकन आपटेल की काय अशी भीती वाटून मी आपले गुळमुळीत "मी त्याचा वडील" असे उत्तर दिले पण माझे समाधान नाही झाले कारण वडील म्हटल्यावर वडील भाऊ असा पण अर्थ निघतो. इतरत्र अगदी बापुडवाणा होऊन बसणारा. उदा. 'बापरखुमादेवीवरी गोविन्दु रे' किंवा 'आइबाप हे दैवत माझे असता माझ्या घरी. ' हा बाप, पण अशा एकाद्याच ठिकाणी त्याला का जोर चढतो

कुणास ठाऊक. बापाऐवजी 'बा 'असा त्रास देत नाही उदा. खेड्यातील मुलांचे पालक माझ्या मित्राकडे आले की "गोंद्याला म्हणाव त्याचा बा आलाय. "अस शुद्ध मराठीत सांगायचे आणि त्यात कुणाला काही बोचायचे नाही. कदाचित आजच्या नागर संस्कृतीचाही हा परिणाम असेल.

बा म्हटले की मला स्वतःस शाळेत आलेला अनुभव हटकून आठवतो. आमचे एक शिक्षक जरा कवी वगैरे होते, म्हणजे वर्गातील सर्व मुलांची नावे एकत्र गुंफून त्यात मी वर्गातला हुशार (त्यावेळी) म्हणून माझे नाव प्रथम घालून “ हे श्याम कुलकर्णी, घार्गे, यादव, रणदीवे। रा. ना. यादव पिसे पानसरे सुरेश झेंडे “ अशी एक कविता (हे हिन्दबान्धवा थांब या स्थळी अश्रु दोन ढाळी । ती पराक्रमाची ज्योत मावळे इथे झांशीवाली या कवितेच्या धर्तीवर”) त्यानी केली होती, आणि हा त्यांचा उपक्रम प्रत्येक वर्गावर चालायचा, त्यामुळे त्याना तरी आपण काव्यशिरोमणी आहोत असे वाटायचे व अर्थातच मराठीवरील स्वत:च्या प्रभुत्वाविषयी खात्रीच होती.. पण एकदा मात्र या प्रभुत्वाचा मला चांगलाच प्रसाद मिळाला.

महात्मा गांधींच्या आत्मकथेतील एक अनुवादित उतारा आमच्या मराठी पाठ्यपुस्तकात होता (अर्थात हा काळ भीक मागून मिळालेल्या व आता खऱ्याखुऱ्या मिळालेल्या स्वातंत्र्याच्या मधला होता.) तो ते शिकवीत होते. त्यात एक वाक्य 'बापूजीनी बांना विचारले " असे होते. त्या शिक्षकानी त्या वाक्याचा अर्थ "गांधीनी आपल्या बापाला विचारले" असा सांगितला.

आता मी वर्गात त्यातल्या त्यात हुषार आणि थोडेफार वाचन केलेला, त्यामुळे मला राहवेना आणि मी लगेच उठून त्याना म्हटले "अहो गुरुजी, बा म्हणजे बाप नाही तर कस्तुरबांना सर्वजण प्रेमाने “बा” असे म्हणत त्याला उद्देशून लिहिले आहे " त्यावर या आमच्या लाडक्या गुर्जींचा पारा चढला आणि ते माझ्याच अंगावर ओरडले, "अरे बाळ, काहीतरीच काय बोलतोस बा म्हणजे बाSSप इतकेही माहीत नाही आणि वर्गातला हुषार पोरगा तू, बस गप्प मुकाट्याने "

या गुर्जींना ब्रह्म या शब्दाचा अर्थ मी विचारणार होतो पण मग तो विचार मी रद्द केला.

माझा मुलगा शाळेत जात असताना मी फारसा जागरुक पालक नसल्यामुळे त्याला अभ्यासाला वगैरे बसवत नव्हतो (ज्याबद्दल तो अजून मला धन्यवाद देतो) पण मधून मधून मधून त्याचा अभ्यास कसा चालला आहे हे कळण्यासाठी त्याच्या वह्या पहायचो. एकदा त्याची वही पहाताना एका ठिकाणी लाल शाईने दुरुस्ती केलेली दिसली म्हणून पाहिले तर शुभं करोति हे त्याने लिहिलेले त्याच्या शिक्षकानी त्याच्यावर काट मारून शुभंग करोती असे दुरुस्त केलेले आढळले.

थोडक्यात मराठी भाषेच्या प्रगतीचे कार्य असे मुळापासून चालू आहे. त्यात शासनाचे धोर-ण हे फक्त नावापुरतेच असल्याने आणखीच भर पडली आहे. एके काळी मोठा गाजावाजा करून शासनाने महाराष्ट्र

विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ स्थापन करून तज्ञ व्यक्तींकडून निरनिराळ्या विषयांवर मराठी भाषेत पुस्तके लिहून घेतली. त्यानी प्रकाशित केलेल्या प्रत्येक पुस्तकाच्या प्रस्तावनेतील पहिले वाक्य 'मातृभाषेतून शिक्षण दिल्यास विषय समजणे अधिक सुलभ होईल या उद्देशाने शासनाने अशी पुस्तके लिहून घेण्याचे महत्वाचे पाऊल उचलले आहे. ' हे आहे. त्यानंतर मात्र कुठे माशी शिंकली कळत नाही आणि ते उचललेले मराठी पाऊल पुढे पडण्याऐवजी मागेच पडले. आता त्या सर्व पुस्तकांचे गठ्ठे वाळवीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत(त्या गठ्ठ्यात माझेही एक पुस्तक आहे. )आता बहुतेक दुसरे ग्रंथनिर्मिति मंडळ बनवून या पुस्तकांची इंग्रजीत भाषांतरे करण्याचा सरकारचा विचार असेल.

पहिल्यावेळी अमेरिकेतून परत आल्यावर सहार विमानतळावरून घरी जाताना मी पत्नीला म्हणालो " अजून आपण अमेरिकेतच आहोत असे वाटतेय. "ती चमकून माझ्याकडे पहायला लागल्यावर मी तिला म्हटले, "रस्त्यावरच्या पाट्या बघ शुद्ध इन्ग्रजीत लिहिल्या आहेत कोणाही अमेरिकन माणसाची गैरसोय होऊ नये म्हणून किती ही दक्षता! राज्यस्थापनेनंतर पन्नास वर्षांनी पाट्यांचे मराठीकरण करण्याची मोहीम पुन्हा सुरू केली आहे म्हणे. पुन्हा म्हणण्याचे कारण बाळासाहेबांच्या काळात पाट्यांची तोडफोड होऊन गेलीय, त्यानंतर काही दिवस इंग्रजी पाट्य़ाच पण मराठी लिपीत दिसू लागल्या होत्या. आता पुम्हा त्यांचेच पुत्र

राज्याचा कारभार हाकत असताना तरी ती केव्हा यशस्वी होते पहायचे. आता हीरकमहोत्सवातही अजून परिस्थिती तीच आहे तेव्हा स्वातंत्र्याची शंभरी उजाडेल तेव्हां कदाचित मराठीचीही शंभरी भरेल अशीच शक्यता दिसते. शिवाय आपल्याला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातन्त्र्य मिळालेच नाही हे पद्मश्री कंगनाजींनी जाहीर केलेच आहे. त्यांचे हे प्रत्ययकारी बोल किती खरे आहेत. इतकेच काय पण २०१४ मध्येही मिळाल्याचे लक्षण दिसत नाही आणि अजूनही इंग्रजीच्या मगरमिठीतून आपली सुटका झालीच नाही हे त्यांचेच भाषण ऐकले की जाणवते. अर्थात त्या मुंबईत रहात असल्या तरी त्यानी मराठीत बोलणे अपेक्षितच नाही. आणि जन्मग्रामी रहात नसल्याने मातृभाषेत बोलणेही अपेक्षित नाही हे तितकेच खरे!

# २. माझा पहिला रेडिओ

अभियांत्रिकीचा निकाल लागताच लग्नाळू उमेदवाराकडे अडलेल्या वधूपित्याची रांग लागावी तशा निरनिराळ्या कंपन्यांकडून इंजिनियर झालेल्या मुलाना मागण्या यायला लागतात. कधीकधी या कंपन्या अगोदरच महाविद्यालयात जाऊन मुलाखती घेऊन भावी इंजिनियरना नेमणुकीची पत्रेही देऊन टाकतात. ही परिस्थिती मधल्या काही काळात होती. सध्या त्यात जरा मंदी आलीय. पण आम्ही इंजिनियर झालो त्यावेळचा काळ असा नव्हता. त्यामुळे आम्हालाच निरनिराळ्या दैनिकात येणाऱ्या छोट्या मोठ्या जाहिराती वाचून आपल्या माहितीसह अर्ज टाकून वाट पाहत बसावे लागायचे. महाविद्यालयात जाऊन मुलाखती घेण्याचे तर कंपन्या नावही घेत नसत. त्यावेळी बहुतांश कंपन्याना अभियंता ही एक चैनीची वस्तू असे वाटत होते की काय कुणास ठाउक!

मी आमच्या खेडेगावातील जवळजवळ पहिलाच इंजिनियर असल्याने (१९६०) तेथे एरंडोऽपी द्रुमायते या न्यायाने भाव खात असलो तरी तिकडे कोठल्याही कंपनीचे नावही कुणास माहीत नव्हते, आणि दूर मुंबईत असणाऱ्या कंपन्यांना माझे नाव माहीत नव्हते. त्यामुळे लगेचच माझ्या बहिणीने मला मुंबईस तिच्याकडे नेले आणि तेथून नोकरीची खटपट

करण्याचा सल्ला दिला. आणि सुदैवाने दोनतीन महिन्यातच एका बॉयलर कंपनीत कशी काय कोण जाणे मला प्रशिक्षणार्थी अभियंता (ऍप्रेंटिस इंजिनियर) म्हणून नेमणूक मिळाली.

मी त्या दोन तीन महिन्याच्या काळात बऱ्याच मुलाखतींना गेलो होतो. त्यात मुंबईत त्याच वर्षी मॉन्सून अगदी वेळेवर दाखल होऊन अगदी अंगात आल्यासारखा बरसत होता त्यामुळे मुलाखतीस जाताना आपल्याला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देता येतील का यापेक्षा मुलाखतीस उभा राहीपर्यंत माझे अंगावरचे कपडे कसे कोरडे राहतील याचीच काळजी मला जास्त होती अनेक कंपन्यात मुलाखतीला गेल्यामुळे नेमणुकीचे पत्र येईपर्यंत त्या कंपनीचा ठावठिकाणा मी पार विसरून गेलो होतो.

त्या वेळी शासनाने. नेहमीप्रमाणे आमच्याकडूनही अभियंता झाल्यावर शासकीय सेवेत काम करण्याचे करारपत्र घेतले होते पण त्या नुसार आम्हाला तशी नेमणूक देण्याचे बंधन मात्र स्वत: वर लादून न घेता निरनिराळ्या कंपन्यांनाच त्यानी काही विशिष्ट प्रमाणात नव्याने उत्तीर्ण अभियंत्यांना प्रशिक्षणार्थी अभियंते म्हणून नेमण्याचे बंधन घालून आपली सोडवणूक करून घेतली होती, याच प्रकारची माझी नेमणूक होती. त्यामुळे मी पहिल्या दिवशी कामावर हजर राहताच तेथील एक प्रमुख वाटणाऱ्या व्यक्तीने मला सांगितले, "हे पाहा आम्ही तुला काम सांगणार नाही, काम शोधायचे आणि ते करायचे" याचा काय अर्थ हे मला शेवटपर्यंत कळले

नाही. म्हणजे मी इतके दिवस नोकरी शोधत होतो आणि नोकरी मिळाली तर काम शोधणे हेच काम होऊन बसले. माझा सगळा दिवस कंपनीत काम शोधण्यातच जाऊ लागला. ती बॉयलर उत्पादन करणारी कंपनी असून तेथे पॅकेज टाइप बॉयलर तयार होत.. ती कंपनीच आता अस्तित्वातच नाही. बॉयलर उत्पादनात वेल्डिंग हा महत्वाचा भाग असे आणि त्यापूर्वी जे दोन भाग जोडायचे ते घासून तयार करायला लागायचे,त्याला गौजिंग (Gouging) असे म्हणत व त्यासाठी विद्युतघासणी (Electric grinder) वापरत त्यामुळे सगळ्या यंत्रशाळेत पोलादावर जोरात विद्युतघासणीचा आणि हातोड्याचा अगदी कानठळ्या बसवणारा आवाज यायचा. त्यामुळे एकमेकाशी बोलण्यासाठी अगदी घसा खरवडून बोलावे लागे. माझ्या वडिलांचे एक मित्र मला भेटायला फॅक्टरीत आले आणि तो आवाज ऐकून घरी परत गेले तेव्हा मी बहिरा होण्याची ग्वाही त्यांनी माझ्या आई वडिलांना दिली होती. अर्थात अशा वातावरणात मी नाइलाजानेच वावरत होतो.. काम न करता बसण्याचा मला कंटाळा आला तरी काम शोधण्याचीही जबाबदारी माझ्यावरच सोपवल्यामुळे आणि तीन महिन्यानंतर काम शोधण्याचा माझा प्रयत्न अयशस्वी झाल्यामुळे कंपनीच्या एका संचालकाने मला बोलावून पुढील महिन्यापासून कंपनीला माझी जरुरी नाही असे गोड शब्दात सांगितले. या कंपनीत काम शोधत बसण्यापेक्षा इतरत्र काम असेल

तेथेच जावे असा माझा प्रयत्न चालूच होता त्यामुळे एक तारखेपासून या खडखडाटात यावे लागणार नाही याचा मला आनंदच झाला.

मधल्या काळात पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात मला शिकवणारे एक प्राध्यापक त्याच कंपनीचा बॉयलर खरेदी करण्याच्या कामासाठी आले असताना मला दिसले आणि मी त्यांच्याशी गप्पा मारताना त्यानी औरंगाबादच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात ते सध्या यंत्र अभियांत्रिकीचे विभागप्रमुख आहेत आणि तेथे सह अधिव्याख्यात्याची जरुरी आहे असे सांगून मला जर योग्य वाटले तर अर्ज करायचा सल्ला दिला आणि तो मी लगेच अमलात आणला होता. त्यावेळी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापकांची इतकी कमतरता होती की माझी मुलाखतही न घेता मला एकदम नेमणुकीचे पत्रच माझ्या हातात पडले.

औरंगाबादच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात नेमणुकीचे पत्र मिळताच मी निघण्याची तयारी सुरू केली इतका मी मुंबईच्या वास्तव्याला कंटाळलो होतो. जाण्यापूर्वी मुंबईत माझा एक मित्र सेंट्रल पी. डब्लू. डी. च्या चर्चगेटजवळील ऑफिसमध्ये काम करत असे त्याची गाठ घ्यायला म्हणून गेलो. हा मित्र ऑफिसमध्ये काम करायला जायचा की चहा प्यायला आणि पाजायला याचा मला नेहमी पेच पडायचा मात्र त्या दिवशी त्याच्यासमोर एक गृहस्थ बसले होते आणि तो खरोखरच काही फायली समोर ठेऊन बसला होता. मला पाहताच त्याने माझे स्वागत केले आणि

समोर बसलेल्या गृहस्थाकडे निर्देश करत मला म्हणाल "अरे हे बापटसाहेब." ते माझ्यापेक्षा सात आठ वर्षांनी मोठे असावेत आणि गोरे आणि घाऱ्या डोळ्याचे होते. चेहरा हसतमुख होता, मी त्यांना नमस्कार केला. आणि मित्राकडे वळून म्हणालो " अरे यादव, मला औरंगाबादला जॉब मिळालाय आणि उद्या परवा निघणार आहे हेच सांगायला आलो. " यावर यादवने " वा मग जमलच" असे उद्गार काढले आणि मी प्रश्नार्थक मुद्रेने त्याच्याकडे पाहू लागल्यावर तो म्हणाला " अरे हे साहेब औरंगाबादलाच असतात. मोठे कॉंट्रक्टर आहेत आणि त्यांच्या कामाच्या बिलाची चौकशी करायला आलेत. तुला औरंगाबादला काही लागले तर मदत करतील" यावर बापटांनीही मान हलवत " अगदी निश्चित, काहीही मदत लागली तर अवश्य सांगा" असे आश्वासन दिले. बहुतेक त्यांचे एकादे बिल पास करायची जबाबदारी त्यावेळी माझा मित्र संभाळत असावा.

त्यावेळपर्यंत मी औरंगाबादचे फक्त नाव ऐकले होते. आमच्याकडे म्हणजे प. महाराष्ट्रात त्यावेळी ते मोगलाईत कोठे तरी आहे असे म्हटले जायचे. खर तर औरंगाबाद जुन्या निझाम स्टेट मध्ये होते आणि राज्य पुनर्रचनेनंतर मराठवाडा महाराष्ट्रात सामिल झाल्याने १९५६ मध्ये ते महाराष्ट्रात आले होते. तेथे मुसलमानांची वस्ती खूप आहे आणि एकाद्या मुस्लीम मोहल्ल्यात आपल्याला राहावे लागेल आणि एकादी लैला

आपल्यावर आशिक होईल अशा वेडपट कल्पना माझ्या डोक्यात मी गध्धेपंचविशीत असल्याचा परिणाम म्हणून होत्या.

मला नेमणुकीचे पत्र जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात मिळाले आणि फेब्रुवारीची एक तारीख शनिवारी येत होती तेव्हा आपण सोमवारी कामावर रुजू व्हावे असे मी ठरवले. त्यामुळे मी रविवारी संध्याकाळच्या गाडीने निघालो. मुंबईस मी बहिणीकडे राहत असल्याने माझे स्वतःचे सामान अगदीच किरकोळ म्हणजे एक पत्र्याची बॅग भरेल एवढीच होते, कारण अजून सूटकेसचा जमाना माझ्यापर्यंत आला नव्हता. मुंबईहून अलाहाबाद व्हाया नागपूर जाणाऱ्या ट्रेनमध्ये बसलो. आयुष्यात पहिल्यांदाच अगदी परक्या ठिकाणी मी एकटा निघाल्यामुळे बहिणीला बरेच गंहिवरून आले तिच्या परीने तिने मुंबईत नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न केला होता पण तो सफल झाला नव्हता त्यामुळे तिचाही नाइलाज झाला होता..

त्यावेळी औरंगाबादसाठी मनमाडला गाडी बदलावी लागे कारण औरंगाबादच्या पुढे मीटर गेज रेलवे होती. पुढे मनमाडहून सिकंदराबाद, किंवा काचीगुडाला जाणाऱ्या ट्रेनमध्ये बसावे लागे आणि तेथून तीन चार तासात गाडी औरंगाबादला पोचत असे.

औरंगाबादला गाडी पोचली तेव्हा पहाटेचे साडेचार पाच वाजत होते आणि तो फेब्रुवारी महिना असल्यामुळे अजून अंधाराच साम्राज्य

सगळीकडे पसरलेले होते. स्टेशनच्या बाहेर पडून डोकावून पाहिले तेव्हा समोर आणि दोन्ही बाजूनी एवढा अंधार पसरला होता की शहर कोणत्या बाजूस आहे हेसुद्धा समजत नव्हत अखेरीस स्टेशनवरील हमालाला विचारले आणि त्याने दाखवलेल्या दिशेने चालू लागलो. बाहेर काही टांगे उभे होते त्यातल्या एका टांगेवाल्याने " कहां जाना है साब" असे हटकले. औरंगाबादची अजून निजामी अमलातून पूर्णपणे मुक्तता झालेली दिसत नव्हती. (म्हणजे त्यावेळी महाराष्ट्रात मराठीचाच वापर जास्त व्हायचा त्यामुळे हिंदी बोलणे जरा अवघड वाटायचे) टांग्यात चढलो आणि एकाद्या लॉजमध्ये उतरावे असा विचार केला कारण अशा वेळी बापटसाहेबाना त्रास देणे योग्य नव्हते. टांगेवाल्यासच विचारले आणि त्याने सांगितलेल्या लॉजकडे टांगा न्यावयास सांगितले. थोडे अंतर गेल्यावर मिणमिणते दिवे जळत असलेली हॉटेले दिसू लागली. लोड शेडिंग नसतानाही लोक विजेचा वापर फारच काटकसरीने करत असल्याचे भासले. थोडी अशी हॉटेले संपल्यावर पुन्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूस मोकळीच जागा दिसत होती असलीच तर शेते असावीत.. जेमतेम दोन वाहने शेजारून जाऊ शकतील एवढीच रस्त्याची रुंदी होती. थोड्या वेळाने डाव्या बाजूस एकादी वसाहत असावी असे वाटले आणि ती आदर्श कोलनी होती असे कळले. जवळच फायरब्रिगेड दिसत होते.

पुढे एक दोन मोठ्या इमारती दिसू लागल्या. एका मोठ्या इमारतीकडे बोट दाखवून टांगेवाला सांगत होता, " साब ये पोलिटेक्निकल कॉलेज’ म्हणजे हेच आमचे कार्यक्षेत्र होते तर. थोडे पुढे गेल्यावर आता जो भाग आला तो उस्मानपुरा अशी माहिती मिळाली. पुण्यात जशा पेठा असतात तसे येथे पुरे असतात. औरंगजेब या शहरात वास्तव्य करून राहिल्यामुळे औरंगपुरा पुढे होताच. अर्थात तो नंतर पहायला मिळाला. त्यानंतर एक जरा बऱ्यापैकी मोठा चौक लागला.. तेथील उद्यानात १८५७ सालच्या स्वातंत्र्यसंग्रामाची स्मृती म्हणून एक स्तंभ उभारण्यात आलेला होता, आणि अजूनही आहे. म्हणून त्याला क्रांतीचौक म्हणायचे. पण आता तेथे आकाशपथ बांधण्यात आल्याने त्या स्तंभाची उंची जाणवत नाही. त्यानंतर दोन्ही बाजूला थडगीच थडगी होती तो भाग मुस्लिम वक्फच्या ताब्यात असलेला भाग होता. आणि त्यापुढे गेल्यावर एक नवीन वसाहत होती तिला नूतन कॉलनी म्हणतात असे कळले. तेथून थोडे पुढे गेल्यावर रस्त्याच्या मध्यभागी एक मोठा दरवाजा लागला त्याला पैठण गेट म्हणतात असे कळले. औरंगाबादच्या सीमा बंदिस्त करणारे असे दहाबारा दरवाजे तरी आहेत. पैठण गेट पैठणकड तोंड करून उभे आहे आणि त्याच्या शेजारीच मला टांगेवाल्याने उतरवले, " देखो साब, आया महाराष्ट्र लॉज". केवळ या नावामुळे त्यावेळी प. महाराष्ट्रातून येणारी सगळी मंडळी बहुतेक

या लॉजमध्ये उतरत असावीत. लॉज आजही अस्तित्वात आहे पण त्याचे पूर्ण स्वरूप आणि नावसुद्धा बदलले आहे.

लॉजमध्ये आत शिरल्यावर दोन बाजूस खोल्या होत्या आणि दारातच उजव्या बाजूस जेवणघर होते. लॉजच्या मालकाने मला एका खोलीतील एक कॉटचा ताबा दिला आणि माझ्याकडून अनामत म्हणून काहीतरी दहा पंधरा रुपये घेतले. तेथे महिनामहिना राहणारेही काही पाहुणे होते, पण मला तसे राहावे लागणार नाही अशी खात्री असल्याने मी त्याविषयी काही चौकशीही केली नाही. माझे सामान म्हणजे जी एक बॅग होती ती मला दिलेल्या कॉटखाली ठेऊन प्रातर्विधी आटोपून मी लगेचच बापटसाहेबांच्या घरी जाण्याच्या उद्देशाने बाहेर पडलो. त्यांचा उस्मानपुरा हा भाग आम्ही स्टेशनवरून टांग्यातून येताना मी पाहिलाच होता त्यामुळे मी परत उलट्या दिशेने चालत त्यांच्या घरी जाऊ शकतो याविषयी मला खात्री होती. त्यावेळी औरंगाबाद इतके लहान शहर होते की बहुतेक ठिकाणी चालत जाणे सहज शक्य असे याविषयी सर्वच औरंगाबादकरांना खात्री असल्यामुळे त्यावेळी एकच बस गावात धावत असे ती स्टेशनवरून निघून गुलमंडी या गावातील मध्यवर्ती भागात जात असे हे अंतर जास्तीतजास्त पाच किलोमीटर असेल.

माझ्या अपेक्षेप्रमाणे दहा पंधरा मिनिटात मी बापटसाहेबांच्या घरी पोचलो. आणि त्यांना मी औरंगाबादला आल्याची सुवार्ता दिली. ते रहात

असलेला भाग त्यावेळी त्यामानाने नवीनच होता त्यामुळे त्या भागाला नवा उस्मानपुराच म्हणत. अगदी तुरळक घरे होती.. बापटांचे घर म्हणजे बराच मोठा वाडाच होता. फाटकातून आत प्रवेश केल्यावर मोठे पटांगण होते त्यात एक औटहौसवजा भागात त्यांची अवजारे पडलेली असायची. सकाळच्या वेळी त्यांचे नेहमीचे कामकरी त्या पटांगणात बसायचे आणि त्यांना अवजारे देऊन निरनिराळया कामावर पाठवण्यात यायचे. बापटसाहेबांचे पिताश्री वय वर्षे ऐंशी अजून तब्येत ठणठणीत. तेच मामा बापट कॉंट्रॅक्टर म्हणून औरंगाबादेत प्रसिद्ध होते. आता त्यांची मुले हळूहळू त्यांच्या कामाचा भार संभाळू लाग्ली होती, तरी सकाळी मामा बापट उत्साहाने मजुरांशी वार्तालाप करून कोठे काय वालले याची माहिती घेत आणि पुढे काय करायचे याच्या सूचना देत. मला भेटलेले त्यांचे दोन नंबरचे चिरंजीव. त्यांना सगळे अण्णा म्हणून ओळखत तर त्यांचे मोठे बंधू दादा म्हणून ओळखले जात..

अण्णानी माझे स्वागत करून त्यांच्या घराच्या पाठीमागेच त्यांचे काही मित्र राहतात त्यांच्या खोलीत अजून एक व्यक्तीस ते घेऊ इच्छितात असे सांगितले. त्या क्षणाला तरी मला दुसरा काही पर्याय आहे असे वाटले नाही आणि निदान खोली आणि तेथील व्यक्ती कशा आहेत ते तरी पाहावे असा मी विचार केला, आणि अण्णासाहेबांच्या बरोबर त्यांच्याच बंगल्याच्या पाठीमागे असलेल्या वाड्यात प्रवेश केला. या वास्तूला भोरे

बंगला असे नाव होते. भोरे या आडनावाच्या वकीलानी या भागात बरीच स्थावर मालमत्ता संपादन केली होती. आम्ही ज्या वाड्यात प्रवेश केला त्याच्या बरोबर समोरच आणखी एक असाच वाडा त्याच्या मालकीचा होता, शिवाय गावात अगदी मध्यवस्तीत त्यांचा राहता बंगला होता. या सर्व मालमत्तेची मालकी आता वकीलसाहेबांच्या मुलीकडे होती आणि तिने त्याची देखभाल करण्यासाठी एक मुनीम ठेवला होता. हे मुनीमजी देखभाल म्हणजे फक्त महिन्यातून भाडे वसूल करण्याचे काम करीत..

बंगल्याची बाहेरील भिंत बरीच पडकी होती त्यामुळे त्याला फाटक नावापुरतेच होते. उघड्या प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर समोर एक बंगला होता. त्याच आवारात उजव्या बाजूस आणखी एक तसलाच बंगला होता. या दोन बंगल्यांच्या मागील बाजूस दोन औटहौसेस होती. त्यापैकी समोरील बंगल्याच्या औटहाउसमधील डाव्या बाजूच्या दोन खोल्यांमध्ये अण्णासाहेब मला घेऊन गेले. या दोन खोल्यातील तीन व्यक्तींनी आमचे स्वागत केले. अर्थात ते अण्णासाहेबांचेच दोस्त होते.

" या या अण्णासाहेब, आज अगदी सकाळी सकाळी आमच्याकडे मोर्चा" त्या तीन व्यक्तींपैकी जरा गोंडस गोरटेल्या व्यक्तीने हसत हसत बापटांचे हात पकडून त्यांना खुर्चीवर बसवत म्हटले. " पांडेसाहेब, तुम्हाला सांगितल होत ना आमचे एक मित्र येताहेत म्हणून ते आलेत बघा आज, हे कुलकर्णी आणि बर का कुलकर्णी, हे पांडे, हे एस. टी. मध्ये ज्यू. सिव्हिल

इंजिनियर आहेत." बापट उत्तरले. त्यानंतर दुसऱ्या किडकिडित उंचेल्या व्यक्तीकडे अंगुलिनिर्देश करीत " हे माटे, हे ॲग्रिकल्चर खात्यात आहेत, " आणि तिसऱ्या व्यक्तीकडे पाहून, "हे आहेत शिराळी हे पोलिटेक्निकला शिकतात."

"आणि बरका मित्रानो, हे आहेत कुलकर्णी, नुकतेच इथल्या पोलिटेक्निकमध्ये लेक्चरर म्हणून आलेत. " माझी ओळख अशी त्या तीन व्यक्तींशी करून देत बापटांनी आपला तेथे येण्याचा उद्देश जाहीर करत म्हटले, "यांना तुमचे चौथे पार्टनर म्हणून यायचय!"

" मग येऊद्यात की काय वासुदेवराव? " त्यातील उंच किडकिडीत म्हणजे माटे उद्गारले

" म्हणजे तशी आमची काही हरकत नाही" पांडे बोलू लागले " त्यांना टर्म्स ॲंड कंडिशन्स सांगितल्यात ना? "

" काय पांडे, अशा काय अगदी टर्म्स ॲंड कंडिशन्स आहेत, ते भाडे शेअर करतील आणि ते आणि माटे एका खोलीत झोपतील आणि तुम्ही आणि शिराळी दुसऱ्या खोलीत! यात काय विशेष आहे का? सगळ्यात अगोदर तुम्ही अंघोळ करून तुमची पूजापाठ कराल आणि मग बाकीचे आपापल्या सोयीने करतील येवढेच ना? काही काळजी करू नका" बापटांनीच माझ्या वतीने उत्तर दिले. आणि मी त्या दोन खोल्यातील चौथा भागीदार झालो.

आमच्या या भागीदारांपैकी माटे सदैव फिरतीवर असायचे. डिपार्टमेंटची जीप त्यांच्या दिमतीला असायची त्यामुळे महिन्यातून पंधरा दिवस ते फिरतीवर आणि त्यांचे कुटुंब पुण्यात असल्यामुळे शनिवार रविवार ते पुण्याला राहण्याचा प्रयत्न करायचे. शिराळी हा विद्यार्थी होता तरी आम्हा दोघाना एकत्र पाहिल्यावर मी विद्यार्थी आणि तो माझा प्रोफेसर असेल असे इतरांना वाटण्याची शक्यता होती अशी त्याची वागण्याची तऱ्हा होती. पण तो फेब्रुवारी महिना होता आणि त्याची परीक्षा जवळ आली होती. तो नगरचा असल्याने त्यालाही मधूनमधून नगरला जाण्याची हुक्की यायची. येउन जाऊन मी आणि पांडेच काय ते या खोल्यात जास्त वेळ राहणारे सदस्य होतो. त्यात पांडे पण कधी फिरतीवर जायचे त्यामुळे शेवटी त्या खोलीचा खरा कायम सदस्य मीच ठरलो. अगदी उंट आणि अरब या कथेचाच प्रकार झाला.

थोड्याच दिवसात शिराळीची परीक्षा झाली आणि तोही निघून गेला. आणि त्याच सुमारास माझा धाकटा भाऊ तेथे आला. खरे तर तो त्यावेळी पुण्यात शिकत होता पण आता वडील सेवानिवृत्त झाल्यामुळे घरातील कर्ता पुरुष या नात्याने मी त्याला औरंगाबादला आणून ठेवण्याचा निर्णय घेतला आणि तो अमलातही आणला. म्हणजे आता परत त्या दोन खोल्यात आम्ही पाचजण झालो पण आमची अडचण होणार हे लक्षात घेऊनच की काय शिराळीने नापास होऊन परत औरंगाबादला न येण्याचा

निर्णय घेतला. तो पुढे बऱ्यापैकी कॉंट्रॅक्टर होऊन माझ्यापेक्षाही जास्त मिळवायला लागला असे कळले. मग आता एका खोलीत आम्ही भाऊ भाऊ आणि एका खोलीत माटे पांडे अशी विभागणी झाली.

त्याच वेळी मला रेडिओ घेण्याची अवदसा सुचली. रेडिओ ही त्या वेळी चैन या सदरात मोडणारी गोष्ट निदान आमच्या परिस्थितीतील माणसांसाठी होती. कारण मला पगार तीनचारशे रुपयांच्या आसपास होता आणि त्यातील शक्य तेवढे घरी पाठवायला लागावे अशी परिस्थिती होती अर्थातच त्यामुळे अडीचशे रुपयांचा रेडिओ एकदम घेण्याची ऐपत मला नव्हती. आणि त्यामुळे ही कल्पना मी मनातच घोळवत होतो. आजच्या काळात ही गोष्ट हास्यास्पदच वाटेल. अशात पांडे यांच्याशी बोलताबोलता मी हा विषय काढला आणि त्यानी त्यावर एक पर्याय सुचवला, " मग काय कुलकर्णी अस करूया आपण दोघे मिळून रेडिओ घेऊया नाहीतरी या खोल्यातून कोठेही लावला तरी सगळयांना ऐकू येणारच अगदी ऐकायचे नाही म्हटले तरी ऐकावाच लागणार " अस त्यानी म्हटल्यावर मला काही बोलणे शक्यच नव्हते आणि अनायासे मला निम्म्या खर्चात रेडिओ घेता येत होता अर्थातच त्या कल्पनेला मी दुजोरा दिला.

पांडे तसे हुषार आणि युक्तिवादात पटाईत त्यामुळे त्यानी पहिल्यांदाच माझ्याकडून वदवून घेतले की रेडिओचा पहिला हप्ता मी भरायचा याशिवाय त्यानी मला बोलता बोलाता सुचवले, " बरका

कुलकर्णी, तुमच्या खोलीत तुमच्या भावाला उगीच अभ्यासात व्यत्यय नको म्हणून रेडिओ आमच्याच खोलीत ठेऊया" त्यानी असे कारण दाखवले की मला काही बोलणे शक्यच नव्हते. म्हणजे मी रेडिओ आमच्या खोलीत ठेवायचा म्हटले असते तर मलाच माझ्या भावाच्या अभ्यासाची काळजी नाही असे त्यानी म्हणायला सुरवात केली असती. रेडिओ म्हणायला दोघांचा असला तरी तो खरा पांड्यांचाच असणार होता कारण मला रात्री झोपताना रेडिओ ऐकण्याची इच्छा झाली तर त्यांच्या खोलीत जाऊन ते जागे असले तर रेडिओ ऐकायला मिळणार. असे असले तरी अर्धं त्यजति पंडित: किंवा त्यावेळी औरंगाबादमध्ये फारच वापरली जाणारी "नही मामूसे नकटा मामू अच्छा है।" या उक्तीप्रमाणे सध्या निदान शेजारच्या खोलीत का होईना जाऊन रेडिओ ऐकायला काही हरकत नाही. असा विचार करून मी त्यांच्या बेताला मान डोलावली आणि आम्ही रेडिओ आणण्याच्या मोहिमेवर बाहेर पडलो.

त्यावेळी औरंगाबादेत रेडिओ आणायला किराणाचावडी या भागात जावे लागायचे. त्या भागात पांड्यांच्या मते नळातला नरिमान अंड सन्स या दुकानात जायचे ठरले. नरिमान आणि त्याच्या शेजारी वॉचलँड अशी दोन दुकाने त्यावेळी रेडिओ गोदरेज कपाटे अशा त्याकाळातल्या भारी भारी वस्तू विकत असत. नरिमानचे बोधचिन्ह नरिमानमधले पहिले

अक्षर न हे नळासारखे दिसायचे म्हणून पांडे त्याला नळातला नरिमान म्हणायचे.

त्या दुकानात शिरल्यावर आम्ही दोन तीन मॉडेल्स पाहिली कारण आमच्या बजेटमध्ये बसणारी अशी तेवढीच होती. त्यातले एच. एम. व्ही. चा लिटल निप्पर हे मोडेल २५० रुपयात येत होते. शिवाय नळातल्या नरिमानने ते किंमत न वाढवता दोन हप्त्यात द्यायचे कबूल केले त्यामुळे पहिला हप्ता १२५ रुपयांचा भरून तो आम्ही लगेच घरी आणला. लिटल निप्पर खरोखरच आकाराने अगदी लहान होता आणि त्यामुळे एका हातानेसुद्धा तो उचलणे शक्य व्हायचे. घरी येतानाच पांडेनी पावशेर पेढे विकत घेतले ते मात्र त्यानी स्वत:च्या पैशांनी घेतले आणि घरात शिरल्यावर त्यांच्या खोलीतील कपाटाच्या वरच्या कप्प्यात त्याला स्थानापन्न केला. एरिअल लावून त्यांनी भक्तिभावाने एक फूल, हळद कुंकू त्याला वाहून पेढ्याचा नैवेद्य दाखवला आणि सर्वांना पेढे वाटून रेडिओचे बटण दाबून त्याचे उद्घाटन केले. बहुतेक ती वेळ संध्याकाळची असल्यामुळे कामगारसभा किंवा अशाच स्वरुपाचा कार्यक्रम चालू होता.

रेडिओ आमच्या घरात आला खरा पण तसा तो माझ्या सोयीनुसार ऐकायला मिळतच नव्हता. पांडे ‘ऑफीसला गेले की त्यांच्यापाठोपाठ मलाही जावे लागत होते त्यामुळे सकाळी काही विशेष ऐकायला मिळत नसे त्याची उणीव संध्याकाळी भरून काढू म्हणावे तर ऑफीसमधून

आल्यावर पांड्यांचे जपजाप्य चालायचे. येऊनजाऊन ते दोन दिवसानी टूरवर गेले तेव्हा माझ्या मनाप्रमाणे रेडिओ ऐकण्याची संधी मला मिळाली. माटे विशेष रेडिओ ऐकत नसत आणि त्यांचा ब्रिजचा अड्डा असल्यामुळे अशा फालतू गोष्टीत त्यांना रस नव्हता त्यामुळे त्या काळात मी रेडिओ आमच्याच खोलीत आणून मनसोक्त ऐकला आणि त्याला त्यांचा काहीच विरोध नव्हता. माझ्या भावाची भूमिका अगदी नि:संगपणाची होती कारण त्याच्यावर अभ्यासाचे ओझे असल्यामुळे तो माझ्या कृतीला पाठिंबा किंवा विरोध यापैकी काहीच करत नव्हता. कदाचित माझ्या या (त्यावेळी भासणाऱ्या) बाहेरख्यालीपणाचा इतका परिणाम त्याच्यावर झाला की त्या बिचाऱ्याने नंतर लग्नही केले नाही मात्र तो उत्तम इंजिनियर झाला.

दोन दिवस मनसोक्त रेडिओ ऐकून तृप्त मनाने मी कॉलेजला गेलो आणि संध्याकाळी घरी आल्यावर पाहतो तो रेडिओचा मुक्काम शेजारच्या म्हणजे पांड्यांच्या खोलीत हललेला! अर्थात त्याचा अर्थ पांडेसाहेब आले होते. आणि मी त्यांच्यापुढे गेल्यावर काहीच घडले नसल्यासारखे ते नेहमीप्रमाणे माझ्याशी बोलू लागले. त्यामुळे मला जरा बरे वाटले नाहीतर मी रेडिओ हलवल्याचा या शीघ्रकोपी माणसास राग आला तर काय घ्या अशी उगीच भीती मला वाटत होती. कदाचित रेडिओचा पहिला हप्ता मी दिलेला असल्यामुळे सध्या तरी तत्वत: रेडिओवर मालकी माझी असल्याचे त्याना मान्य असेल त्यामुळे त्यानी आपला नारसिंहावतार मला दाखवला

नसावा. पण त्यामुळे माझे धाडस थोडे अधिक वाढून पांडे दौऱ्यावर गेले नसले तरी ते बाहेर गेल्यावरही मी रेडिओ आमच्या खोलीत आणून ऐकायला सुरवात केली. थोडक्यात रेडिओ आमच्या दोन विभागात लंबकाप्रमाणे पण अनियमित गतीने आंदोलू लागला. द्रौपदीला पांच पाडवानी बिनतक्रार कसे नांदवले असेल याचे त्यामुळेच मला खूप आश्चर्य वाटते. महिना संपण्यापूर्वीच या गोष्टीचा निकाल पांड्यानीच लावला. माझ्याशी बोलताना ते म्हणाले, " हे पाहा कुलकर्णी, रेडिओ सारखा या खोलीतून त्या खोलीत हलवण्याचा मला कंटाळा आला आहे, तेव्हां मला असे वाटते की तो तुम्ही घेऊनच टाका, नाहीतरी पहिला हप्ता तुम्ही भरलाच आहे पुढचाही भरून टाका आणि तो तुमच्याच खोलीत राहू द्या, " पांड्यानाही बहुधा रेडिओ ऐकण्यात फारसा उत्साह उरला नसावा. माझी मानसिक तयारी अगोदर झालीच होती ती पांड्याच्या या उद्गारामुळे प्रत्यक्षात येऊन मी पुढचा हप्ता भरला आणि रेडिओ पूर्णपणे माझ्या मालकीचा झाला.

या छोट्या रेडिओने बराच काळ आमच्या कुटुंबियांची करमणूक केली.

# ३. धाडू नको बाजारी!

खरेदीचा तिटकारा हा गुण माझ्या आईकडून माझ्या रक्तात उतरला असावा. दारावर येणाऱ्या मोळीविक्याकडून बरीच घासाघीस करून मोळी किंवा बोहारणीकडून आमचे जुने कपडे देऊन एकादेदुसरे भांडे घेण्यापलिकडे काही बिचारीच्या खरेदीची मजल गेली नाही. त्यातही पैसे मोजून घेण्याचे किंवा देण्याचे काम आम्हा भावंडांनाच करावे लागे. त्यालाही एक कारण होते. आईच्या काळी मुलींच्या हातावर पैसा पडणे ही गोष्ट अशक्य कोटीतीलच! एकदा जन्माच्या कर्मी बिचारीला तिच्या आजीने बक्षीस म्हणून दिलेली पावली म्हणजे आजचे पंचवीस पैश्यांचे नाणे घेऊन ती सगळा बाजार फिरली आणि काय घ्यावे याचा निर्णय करता न करता आल्यामुळे तिनं ती आपल्या नऊवारी लुगड्याच्या कडोसरीला लपवून ठेवली आणि ती अगदी अचूकपणे माझ्या विधवा आत्याच्या नजरेस पडली. ही आत्या म्हणजे वडिलांची मोठी बहीण, तिच्यासमोर बोलण्याची त्यांचीही प्राज्ञा नसे मग आईला तर तो विचारही करणे अशक्य, अशात तिचा हा अपराध, मग काय विचारता, "आता काय अनुसया (माझी आई)स्वत:कारभार करू लागली ती आता आम्हाला काय विचारणार " असा इतका त्रागा आत्याने केला की त्यापुढे शाहूमहाराजानी स्वतंत्र

कारभार सुरू केल्याबद्दल ताराबाई राणीसाहेबांनी केलेला त्रागाही फिका पडाबा. त्यामुळे संत तुकारामानीसुद्धा निदान दुकान चालवण्यासाठी तरी पैशाला हात लावला असेल (हा उल्लेख समस्त वारकरी परिवाराची क्षमा मागून) पण त्या माउलीनं मात्र त्यानंतर पैशाला कधी हात लावण्याचा आणि कसल्याही खरेदीचा व्यवहार करण्याचा अपराध केला नाही.

माझ्या बाबतीत मात्र असे काहीही न घडताच खरेदीविषयी असलेले माझे वैराग्य हा कदाचित माझ्या आळशी स्वभावाचाच भाग असावा. आमच्या गावात जो आठवडी बाजार भरायचा त्यातसुद्धा बाजारात मोकळया पिशव्या घेऊन जाणे आणि आमच्या व्यवहारचतुर भगिनींनी त्या भरून दिल्या की "फोडिले भांडार धन्याचाच माल मी तो हमाल भारवाही"अशा नि:संग वृत्तीने त्या खांद्यावरून घरी आणून देणे आणि आईच्या ताब्यात देणे एवढीच आमची म्हणजे माझी आणि माझ्या धाकट्या भावाची-(त्यानेही अगदी लक्ष्मणासारखा वडील भावाचाच आदर्श समोर ठेवला होता) भूमिका असे. आपण काय आणि कोणत्या भावाने आणतो याविषयी आम्ही इतके अनभिज्ञ असायचो की. त्यामानाने कापूस आणि मीठ पाठीवरून वहाणारी इसापाची गाढवही जरा जास्त जाणीवपूर्वक माल वहात असतील. पण त्यामुळे आम्हाला काहीही वस्तु खरेदी करून आणायला सांगण्याचे धाडस कोणी करत नसे. नाही म्हणायला वडिलांना दिवसातून एकवेळा लागणारे भिकुसा यमासा क्षत्रिय यांच्या

उंटछाप विडीचे एक बंडल आणि त्याच्याकडे अधून मधून येणाऱ्या मित्रासाठी पिवळा हत्ती छाप सिगारेट पाकीट या दोन वस्तूंची खरेदी मात्र करायला वडिलांना आमच्यापैकी कोणीही चालत असे. सुदैवाने त्या खरेदीचा चोरून उपभोग घेण्याचा मोह आम्हाला कधीच झाला नाही त्याचेही कारण खरेदी केलेली वस्तू ज्याच्यासाठी असेल त्याला एकदाची देऊन मोकळे होण्याची आमची वृत्तीच!

मध्यंतरीच्या काळात महाविद्यालयीन शिक्षणासाठी शहरात एकटा राहू लागल्यावर खरेदीतील हा माझा अनुशेष भरून काढण्याची संधी जरी मला प्राप्त झाली होती. तरी त्यासाठी लागणाऱ्या दामाजीपंतांची मेहेरनजर आमच्यावर नसल्यामुळे आणि तशाही अवस्थेत जी काही आवश्यक खरेदी असे तीही पुण्यासारख्या शहरात करायची पाळी आल्यामुळे "आधीच उल्हास तशात फाल्गुनमास" अशीच परिस्थिती होती. आज पुण्याच्या बाजारपेठेत फिरणाऱ्यांना मी ज्याकाळचे वर्णन करत आहे त्यावेळच्या अतिउच्चसंस्कारित विक्रय तज्ञांची कल्पना करता येणेही जरा कठीणच आहे. आताही त्याचे काही सन्माननीय अवशेष पहायला मिळतात पण ते बरेच दुर्मिळ झाले आहेत असे म्हणायला हरकत नाही.

त्याकाळात पुण्यातील बाजारपेठेत व्यापार म्हणजे अगदी नाइलाजाने करावयाची गोष्ट असे मानणाऱ्या दुकानदारांचाच जास्त भरणा होता.

त्यामुळे पुण्यातल्या बाजारपेठेतील विक्रेते ग्राहकावर आपला कमीतकमी वेळ कसा जाईल याबाबतीत इतकी दक्षता घेताना दिसत की वेळ आणि हालचाल (time and motion)याचा अभ्यासक गिलब्रेथ याने पुण्याच्या बाजारपेठेचा फेरफटका मारला असता तर आपल्या एक डझन मुलांना वेळेचा जास्तीतजास्त कसा सदुपयोग करावा याचे धडॅ देण्यात आपला वेळ आपण उगीचच वाया घालवला त्याऐवजी त्यांना पुण्याच्या बाजारात पाठवून द्यायला हवे होते असे त्याला वाटले असते.

टिळक आगरकरांची तत्वपालनाविषयीची आग्रही वृत्तीही विक्रेत्यांच्या अंगी पूर्णपणे बाणली असल्यामुळे आपल्याला काय हवे याची ग्राहकाला पूर्ण कल्पना असायला हवी असा त्यांचा आग्रह असे. त्यामुळे साडीच्या दुकानात गेल्यावर ग्राहकाने नुसते "साडी दाखवा" म्हटले तर हमखास "कसली हवी?" हा प्रश्न विक्रेता विचारणारच. कारण याविषयी ग्राहकाने पूर्ण विचार करूनच आपल्या दुकानात पाऊल टाकायला हवे अशी त्याची इच्छा असे.

आपल्याला हव्या असणाऱ्या साडीचा रंग, पोत, काठाची आणि पदराची नक्षी याची किंवा छापील म्हणजे प्रिंटेड साडी हवी असेल तर छपाईत कोणते रंग, किती फुले, किती पाने प्रति चौरस सेंमी मध्ये असावीत याची पूर्ण कल्पना ग्राहकाला असायलाच हवी किंवा शर्ट किंवा पॅंटसाठी कापड हवे असेल त्यावर डिझाइन कशा प्रकारचे व रंगाचे हवे त्याचे साद्यंत

वर्णन ग्राहकाने करावे आणि आपला बहुमूल्य वेळ वाचवावा अशी दुकानदाराची अपेक्षा असे. यामागे साड्या किंवा कापडाचे तागे काढण्या आणि परत ठेवण्यात वाया जाणारा बहुमोल वेळ वाचवणे हाच साधा हिशोब असे.

या वाचलेल्या वेळेचा सदुपयोग हे दुकानदार सामाजिक कार्यात म्हणजे भारताचे आर्थिक धोरण आणि त्याचे जगावरील परिणाम किंवा जागतिक मंदी आणि त्याचा भारतीय बाजारपेठेवर परिणाम किंवा सामाजिक क्रांती अशा गहन विषयावर चर्चा करण्यासाठी करत आणि या चर्चेमध्ये ते इतके रंगत की कापड मोजतानाही ती चर्चा बंद करणे त्याना मानवत नसे त्यामुळे ते आपल्याला हवे तेच आणि तेवढेच कापड देतात की नाही यावर आपल्यालाच डोळयात तेल घालून लक्ष ठेवावे लागे. कापड फाडताना त्यांचा आवेश आपण प्रतिपक्षाच्या मताच्याच चिंधड्या चिंधड्या करत आहोत असा असे.

विक्रेत्यांच्या या काटेकोरपणामुळे आणि माझ्या मुखदुर्बळपणामुळे बूट खरेदी करायला गेलेला मी बुटाबरोबर चपलाची जोडी पण खरेदी करून दुकानाबाहेर पडलो आहे असे होण्याऐवजी विक्रेत्याने दाखवलेल्या कमीतकमी बुटांच्या जोडीमधूनच आपल्याला खरेदी करणे भाग आहे या कल्पनेने एकादी ढगळ बुटांची जोडी गळयात पडल्याने त्यात कागदाचे पॅकिंग घालून आणि तरीही बूट पायातून निसटतात

की काय या भीतीने हळूहळू चालणे किंवा फार घट्ट बूट गळयात पडल्यास ते घालून लंगडत चालणे किंवा ते बूट चावल्यामुळे झालेल्या जखमांमुळे अनवाणीच चालावयास लागणे अशाही संकटात सापडलो होतो.

लग्नानंतर अर्थातच खरेदीचे खाते माझ्यावर सोपवण्यात आले नाही कारण त्यामुळे हव्या त्या वस्तु हव्या त्या वेळी घरात येणार नाहीत याविषयी गृहखात्याची खात्रीच असावी. त्यामुळे मी माझी नेहमीचीच दुय्यम सहाय्यकाची भूमिका इमाने इतबारे बजावत असतो. मात्र त्यामुळे एक महत्वाचा तोटा असा होतो की कधी कधी गृहखात्याने एकाद्या वस्तूच्या खरेदीविषयी असमर्थता व्यक्त केल्यास खरेदीसाठी तज्ञ व्यक्तीची नेमणूक करणे भाग पडते. घरगुती तज्ञ माझ्या शत्रुपक्षातले म्हणजे बायकोचे नातेवाईक असतात पण त्यांची नेमणूक करण्याची जबाबदारी मात्र माझ्यावर असते. हा प्रकार कालिदासासारखे आपण झाडाच्या ज्या फांदीवर बसलो ती आपल्याच हाताने कापणे (तेही अगदी समजून उमजून) त्यातलाच प्रकार!

या तज्ञ व्यक्तींच्या सल्ल्याविषयी माझा अनुभव काही फार उत्साहवर्धक नाही. त्या/तिच्या सल्ल्याने खरेदी करण्यात आलेली वस्तु हमखास खराब निघते किंवा बिघडते. पण तज्ञ व्यक्तीची नेमणूक ती वस्तू का बिघडली किंवा ती बिघडण्यामागे आमचाच कसा हात आहे याचे विश्लेषण करण्यासाठीच असल्यामुळे त्यांच्यावर टीका करणेही शक्य

नसल्याने मीरेप्रमाणे हसत हसत हा विषाचा प्याला प्यावा लागतो. त्यामुळे झालेला गोंधळ जरी मला निस्तरावा लागला नाही तरी होणारे नुकसान मात्र घरंदाज घराण्यातील सुनेसारखे (ही वस्तु दूरदर्शन मालिकात मुबलक प्रमाणात दिसू लागली आहे)निमूटपणे सोसावे लागते

मात्र ज्या पुण्याने माझ्या खरेदीतील अरुचीला जास्तीत जास्त खतपाणी घातले त्याच पुण्यात आज परिस्थिती बरीच सुधारलेली दिसते. कौंटरवर कापडाचे शेकडो तागे किंवा साड्या पडल्या आहेत तरीही समोरील पुरंध्री स्वत:च्या चेहऱ्याची घडी अजिबात बिघडू देत नाही पण त्यामुळे नाउमेद न होता पहिल्यापेक्षाही अधिक उत्साहाने आणखी तागे अथवा साड्यांचे ढीग हसतमुखाने काढणारा किंवा काढलेल्या ढिगातील खालून दुसरी किंवा तिसरी (हे या स्त्रियांच्या बरोबर कसे लक्षात रहाते हे त्यांचा निर्माताच जाणे ) साडी परत एकदा दाखवा या विनंतीला मान देताना तिची मानच चिरून टाकावी अशी मनातील तीव्र इच्छा लपवून ती आपल्याला एकादा गौरव पुरस्कारच देत असल्यासारखा चेहरा करून त्या ढिगात हात खुपसून बरोबर तीच साडी बाहेर काढणारा विक्रेता आपल्याला स्वप्नातच पहायला मिळेल असे मला वाटायचे पण ते आता प्रत्यक्षात उतरलेले दिसते.

आता तर सगळीकडे अगदी मॉलामॉल झाल्यामुळे स्वत:च दुकानात हिंडून हव्या त्या वस्तु हातगाडीत टाकून बाहेर पडताना त्याची

किंमत चुकती करण्याची पद्धत आपल्याकडेही बरीच रुजायला लागली आहे. त्यात हवी ती वस्तु न सापडण्याची एक किरकोळ अडचण असते पण त्यासाठीही त्यांचे सहाय्यक तत्परतेने मदत करायला तयार असतातच. हे लोक तर तुम्हाला खरेदी करायला लावण्याचा चंग बांधूनच बाजारात उतरले आहेत त्यामुळे एकावर एक (किंवा दोनसुद्धा )फुकट हा प्रकार इथेही रूढ झालेला आहे. इतक्या प्रलोभनामुळे तरी मी खरेदीचा आळस सोडेन असे वाटण्याचा काळ मात्र आता केव्हाचाच गेला आहे. मात्र याची पूर्ण कल्पना इतराना असल्याने "धाडू नको मज बाजारी " असे म्हणण्याची पाळी मात्र क्वचितच माझ्यावर येते.

# ४. उंडे, दिंडे, मांडे आणि असेच!

हा लेख जरी खाद्यपदार्थाविषयी असला तरी पाककृती नाही हे वाचनानंतर समजू शकेल.

उंडे, मांडे आणि दिंडे या तीन वस्तूंमध्ये साम्य काय आहे असे विचारल्यास फक्त त्यांच्या उच्चार साधर्म्याचाच विचार डोक्यात येण्याची शक्यता आहे. कारण या तीनपैकी दोन पदार्थांची तर नावेही किती लोकांना माहीत असतील याविषयी शंकाच आहे. कदाचित उंडे आणि मांडे ही तर आडनावे म्हणूनच लोकांना जास्त परिचित असतील. या तीनही पदार्थात एक महत्वाचे साम्य आहे ते म्हणजे आता हे आपल्याकडे फार कमी कुटुंबात बनवले जातात.

आषाढ महिन्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे अमावास्येला दिव्याची अंवस म्हणतात. त्यादिवशी दिव्यांची पूजा करण्यात येते. त्यादिवशी करण्यात येणारा विशिष्ट खाद्यपदार्थ म्हणजे उंडे. मात्र आता ते आमच्याकडेही बनत नाही हा पदार्थ बाजरीची भरड काढून त्यापासून बनवतात. त्या भरडीपासून मोठ्या दिव्याच्या आकाराचे हे उंडे बनवत असत. त्यासाठी आईची तयारी आदल्या दिवसापासूनच सुरू होत असे. चांगली बाजरी आणून त्या धान्याची भरड घरच्याच जात्यावर करावी लागे

कारण हा पदार्थ वर्षातून एकदाच होत असल्याने गिरणीत तशी भरड काढून मिळण्याची सोय नसे. तशी भरड काढून अंवसेच्या दिवशी सकाळी त्या भरडीत चवीपुरते मीठ घालून पोकळ शंकूच्या(मोठ्या दिव्याच्या) आकाराचे उंडे आई बनवत असे आणि नंतर ते उकडून काढत असे. हा पदार्थ मग आम्ही मोठ्या आवडीने दुधात गूळ कालवून केलेल्या गुळवणीत कुस्करून खात असू. लग्नानंतर माझ्या बायकोनेही ही परंपरा काही दिवस संभाळली, पण एका वर्षी अरगट मिश्रित बाजरी खाण्याने काही लोक दगावल्यामुळे त्यावर्षी बाजरी खाणेच आम्ही सोडले. त्यामुळे एका दिवसासाठी एवढा उपद्व्याप करायला तिला नकोसे वाटू लागले शिवाय आमच्या मुलांना हा पदार्थ फार हवाहवासा वाटत नसल्याने उंड्यांचे उच्चाटण आमच्या घरातून झाले ते झालेच.

दुसरा एक असाच जवळजवळ नामशेषच झालेला पदार्थ म्हणजे दिंडे. श्रावणाच्या सुरवातीसच येणाऱ्या नागपंचमीला होणारा हा पदार्थ. नागपंचमीच्या कहाणीत शेतकऱ्याच्या नांगराचा फाळ लागून शेतातील नागाच्या पिलांची हत्या झाल्यामुळे नागाच्या दंशाने शेतकऱ्याचा निर्वंश झाला पण शेतकऱ्याच्या सुनेच्या नागपूजनाने संतुष्ट झालेल्या नागिणीने त्या शापास उ:शाप दिला असे वर्णन केले आहे त्यामुळे त्यादिवशी काहीही कापायचे नाही, तळायचे नाही, शेत खणायचे नाही, तव्यावर काही भाजायचे नाही असा प्रघात! आमच्या घरात तो अजूनही टिकून आहे

त्यामुळे त्यादिवशी मला दाढीही करायची बंदी आहे. हे सगळे सांगायचे कारण म्हणजे या अटीत बसणारा खाद्यपदार्थ त्यादिवशी करायचा असल्यामुळे त्यादिवशी दिंडे असतात. हा पदार्थ कणीक लाटून त्यात पुरण भरून त्याच्या चौकोनी घड्या करायच्या आणि त्या उकडून काढायच्या. त्यामुळे त्यादिवशी भाजीही चिरून करायची नाही असा प्रघात आहे आणि अजूनही आमच्या सौभाग्यवतीच्या राज्यात तो चालू आहे. हाही पदार्थ वर्षातून एकदाच होतो.

मांडे हा पदार्थ तर कर्नाटकातलाच आहे. आपल्याकडे वाक्प्रचारात मात्र "मनातले मांडे खाणे" आहे. कदाचित आपण बनवू शकत नसल्यामुळे असा हा वाक्प्रचार आला असावा. मी तरी हा पदार्थ कानडी मित्राच्या लग्नसमारंभातच खाल्ला आहे आणि त्यांच्या लग्नसमारंभात मात्र तो असावाच लागतो असे दिसते. आमच्या घरी मात्र हा पदार्थ अजूनपर्यंत कोणी बनवला नाही. तो बनवण्याचे काम मोठ्या कौशल्याचे असते हे तो इतरांना बनवतांना पाहून बनलेले माझे मत आहे. त्यासाठी मोठ्या पाठीचा मातीचा घडा लागते. त्यामुळेच ज्ञानेश्वरांना मांडे खाण्याची लहर आल्यावर जेव्हां धर्माभिमान्यांनी त्यांना मातीचे भांडे मिळू दिले नाही तेव्हां त्यांना जठराग्नी प्रदीप्त करून आपल्या पाठीवर मांडे करण्याची आज्ञा मुक्ताबाईला करावी लागली. हा पदार्थ म्हणजे अतिशय पातळ अशी

पिठिसाखरेची पोळीच असते आणि तीही पुरणपोळीप्रमाणे दुधाबरोबर खातात.

असाच एक फारच कमी लोकांना माहीत असलेला पदार्थ म्हणजे चकुल्या. आमच्या लहानपणी हा महिन्यातून एकदोनदा तरी व्हायचा. त्यात कणकेच्या पोळ्या लाटून त्याचे चिरण्याने चौकोनी तुकडे करून ते अगोदरच केलेल्या आमटीत शिजवून काढायचे. हा पदार्थ केल्यावर इतर काहीच करावे लागत नाही कारण मग भाजी चटणी वा कोशिंबीर यांची आवश्यकताच नसते. काही लोक याच पदार्थास वरणफळेही म्हणतात. आम्ही अमेरिकेत गेल्यावर तेथे करण्यात येणाऱ्या पास्त्याचा वापर करून हा पदार्थ करायचे आणि त्याचे नाव आम्ही पास्तुल्या ठेवले होते.

अजून एक असाच नामशेष झालेला पदार्थ म्हणजे शेंगोळ्याची आमटी. हे शेंगोळे म्हणजे निरनिराळ्या दाळींची भरड एकत्र करून त्याच्या केलेल्या छोट्याछोट्या गोळ्या. त्या आमटीत टाकून शिजवल्या गेल्यावर आमटीस छान चव येत असे. एकदा आमच्या लहानपणी असेच पाहुणे आलेले असताना हा पदार्थ केला होता. पाहुण्यांना हा पदार्थ हवा का असे आईने माझ्या बहिणीस विचारावयास सांगितले तर ती वेडी त्यांना काही न विचारता " पाव्हण्यांना शेंगोळे पाहिजेत का असे कसे विचारू? " असे म्हणून (कारण शेंगोळे या शब्दाचे शेणगोळेशी असलेल्या

उच्चारसाम्यामुळे) जे हसत बसली ती आईचा धपाटा पाठीत बसल्यावरच भानावर आली.

मांडे सोडून आपण उल्लेखिलेले पदार्थ आईने आम्हाला अनेकदा हौसेने करून घातले होते. आजही कांही पदार्थ होतातच, पण ती चव नाही. विशेषतः शेंगोळे.. एक पदार्थ आठवला तो म्हणजे हुलग्याचे माडगे. लसणाच्या स्वादाचे हे हुलग्याचे सूपच म्हणा ना! असे पदार्थ पचविण्याची क्षमताही जरा कमीच झाली आहे.

याशिवाय घरात बरीच माणसे असल्यामुळे आईच्या हातून अगदी मोजका स्वयंपाक होत नसल्यामुळे कधी भाकरी, तर कधी पोळया तर कधी भातही दुसऱ्या दिवशी शिल्लक उरे व असे उरलेले अन्न भिकाऱ्यास देण्याइतकी आमची सांपत्तिक स्थिती उच्च कोटीतील नव्हती, उलट बरेचदा शाळा सकाळी असताना मधल्या सुट्टीत खाण्यासाठी आजच्यासारखे समोसे, बटाटेवडे किंवा पिझ्झा हे शब्दही आईला माहीत नव्हते व आम्हालाही शिळी भाकरीच तिखट चटणीबरोबर गोड लागायची व अश्या उरलेल्या पदार्थांचा फन्ना उडायचा.

पण खूपच भाकऱ्या अथवा भात उरला तर मात्र त्या भाकऱ्यांचे तुकडे करून त्याला तिखटमीठ घालून फोडणी दिलेल्या प्रकारास सरळ तुकडेच आम्ही म्हणायचो व भाताला तसेच केल्यावर त्याला सरळ फोडणीचा भात म्हणून मोठ्या आवडीने हे पदार्थ खाल्ले जात.

मराठवाड्यात काही वर्षे काढल्यामुळे त्या पदार्थांना भाताला मनोहरराव व तुकड्यांना सुशिलाबाई अशी काव्यात्मक नावे दिली जात. औन्ध संस्थानात तर पौष किंवा माघ (निश्चित आठवत नाही)एका शुक्रवारी खास तुकडे बनवूनच औन्धातील देवीच्या डोंगरावर पायऱ्या चढून जाऊन मधल्या सपाटीवर बसून त्याची मेजवानी व्हायची व त्या शुक्रवारला "तुकडे शुक्रवार असेच नाव होते. चकुल्या मात्र पंधरा-एक दिवसातून एकदा खायला मिळतात. अमेरिकेतून परतल्यावर अमेरिकन भारती असा एक पदार्थ त्याजागी आम्ही करू लागले आहोत तो म्हणजे पास्तुल्या.

सध्या मात्र खाद्यसंस्कृतीने एवढे मूळ धरले आहे की नवनवे पदार्थ करण्याच्या कृति, वर्तमानपत्रात, यू त्यूब वर येत अस्तात.. दूरदर्शनवर तर खाना खजाना, किचन कल्लाकार असे खास खाद्यकार्यक्रम असतात. संजीव कपूर वगैरे शेफ सध्या फारच भाव खाऊन आहेत. अमेरिकेतही या शेफच्या स्पर्धांची स्वतंत्र वाहिनीच आहे व माझा नातू ती फार आवडीने पहातो, या नातवाला जर आदल्या दिवशीच्या उरलेल्या पोळया उरल्या तर त्यांचा चिवडा (आम्ही ज्याला तुकडे म्हणत होतो) फारच आवडतो इतका की कधी कधी खास पोळया करून त्याचे तुकडे करून चिवडा बनवावा लागतो. तर एकूण काय एक खाद्यसंस्कृती लयास गेली तरी दुसरी आणखी नवनव्या खाद्यपदार्थांची संस्कृती जन्माला येत्येय यात संशयच नाही.

# ५. विठ्ठल तो आला आला

रंगभूमीला पाय लावण्याचे धाडस (किंवा पाप) माझ्याकडून प्रथम घडले ते मलाही नकळत! अर्थात त्यानंतर कळून सवरून रंगभूमीवर प्रवेश करूनही त्या पापाचे लन मात्र मी करू शकलो नाही त्याचीच ही कहाणी!

प्रथम चुकून हे पाप माझ्याकडून कस्र घडले ते सांगतो. आमच्या संस्थानचे अधिपती मा. बाळासाहेब पंत प्रतिनिधी यांना साहित्य, ललितकला यांची आवड आणि गोडी होती. ते स्वत: उत्तम चित्रकार होते, उत्तम कीर्तन करीत आणि एका वर्षी अखिल भारतीय मराठी साहित्यसम्मेलनावे अध्यक्षपदही त्यानी भूषवले होते. त्याना व्यायामाची आवड होती आणि सूर्यनमस्काराचे ते खंदे पुरस्कर्ते होते. (त्यांच्या सूर्यनमस्काराच्या वेडावरच आ. अत्रे यांनी " साष्टांग नमस्कार" हे नाटक लिहून त्यांचा रोष ओढवून घेतला होता त्यामुळे अनेक साहित्यिक आमच्या गावी निरनिराळया प्रसंगी येऊन गेले पण आ. अत्रे यांना मात्र महाराजानी कधी बोलावले नाही. महाराजांच्या निधनानंतरच ते आमच्या गावी आले ते "श्यामची आई " या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी! )

महाराजांच्या या कलाप्रेमामुळे संगीत, नाट्य, चित्रकला या सर्वांना संस्थानात अतिशय महत्त्वाचे स्थान होते. वर्षातील एक महिना

राजवाड्यातील दरबार महालात कीर्तनमहोत्सव होत असे तर नवरात्र मंडप या त्यावेळी भव्य वाटणाऱ्या मंडपात निरनिराळ्या नाटकांचे प्रयोग होत असत. त्यातील एका नाटकात महाराजांच्या कुटुंबातील मुले आणि मुली सह्भागी होत. ही मुलेमुली कीर्तनसमारंभातही भाग घेत. अभिनयाचे चांगलेच अंग त्यांच्यापैकी काहीजणाना होते. त्यामुळे ही नाटके खूपच रंगत आणि गावातील आबालवृद्ध त्यांचा उत्साहाने आनंद लुटत. नाटकात काही हौशी प्रजाजनांना पण भाग घेता येत असे. आणि अशी हौशी मंडळी खरोखरच अतिशय उत्तम अभिनय करत.

एका वर्षी या समारंभात " आग्र्याहून सुटका " हे नाटक सादर करण्यात आले. विशेष म्हणजे त्या नाटकात माझ्या वडिलांनी आणि मोठ्या बहिणीने पण काही किरकोळ भूमिका निभावल्या होत्या. बहीण आणि वडील त्या नाटकात असल्यामुळे आणि मी तीन चार वर्षाचा लहान मुलगा असल्याने मला रंगभूमीच्या अंतर्भागात प्रवेश होता. त्यावेळीच्या नाटकात निरनिराळ्या दृश्याचे पडदे असत. आणि प्रवेशाच्या मागणीप्रमाणे योग्य तो पडदा गुंडाळला अथवा सोडला जाई. एका वेळी कधीकधी दोन तीन पडदे सोडलेले असायचे आणि आवश्यकतेनुसार त्यातील सर्वात बाहेरील पडदा गुंडाळला जायचा. दोन तीन पडदे सोडलेले असल्याने मधल्या जागेतून इतरेजनांची आवकजावक चाले. अशा एका प्रवेशाचा पडदा वर घेतला जात आहे हे लक्षात न आल्यामुळे तो पडद्यामागील मोकळा भाग आहे

असे समजून मी त्या मधल्या भागातून एका विंगमधून पलीकडच्या विंगेत जात असतानाच पडदा वर गेला आणि मी रंगभूमीवरूनच पलायन केल्याचे सर्वांच्या नजरेस पडले. आता हा माझा रंगभूमीवर चुकून झालेला प्रवेशही महाराजांनी अचूक हेरला. दुसऱ्या दिवशी नाटकात भाग घेतलेल्या नागरिकांना वाड्यातल्या भोजनाला बोलावले तेव्हा त्यांनी वडिलांना " मास्तर तुमच्या मुलालाही घेउन या बरका, त्यान पण रंगमंचावर प्रवेश केलेला आम्ही पाहिला आहे. " असे सांगितले. माझे रंगभूमीवरील पदार्पण हे असे मला नकळत घडले होते.

या पदार्पणाच्या जोरावर पुढे आपण रंगभूमीचे पांग फेडावे असे मात्र मला वाटण्याचे कारण नव्हते शिवाय आजच्यासारखा निरनिराळ्या वाहिन्यावरील सान थोर कलाकारांचा गुणवत्ताशोध त्या काळात नसल्यामुळे आपल्या पाल्याच्या अंगातील कलागुणाविषयी पालक अगदीच उदासीन असायचे इतके की खरोखरच कलागुण असलेल्या मुलांना घरातून पळून जाऊनच आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करावे लागायचे त्यामुळे शाळेतील नाटकात काम करण्यासाठी मुलांना अक्षरश: बळेबळे घोड्यावर बसवावे लागायचे. आणि त्यात आमच्यासारखे वर्गात हुषार म्हणून नावाजलेले विद्यार्थी सापडायचे. मी अभ्यासात हुषार असल्याने नाटकातही मला भाग घ्यावाच लागला. कदाचित मी निदान

आपली नक्कल तरी चोख पाठ करीन याविषयी शिक्षकांना असलेल्या खात्रीचाही त्यात महत्वाचा भाग असेल.

मला आठवते तसे "कृष्ण सुदामा" या एकांकिकेत ऋषिकुमाराची भूमिका माझ्या वाट्याला आली होती. अर्थातच त्या भूमिकेला अनुसरून अंगावर धोतरच काय ते होते, उत्तरीय वगैरे ऋषिकुमाराला परवडण्याची शक्यता नव्हती. माझी नक्कल चोख पाठ होती पण ते नोव्हेंबर डिसेंबर असे थंडीचे दिवस होते आणि सध्या आपल्या पर्यावरण अनास्थेमुळे उत्पन्न झालेली परिस्थिती तेव्हां नसल्यामुळे त्यावेळी कडाक्याची थंडी पडे. शाळेच्या पुढील पटांगणावर रंगमंच उभारलेला होता. त्यामुळे रंगमंचाबर प्रवेश करताच उघड्या अंगावर थंडीचा मारा झाल्यामुळे ऋषिकुमाराची अशी दातखीळ बसली की पाठ असलेली नक्कल बाहेर पडायलाच तयार होईना. म्हणजे रंगभूमीवरील माझे दुसरे पदार्पणही असे नि:शब्दच झाले.

एवढ्या रंगभूमीच्या परिचयानंतर शिक्षकांचा आग्रह झाला तरी पुन्हा तोंडाला रंग लावायचा नाही असा ठाम निश्चय मी केला. आणि हा निश्चय पुढे बरीच वर्षे टिकला. नोकरीनिमित्त औरंगाबादला गेल्यावर शासकीय वसाहतीत जागा मिळाली तेथे वसाहतीच्या स्नेहसंमेलनात एका वर्षी " दिवा जळू दे सारी रात" चा प्रयोग केला त्या वेळी माझ्यासारख्या ब्रह्मचाऱ्याला नाटकात काम करण्यापेक्षा त्यातील मुख्य काम करणाऱ्या युवतीवर आपला प्रभाव कसा टाकता येईल याचेच जास्त आकर्षण होते

पण माझ्यासारखे बरेच भुंगे एकाच फुलाभोवती रुंजी घालत असल्यामुळे त्यात माझी दाळ शिजण्याचा संभव फारच कमी किंवा मुळीच नव्हता म्हटले तरी चालेल तरी पण प्रॉम्प्टरची भूमिका मी इमानेइतबारे संभाळली. कारण डोंबाऱ्याच्या गाढवाने डोंबाऱ्याची सुस्वरूप पोरगी दोरावरून खाली पडेल आणि डोंबाऱ्याच्या धमकीप्रमाणे तो आपले लग्न तिच्याशी लावून देईल अशी आशा बाळगावी तशी नक्कल चोख पाठ करण्याच्या माझ्या गुणाचा फायदा एकादे पात्र योगायोगाने आजारी पडले तर मला होईल अशी आशा मी मनात बाळगली होती एवढे मात्र खरे पण तसा योग काही आला नाही.

त्यानंतर थोड्याच दिवसानी आमच्या महाविद्यालयाच्या स्नेहसम्मेलनात प्राध्यापकांनी एक नाटक करावे असे आमच्याचपैकी कोणाच्या तरी टाळक्यात शिरले. त्यावेळी आमचे विद्यार्थी चांगली नाटके करत असताना असली नसती उठाठेव करण्याचे खरे तर आम्हाला काही कारण नव्हते आणि त्यातही नि:शब्द भूमिकाच पार पाडण्याची सवय असलेल्या मला तर त्यात पडण्याचे मुळीच नव्हते. पण आतापर्यंत रंगभूमीवर इतरांनी मला ढकलल्यामुळे मी तिच्यावर अन्याय केला असा आरोप कुणी करू शकत नव्हते तेव्हां एकदा करूनच पाहू या असा विचार मी केला असल्यास नकळे!

या वेळी आम्ही पु. ल. देशपांडे यांचे " विठ्ठल तो आला आला " करायचे ठरवले होते आणि ते अतिशय विनोदी असल्याने आमच्या प्रयोगामुळे लोकांची हसून हसून पुरेवाट होईल असा आम्हाला विश्वास वाटत होता. त्यात मी विठ्ठलाची भूमिका करायचे ठरले आणि बराच वेळ आपण कडेवर हात ठेवून उभेच रहायचे असल्यामुळे आणि शेवटी विठ्ठल बोलतोय हे नाटकातील कुणालाच कळत नसल्यामुळे ही भूमिका आपण अगदी व्यवस्थित पार पाडू असा मला का कोण जाणे भरवसा वाटत होता. विठ्ठल बोलतो आहे हे नाटकातील कोणाला कळत नसले तरी बाहेर प्रेक्षकांना कळायला पाहिजे हे मात्र मी पारच विसरून गेलो.

मी नाटकात काम करणार आणि तेही विठ्ठलाचे या कारणामुळे कधी नव्हे ते माझ्या आईनेही त्यासाठी हजेरी लावली. जोपर्यंत मी गाभाऱ्यात उभा राहून बोलत होतो आणि प्रेक्षकांना माझा फक्त आवाजच ऐकू येत होता तोपर्यंत माझ्या दृष्टीने सारे काही ठीक चालू होते कारण बाहेर काय चालू आहे हे मला दिसत नव्हते, नाहीतर प्राध्यापकांच्या तासाला आरडाओरडा करणाऱ्या विद्यार्थ्यांना आम्ही इतकी उत्तम संधी उपलब्ध करून दिली आहे हे माझ्या लगेचच लक्षात आले असते. अर्थात आमचे नाटक योग्य दिशेने गेले असते तर कदाचित त्या विद्यार्थ्यांनीही आवरते घेतले असते पण मी गाभाऱ्यातून बाहेर आल्यावर तर मला पाहूनच जिकडे तिकडे हास्याचे स्फोट होऊ लागले इतका काळ्या रंगाचा मनसोक्त वापर

आम्हाला रंगवणाऱ्या वेषभूषाकाराने केला होता. पण त्यामुळे हा भूमिका करणारा कोण माणूस आहे याचा अंदाज विद्यार्थ्यांनाच काय पण कोणालाच येऊ शकत नव्हता ही माझ्या दृष्टीने एक जमेची बाजू.

आजपर्यंत नाटकात केवळ नि:शब्द भूमिका करावयास मिळाल्याचा वचपा मात्र मी भरपूर आरडाओरडा करून भरून काढला. पण त्यावरून माझ्या लेक्चरला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी हा कोणाचा आवाज हे बरोबर ओळखून भरपूर शंखनाद करून आपला आनंद साजरा केला. एकूण पु. ल. देशपांडे यांनीही कल्पना केली नसेल इतका विनोदी प्रयोग करण्यात आम्ही यशस्वी ठरलो होतो फरक एवढाच की तो ऐकू आल्यामुळे विनोदी वाटला असता आणि हा मात्र ऐकू न येताच विनोदी झाला होता. नेहमीच संयमी प्रतिक्रिया व्यक्त करणारे आमचे प्राचार्य सुद्धा म्हणाले " या नाटकाचा इतका वाईट प्रयोग होऊ शकतो हे आम्हाला आजच समजले. " सगळ्यात मार्मिक प्रतिक्रिया होती माझ्या आईची ती म्हणाली, "माझ लेकरू विठ्ठल होणार म्हणून हौसेने बघायला आले आणि विठ्ठल गाभाऱ्यात होता तेच बरे होते उगीचच बाहेर आला अस वाटायला लागल" अर्थात माझ्या रंगभूमीवरील कारकीर्दीचा तेथेच शेवट झाला हे वेगळे सांगायला हवे असे नाही हे उघडच आहे.

# ६. किल्ली

किल्ली ही वस्तु हरवण्यासाठीच जणु असावी! . तशी जगात निर्मिलेली कोणतीही वस्तु हरवू शकते. म्हणजे ज्या वस्तु जागेवरून हलू शकत नाहीत अश्या वस्तूसुद्धा हरवू शकतात उदा: विहीर किंवा लालूच्या राज्यात अगदी धरण अगर चार पदरी रस्तासुद्धा हरवू किंवा चोरीला जाऊ शकत असे. अर्थत आता ती मक्तेदारी इतरांनी मोडून काढली आहे. मग बारिक सारिक म्हणजे विद्यार्थ्यांना शाळेत ज्या वस्तु देण्याचे शासकीय नियोजन असते त्यातील अनेक वस्तु हरवतात किंवा चोरीला जातात. त्यात विशेष ते काय? विद्यात्र्यांची न्याहारी आणखीनच कोणा लठ्ठ पोटात जाते. कधी कधी माणसेही हरवतात बऱ्याच वेळा किल्ली एकटी न हरवता आपल्या सर्व सोबतिणींसह गायब होते म्हणजे किल्ल्यांचा जुडगाच हरवतो मग तर काय तो हरवणाऱ्याच्या दुर्दशेला पारावारच उरत नाही.

ना. सी. फडके एके काळचे प्रसिद्ध लेखक आजच्या पिढीला त्यांचे नावच कदाचित माहीत असेल. ते प्रसिद्ध लेखक तर होतेच पण तितकेच व्यवस्थितपणाबद्दल पण प्रसिद्ध होते. त्यांच्या हातून त्यांच्या कपाटाची किल्ली हरवावी हे आश्चर्यच! कदाचित सौ. कमला फडके किंवा त्यावेळची चि. अंजली फडके यांचाच अजागळपणा असावा तो, सुदैवाने

त्या घटनेवर "हरवली म्हणून सापडली" असा एक लघुनिबंध अप्पासाहेबांनी (ना. सी. ना अप्पासाहेबच म्हणत) लिहिला आणि त्यामुळे (किल्ली शोधण्यात वाया गेलेला वेळ सत्कारणी लागला) म्हणून कदाचित अप्पासाहेबांनी त्या दोघींना माफ केले असावे. माझी प्रतिभा तितकी जागृत असती तर कालिदासाच्या पावलावर पाउल ठेवीत अज इंदुमती विलाप सारखे किल्लिविलाप अश्या संस्कृतप्रचुर नामाभिधानाचे एकच काय पण अनेक काव्ये मला लिहिता आली असती. कारण किल्लीशिवायही अनेक वस्तु मी हरवू शकतो.

घराची एकच किल्ली हरवण्यामुळे लगेच ज्याची किल्ली हरवते त्याला घराबाहेरच बसावे लागून किल्लीबरोबर घरातील यच्चयावत गोष्टींना मुकावे लागते. असा माणूस एकटाच असेल तर (कारण दुकटा असेल तर त्याच्याकडे दुसरी किल्ली असण्याची शक्यता असते) त्याला लगेचच किल्लीवाल्याला शोधून आणावे लागते. सुदैवाने किल्लीमेकर बहुधा रस्त्याच्या कडेला एकादा लोखंडाचा किंवा पितळेचा तुकडा घासत बसलेले दिसतात अर्थात आपण अडलेले असल्यामुळे त्याला घरी नेऊन त्याला किल्लीशिवाय कुलुप उघडावयास लावणे हे पहिले मोठे काम असते पण तो ते किल्लीशिवाय इतके पटकन् करतो की हे काम आपल्याला का जमत नाही असा विचार त्यावेळी मनात डोकावतो. मग आपल्या लक्षात येते की किल्ली ही वस्तु हरवण्यासाठी व नंतर ती तयार करून त्यातून

होणाऱ्या कमाईवर पोट भरणाऱ्या किल्लीमेकरसाठीच केलेली असते. साधी गोष्ट! कुलूप आणि किल्ली दोन्ही शाबूत असतात तेव्हां चोर किल्लीमेकरच्याच पद्धतीने किंवा त्याच्याहीपेक्षा चलाखीनं कुलूप उघडतो तेही आजूबाजूच्या घरातील लोकांना आवाज ऐकू जाऊ नये म्हणून नाहीतर एक घाव दोन तुकडे या पद्धतीनं तो आपल्या कुलुपाची वाट लावू शकतो. घरातील मौल्यवान वस्तु न्यावयास येणाऱ्यास त्या आपल्या दृष्टीने अमूल्य पण त्याच्या दृष्टीने अडचण असलेल्या कुलुपाची फार काळजी घ्यायचं काही कारण नसतं. किल्लीमेकरवर मात्र कुलूप शाबूत ठेवून किल्ली तयार करण्याची जबाबदारी असते

मी वसतीगृहात रहात असताना खोलीच्या सुरक्षिततेचे सुरवातीला प्रत्येक विद्यार्थ्यासिच महत्व वाटे त्यामुळे नुकताच गाव सोडून शहरात आलेला माझ्यासारखा मुलगा त्यातल्या त्यात भारी म्हणजे गोदरेजचे कुलुप घ्यायचा व थोड्याच काळात पस्तावायचा कारण गोदरेज त्यामानाने बरेच बळकट कुलूप होते त्याच काळात अगदी तसेच दिसणारे दुसरे एक कुलूप बाजारात उपलब्ध होते आणि त्या कुलुपाला त्या प्रकारच्या दुसऱ्या कुठल्याही कुलुपाची चावी चालायची त्यामुळे हळू हळू सर्व गोदरेज कुलुपांची जागा त्या कुलुपांनी घेतली कारण आमच्यासारख्या विद्यार्थ्यांच्या खोलीतून फारसा काही ऐवज मिळण्याची शक्यता नसल्याने चोर कदापि आमच्या खोलीकडे मोर्चा वळवायचा नाही त्यामुळे वर्षातून

हटकून एकदा किंवा दोनदा किल्ल्या हरवणारे आमच्यासारखे बहाद्दर तसे झाले की एकमेकांच्या किल्ल्या वापरून काम भागवायचो. पुढे पुढे तर किल्ली आमच्या खोलीच्या दाराच्या वरच ठेवलेली असायची म्हणजे प्रत्येकाला प्रत्येकाची खोली उघडणे शक्य व्हायचे. त्यात एकादा नुकताच गावाहून आला असेल तर त्याची खोली उघडून त्याने गावाहून आणलेल्या लाडू चिवड्याचा फन्ना उडवणे सोपे जायचे. बर किल्ली जरी दारावर नसली तरी सगळया कुलुपांना कोणत्याही किल्ल्या चालायच्या म्हणजे किल्लीवाल्याचे कसब त्यावेळी बऱ्याच अंशी सगळयाच विद्यार्थ्यांना जणु वश झाले होते.

पु. ल. देशपांडे यांच्या काळात या आमच्या पद्धतीचा शोध लागला नसावा नाहीतर सुनीतीबाईंना गावाहून आल्यावर आपला नवरा अतिशय काळजीपूर्वक किल्ली जवळच्या मित्राकडे ठेवून व तशी चिठ्ठीही आपल्याच बंद असलेल्या घरात ठेवून गेला आहे हे न कळल्यामुळे तो परत येईपर्यंत म्हणजे साधारण तीन चार तास दारात तिष्ठत बसावे लागले नसते. अर्थात पु. ल. ना नावे ठेवण्यात अर्थ नाही कारण मीही नुकतेच लग्न झाले असताना औरंगाबाद सोडून पुण्यास चार महिन्याच्या शैक्षणिक अभ्यासासाठी गेलो असताना बायकोशिवाय करमत नसल्यामुळे तिनेच पुण्यास यावे व तेवढाच मधुचंद्राचा लाभ घ्यावा (कारण त्यावेळी आमच्या घरात मी वडील बंधु असल्यामुळे माझी शिकणारी भावंडे व माता पिता

इतकी माणसे असल्यामुळे त्यामुळे आमच्या छोट्या घरात एकांत क्वचितच मिळत असे) असा विचार केला. बायकोला जरी तशी इच्छा असली तरी ती बिचारी नुकतीच सून म्हणून घरात आलेली तिने असे घर सोडून जावे हे माझ्या आईला जरी ती मालिकातील सासवांइतकी खाष्ट नसली तरी तिच्यावरील जुन्या काळच्या संस्कारामुळे पटणे अवघड होते.

बरीच वाट पाहून मी पत्नीला लंबेचवडे पत्र लिहून खोलीची किल्लीही पाठवून दिली, ज्यामुळे मी कामावर गेलॊ तरी तिला खोलीत प्रवेश करता यावा, इतके झाल्यावर मात्र आईला काय वाटले कोणास ठाऊक तिने सुनेला "जा बाई तू, त्याने किल्ली पाठवलीय आणि तू गेली नाहीस तर उगीच डोके फिरवून बसायचा "असे उद्गार माझ्याविषयी काढून तिची रवानगी केली. मी कुलुप लावून कामाला गेलो होतो, आणि खोलीवर परत येतो तो बिचारी दारात बसलेली! " अरे मी किल्ली पाठव्ली होती ना?" तिला असे बसलेले पाहून मी विचारले, "पण कुलूप उघडतच नाही" रडकुंडीला आलेल्या तिने किल्ली माझ्या हातात देत म्हटले आणि माझा मूर्खपणा माझ्या लक्षात आला की काही कारणाने मी तिला ज्याची किल्ली पाठवली होती ते कुलूपच बदलले होते. असो नवेच लग्न झालेले असल्याने शेवटी तिच्या रडण्याला हास्यरूप देण्यात मी कसाबसा यशस्वी झालो.

पण पुढील आयुष्यात घराच्या सुरक्षिततेविषयी इतके बेपर्वा राहून चालत नाही त्यामुळे शक्यतो आपल्या किल्लीशिवाय कोणाला उघडता

येऊ नये अश्या कुलुपाने घर किंवा कपाट बंदिस्त करायचा विचार आपण करतो. असे करण्यात खरे तर आपण आपलीच पंचाईत करून घेत असतो कारण चोर कधीतरी (किंवा कधीही नाही) आपल्या घराकडे फिरकणार पण आपण मात्र हरघडीला घर बंद करणार व उघडणार. बर चोर किल्लीवाल्याचे बारसे जेवलेला असल्यामुळे आपण घरात नसताना अगदी सहज आपले घर लुटून निघून जाणार फक्त जाताना दार तितक्या बंदोबस्ताने बंद करून न गेल्यामुळे आपले एक वेळा दार उघडण्याचे कष्ट वाचवणार ही चोरीच्या दु:खातूनही एक आनंदाची गोष्ट.! थोडक्यात कुलूप ही म्हणजे असून अडचण नसून खोळंबा या प्रकारातील गोष्ट आणि किल्ली ही फक्त नीट सांभाळणे व कधीतरी हरवली की सगळे उपद्व्याप करावे लागणारी गोष्ट.

त्या दृष्टीने शनि शिंगणापूरचे नागरिक सुखी म्हणता येतील कारण त्यांच्या घराला कुलूप लावायचेच नसते नाहीतर शनिदेव कोपतो आणि तेथे चोरी करण्याचे धाडस कोणी करत नाही असे म्हणतात, कारण शनिदेव कोपतो. यात कितपत तथ्य आहे हे मी शनिशिंगणापूरला रहात नसल्याने मला माहीत नाही. आता नवस्वातंत्र्याची पहाट उघडल्यामुळे इतर देवी देवतांप्रमाणे कदाचित शनिदेवही जागृत झाले असण्याची शक्यता नाकरता येत नाही.

शनिशिंगणापुरास रहात नसल्यामुळे घराला कुलूप लावणे व त्याची चावी संभाळणे हे काम माझ्यावर कधीतरी पडायचेच. विद्यार्थी जीवनात खोलीच्या कुलुपाची चावी हरवण्याचे विक्रमी प्रयोग मी केले. किल्ली शर्ट किंवा पॅन्टच्या खिश्यातूनच गायब होत असे नाही कधी कधी चहा पिऊन येताना चाव्यांचा जुडगा उंच फेकून झेलायची लहर मला यायची आणि कधी कधी त्या जुडग्याला माझ्या हातात परत न येता रस्त्यावरच्या विजेच्या तारेवरच मुक्काम ठोकायची लहर यायची अर्थात या प्रकारच्या अडचणीवर मात करणे मला शक्य नसायचे पण त्या काळातल्या कुलुपांचा दर्जा फारसा उच्च नसल्यामुळे माझे काम भागून जायचे पण पुढे गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यावरही किल्ल्या हरवण्याचे माझे कौशल्य मात्र फारसे कमी झाले नाही. कधी कधी धुवायला टाकलेल्या कपड्यात राहिलेल्या किल्लीमुळे वॉशिंग मशीनचेही बारा वाजवण्याचा पराक्रम मी केला आहे. आणि त्या काळात पूर्वीसारखी तकलादू कुलुपे वापरण्याचे दिवस गेले होते.

माझ्या लहानपणीच्या काळात जेव्हां कुटुंब मोठे असल्यामुळे कोणी ना कोणीतरी घरात असायचेच आणि त्यामुळे घराला कुलुप लावण्याचे प्रसंग अगदी सगळे लग्नाकार्यासाठी गावी गेले तरच यायचे आणि त्या वेळी किल्ली शेजारच्या घरी ठेवून जाण्याचा प्रघात असायचा त्यामुळे किल्ली हरवण्याची जबाबदारी घरातील माणसावर नसायची आणि

शेजारचा माणूस आम्ही परत येईपर्यंत आमची किल्ली कोठे ठेवली हेही विसरत असल्यानुळे ती हरवण्याच्या भानगडीत तरी पडायचा नाही.

पण पुढे आमचा हम दो हमारे दो असा संसार सुरू झाल्यावर मात्र किल्ल्या सांभाळणे हा जाच सुरू झाला. पण त्यातही सौ. नोकरी करत नसल्यामुळे घराला कुलूप लावून कामावर जाण्याचे प्रसंग क्वचितच माझ्यावर आले आणि किल्ल्या हरवण्याची जबाबदारी सौ. वतीवरच पडली. अर्थात त्याबाबतीत ती फार दक्ष असल्याने एकदाच तिच्यावर किल्ल्या हरवण्याचा प्रसंग आला आणि त्यालाही ती कारणीभूत नव्हती. ती बसमधून जाताना तिची पर्सच चोरीला गेली व त्याचबरोबर त्यातील किल्ल्यांचा जुडगाही! अर्थात त्यावेळी आम्हाला सगळी कुलुपेच तोडून फेकून देऊन नवी कुलुपे बसवावी लागली. मी किल्ली हरवल्यावर माझ्यावर धांदरटपणाचा आरोप व्हायचा पण तिच्यावर मात्र कसलाही दोष न येता उलट तिचीच कीव केली लोकांनी!

मी अनेकवेळेला किल्ल्या हरवल्या आणि माझे नशीब इतके थोर की प्रत्येक वेळी किल्ल्या सापडल्या तरी किल्ली हरवणारा असा शिक्का मात्र माझ्यावर बसलाच.. एकदा आम्ही सर्वजण म्हणजे हम दो हमारे दो फिरायला गेलो आणि घरातल्या गोदरेजच्या कपाटाच्या किल्ल्या कशा काय माझ्या खिशात होत्या. घराची चावी खिशात व्यवस्थित आणि ही गोदरेजचीच चावी कुठे पडली कोण जाणे. आता वेळ रात्रीची त्यामुळे बाहेर

पडून शोधणेही शक्य नाही. गोदरेजचे कपाट लगेच फोडणेही जिवावर आले आणि ते फोडण्यापेक्षा त्याची चावी करून मिळते का हे पहाणे शहाणपणाचे म्हणून रात्र तशीच तळमळत काढली. त्यावेळी जरा गावाबाहेरच्या रस्त्यावरील घरात रहात होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी जरा अंधुक दिसू लागले की घराबाहेर पडलो व आदल्या दिवशी ज्या रस्त्यावरून घरी आलो होतो तो रस्ता पकडला. अजून त्या रस्त्याला उर्जितावस्था यायची होती त्यामुळे तो धुळीने भरलेला होता आणि तेच माझे भाग्य ठरले कारण त्या धुळीत गोदरेजच्या कपाटाची चावी जणु माझी वाट पहात पडली होती. घरी आनंदाने आल्यावर माझी खरडपट्टी व्हायची होती ती झालीच पण कपाट फोडणे किंवा गोदरेज डीलरकडे जाऊन किल्ली मिळते का हे पहाण्याचा उपद्व्याप वाचला म्हणून मी खूष!

आता अलीकडे आमचे आम्ही दोघेच राहू लागलो तेव्हां प्रत्येकजण आपली आपली स्वतंत्र चावी घेऊन घराबाहेर पडतो. शिवाय आता फ्लॅटचे दार आपोआप बंद होणारे म्हणजे जर चुकून चावी घरात राहिली व वाऱ्याने दार बंद झाले तर काही खरे नाही. आमच्याच माहितीच्या आमच्यासारख्याच ज्येष्ठ नागरिकांचे घर असेच बंद झाले तर बिचाऱ्यांना किल्लीवाला शोधून त्याच्याकडून ते उघडून घ्यावे लागले अर्थात भरभक्कम दक्षिणा मोजूनच.

एकदा मात्र नेहमीच्या प्रथेला अनुसरून सकाळी फिरायला गेल्यावर दार उघडायला म्हणून किल्ली काढण्यासाठी मी खिशात हात घातला तर किल्लीचा पत्ता नाही. मी बाहेर गेल्यावर सौ. वती अंघोळीस वगैरे गेली तर उगीच बाहेर थांबावे लागू नये म्हणून मी किल्ली घेऊन जातो. पण आता खिशात किल्ली नव्हती म्हणजे मी नेली नसावी असे वाटून मी बेल वाजवली च सौ. ने आश्चर्याने दार उघडले कारण मी किल्ली नेली असणार याची तिला खात्री. घरात नेहमीच्या जागा शोधल्या पण किल्लीचा पत्ता नाही. गोदरेजची किल्ली हरवली तसा कच्चा रस्ता नव्हता तरी पण एक चक्कर मारून आलो अर्थात प्रत्येक वेळी किल्ली अशी वाट पहात थोडीच बसणार पण मग सौ. ने माझी उलटतपासणी केली मी फिरून येताना वाटेतल्या किराणा मालाच्या दुकानातून दूध आणले होते त्यावरून तिने तर्क केला होता की तेथे पैसे काढताना किल्ली माझ्या खिश्यातून पडली असणार पण मी तिला झटकून म्हणालो, "छे छे तशी पडली असती तर आवाज आला नसता का, कुठेतरी रस्त्यातच पडली. "म्हणून उदास अंत:करणाने अंघोळ वगैरे करून कपडे चढवले तेव्हां"अहो, किल्ली सापडली " असे शब्द कानावर पडले आणि माझा जीव भांड्यात पडला. "बघ मी म्हटले नव्हते का घरातच राहिली होती ना? " अगदी विजयोन्मादाने मी म्हणालो, "नाही मी म्हटले नव्ह्ते का किराणा मालाच्या दुकानातच पडली असेल, मी त्याला फोन करून विचारले आणि तेथेच पडली होती त्याला नीट

ठेवायला सांगितले" असो माझा पराभव मी हसतमुखाने स्वीकारला, हो किल्लीवाल्याला शोधण्यापेक्षा ते सोपे शिवाय लॅचची किल्ली कुणाला सापडली तर घराच्या सुरक्षिततेची सारखी काळजी

यानंतर तरी माझी किल्ल्या हरवण्याची संवय सुटेल असे वाटत होते. पण कसचे काय एक दिवशी सकाळी फिरायला जाताना बरोबर नेण्यासाठी किल्ली शोधत होतो तर नेहमीच्या जागी सापडली नाही. सगळया जागा पॅन्टचे खिसे तपासून झाले शेवटी या वेळी मात्र किल्ली खरच हरवली याविषयी मी नि:शंक झालो. मग काय तसाच फिरायला गेलो. फिरून आल्यावर मागच्या वेळसारखा चमत्कार होईल व "किल्ली सापडली हो" असे सौ. च्या तोंडून ऐकायला मिळेल अशी पुसट शंका वाटत होती पण तसे काही झाले नाही. यावेळी मात्र किल्ली बनवणे वगैरे उपद्व्यापास तोंड द्यावे लागणार अशी खात्री पटली. आणि अचानक समोरच्या काकूनी बेल वाजवली, "पार्टी पाहिजे " असे म्हणतच! "का काय झाले? " आम्ही आश्चर्याने विचारले, "तुमची चावी कुठे आहे? ""हरवली बहुतेक" मी उदासवाणे होत म्हणालो. "अहो काल रात्री तुम्ही दार उघडून आत शिरला आणि चावी दारालाच" काकूनी असे म्हटल्यावर "वा वा मग पार्टी निश्चित " आम्ही दोघेही म्हणालो.

अमेरिकेत पहिल्यांदा गेलो तेव्हां तर आमच्या मुलाच्या फ्लॅटला जे कुलूप होते त्याला दोन किल्ल्या होत्या व त्या दोन्ही विशिष्ट पद्धतीने

एकामागून एक फिरवल्यावरच कुलुप उघडायचे. त्यावेळी तो कामावर गेल्यावर घरात आम्ही दोघेच असायचे अर्थात बाहेर जायचे झाले तर सुरवातीस एकानेच कुणीतरी जायचे असे ठरवले कारण दार बंद करून बाहेर पडलो आणि परत आल्यावर उघडता आले नाही तर काय करायचे. पण नंतर प्रत्येकाने स्वतंत्रपणे कुलूप उघडण्याची तालीम केली व दोघानाही उघडता येते याची खात्री पटल्यावरच दोघांनी बाहेर पडायला सुरवात केली. पण आमच्यासारखे काही ज्येष्ठ नागरिक खरोखरच मुले घरात असतानाच बाहेर पडायचे हो उगीच किल्ली बरोबर बाळगण्याची कटकट नको.

आता अमेरिकेतील नव्या घराला तर मुलाने स्वयंचलित कुलुप बसवले त्यात ठराविक क्रमांक दाबले की घर उघडते. फक्त तो क्रमांक लक्षात ठेवणे हे आपला ए. टी. एम. चा पिन क्रमांक लक्षात ठेवण्यासारखाच उपद्व्याप आहे पण त्याला काही इलाज नाही. पण आताचे कुलूप इतके स्वयंचलित आहे की ऑफिसमधूनही तो ते उघडू शकतो व काम करणारी बाई काम करून परत तिने फोन केला की बंद करून घेऊ शकतो.

पण या स्वयंचलित कुलुपानेही एकदा इंगा दाखवला. आमचा नातू शाळेतून घरी आला. त्याला स्वयंचलित क्रमांक माहीत असल्याने त्याने तो क्रमांक दाबला पण त्याच्या आईला (म्ह. आमच्या सुनेला) काचेच्या दारातून दिसले व आपला पोरगा दमूनभागून आला म्हणून त्याला तेवढेही श्रम नकोत म्हणून तिने आतील खटक्याने दार उघडण्याचा प्रयत्न केला.

त्या दोघांच्या प्रयत्नात त्याचा स्वयंचलित बाणा बिघडला आणि त्यानंतर ते बंद व्हायला नकार देऊ लागले. सुदैवाने त्यातील यांत्रिक करामत आमच्या मुलाला समजली व बऱ्याच खटपटीने ते उघडू मिटू लागले. म्हणजे मी त्याला मेकॅनिकल इंजिनिअर बनविल्याचा कधीतरी असा उपयोग झाला कारण हल्ली कोणत्याही शाखेचा अभियंता शेवटी संगणक अभियंताच बनतो. थोडक्यात कुलुप किल्लीची जोडी सुरक्षिततेपेक्षा त्रासदायकच जास्त असते येवढे मात्र खरे.

आता मात्र सौने मला गळयात अडकवण्याची पिशवी दिली आहे व किल्ल्या त्यातच ठेवायच्या आणि पिशवी गळयातून काढायची नाही अशी ताकीदही! आता पाहू या पिशवीसह किल्ली किती दिवस टिकते ते! कारण बरेच वेळा पिशवी गळयात असली तरी चुकून किल्ली मात्र खिश्यातच ठेवली जाते. शिवाय किल्लीसकट पिशवी चुकून गळयातून काढून ती तेथेच विसरण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

# ७. पुनश्च हरी ओम

लो टिळक मंडालेच्च्या तुरुंगातून सुटून आल्यावर आपल्या "केसरी" पत्रात त्यानी पुन्हा अग्रलेख लिहायला सुरवात केली तेव्हां त्याचा मथळा ‘पुनश्च हरि औम " असा होता टिळक तुरुंगातून सुटतात केव्हां आणि त्याच्च्या सडेतोड भाषेत अग्रलेख लिहायला सुरवात करतात केव्हां याची जनता आतुरतेने वाट पहात होती, पण आम्हाला बरेच दिवस अमेरिकेला जाता आले नाही म्हणून तेथील जनता आमची वाट पहात होती अशातला भाग नाही मात्र तीन अमेरिकन नागरिक खरोखरच आमची वाट पहात होते ते म्हणजे आमचा मुलगा, सून व नातू यावेळी मात्र आमचे न जाण्याचे कारण केवळ माझ्या अंगात मुरलेला आळस हे नव्हते। तसे सर्वच कुटुंब प्रमुखांप्रमाणे आमच्या घरात आंतरराष्ट्रीय बाबीं म्हणजे ग्रीसची आर्थिक परिस्थिति, बराक ओबामा व व्लादिमीर पुतिन यांनी परस्पर संबंध कसे सुधारले पाहिजेत अश्या बाबींवर निर्णय घेण्याची जबाबदारी माझ्यावर असते तर अमेरिका किंवा कुठेही जावयाचे की नाही वगैरे क्षुल्लक गोष्टींचे निर्णय घेण्याचे काम गृहखात्यावर सोपवून मी स्वस्थ असतो।अर्थात असे स्वातंत्र्य असूनही गृहखाते स्वस्थ बसण्याचे कारण बराक ओबामा हे होते

म्हणजे तसे बराक ओबामांशी आमचे काही भांडण वगैरे नव्हते पण तोपर्यंत महनीय पंतप्रधांनांनी त्यांची गळाभेट घेतली नव्हती.

आपल्याकडे जसे एकादी गोष्ट कॉंग्रेसला करायची असेल तर त्याला भाजप ने खोडा घालायचा आणि उलट असेल तर कॉंग्रेसने हे जसे ठरलेले आहे तसेच अमेरिकेतील डेमोक्रेट्स व रिपब्लिकन पक्षांचे आहे त्यामुळे पहिल्या वेळी अगदी मुलाखतीसही न जाता आम्हाला रिपब्लिकन जॉर्ज बुश यांनी व्हिसा देऊ केला होता तर मग या वेळी मात्र आम्हाला अडवायचे असा डेमोक्रेटिक ओबामांचा विचार असावा आणि त्यामुळे बुशसाहेबांनी दिलेल्या व्हिसाची मुदत संपल्यावर आम्हाला अमेरिकेत जाण्याचा व्हिसा नाकारण्यात आला.

पहिल्या व्हिसाच्या मुदतीत बरेच वेळा अमेरिकेला जाऊन आल्यामुळे व्हिसा संपल्यावर लगेच नूतनीकरण करण्याचा आळस मी केला आणि त्याबाबतीत दक्ष असणाऱ्या गृहखात्यानेही ज़रा ढील दिली आणि मी अधिकच सुस्तावलो व्हिसा नूतनीकरणाचा फारसा आग्रह तिने न केल्यामुळे आधीच उल्हास नसणाऱ्या मला स्वस्थ राहण्यास योग्य वातावरण लाभल्याचा मी फायदा घेतला व व्हिसा या शब्दाचा उच्चारही त्या काळात केला नाही पण निद्रिस्त ज्वालामुखी फार काळ सुप्त राहणे जसे शक्य नसते आणि तशी जाग तिला आल्यावर मला परिस्थितीची दखल घेणे भाग पडले. शिवाय आता अमेरिकन व्हिसा अगदी सहज उपलब्ध

होईल इतकेच काय पण ज्येष्ठ नागरिकांना तर मुलाखतीसही जावे लागणार नाही अश्या बातम्या तिच्या खास गोटातून तिला उपलब्ध होऊ लागल्या तसे असेल तर करुया व्हिसासाठी अर्ज असा विचार मी केला। पण कशी काय कुणास ठाऊक पण त्यासाठी एजंट घ्यावा म्हणजे कोणतीच धावपळ करावी लागणार नाही अशी दुर्बुद्धि मला सुचली। दुर्बुद्धि म्हणण्याचे कारण एवढेच की धावपळ करण्याचे फारसे काही कमी झाले नाही आणि एजंटाने अगदी गैरसोयीच्या तारखा व्हिसा मुलाखतीसाठी काढून दिल्या अर्थात तारखा गैरसोयीच्या असणे हे काही व्हिसा न मिळण्याचे कारण म्हणता येणार नाही पण शत्रूला गाफील ठेवून अचानक हल्ला करण्याचा गनिमी कावा अमेरिकन वकीलातीनेही लढवला आणि मुलाखतीसही जावे लागणार नाही अश्या भ्रमात असणाऱ्या आम्हा दोघांना मुलाखतीस बोलावून चारी मुंड्या चीत केले म्हणजे आम्ही अमेरिकेस इतक्या वेळा गेलो आणि प्रत्येक वेळी बराच काळ राहिलो असा हिशोबच नुतनीकरणाच्या खिडकीवर बसलेल्या ललनेने सादर केला आणि त्यावरून आम्ही अमेरिकेतच स्थलांतर करण्याची शक्यता असल्याचा निष्कर्षही काढून आमचा अमेरि कन प्रवेशपत्र मिळवण्याचा बेत हाणून पाडला.

खरे म्हणजे आम्ही अमेरिकेत स्थलांतर करण्याची आम्हाला असलेली संधी दहा वर्षे वापरली नाही हीच गोष्ट आम्ही अमेरिकेत स्थलांतर करण्यास उत्सुक नसल्याचा खणखणीत पुरावा असताना आम्हाला

अमेरिकन प्रवेशपत्र नाकारून आपल्या ढासळत्या आर्थिक परिस्थितीस आमच्या प्रवेश पत्र नूतनीकरणासाठी भरलेल्या ३२० डॉलरचे ठिगळ लावणे बराक ओबामाना शोभले नाही पण होणारे न चुके!

खरे तर मी मनातल्या मनात ओबामाना धन्यवादच दिले होते. कारण काही झाले तरी अमेरिकन प्रवासाचे संकट माझ्यासाठी तात्पुरते टळले होते. पण हे समाधानही तात्पुरतेच होते, कारण यापूर्वी आम्ही बरेचदा अमेरिकेस गेलो होतो हे माहीत असणाऱ्या पैकी बरेचजण "काय आता अमेरिकेस केव्हां जाणार? " असा सहजच प्रश्न विचारत बऱ्याच लोकांची तर अशीही समजूत असे की आम्ही नेहमीच अमेरिकेत असतो आणि कधी कधी भारतात येतो. निदान बऱ्याच दिवसात एकाद्या मित्राचा फोन आला नाही म्हणून त्याला फोन करून असे का झाले म्हणून विचारावे तर “अरे तू अमेरिकेत असशील म्हणून फोन केला नाही” असे त्याचे उत्तर यावे. म्हणजे व्हिसा नाकारणाऱ्या वकिलातीलाच अगदी नावे ठेवायला नकोत. आणि सुरवातीला "आम्ही जाणारच आहोत थोड्या दिवसात व्हिसा मिळाला की " असे उत्तर देत आम्ही त्यांचे समाधान केले पण नंतर नंतर हा प्रश्न विचारला की प्रत्येक वेळी तेच उत्तर देऊन आपली पडती बाजू संभाळणे जिवावर येऊन शेवटी खरे काय ते सांगून टाकावे म्हणून "आमचा व्हिसा अर्ज रिजेक्ट झाला हो " असे सांगू लागलो पण पुढे पुढे तसे सांगतानाही आपण एकाद्या परीक्षेत नापास झालो असे सांगण्यासारखीच लाज वाटू लागली त्यामुळे

अमेरिकेला जावेलागले तरी चालेल पण व्हिसा परीक्षेत नापास होऊन चालणार नाही असे मीसुद्धा म्हणू लागलो. मधला एक वर्षाचा काळ आम्ही बराच शांततेत काढला होता आणि व्हिसा मिळवून शान्ततेच्या त्या महासागरात खळबळ उडवून द्यायचे जिवावर आले होते तरी व्हिसा न मिळाल्याची नामुष्की पण चैन पडू देत नव्हती. आमच्या चिरंजीवांनीही यावेळी आई बाबांना व्हिसा मिळवून द्यायचाच असा चंग बांधला. यावेळी एजंटकडॅ जाण्याची चूक मी केली नाही कारण एजंट म्हणजे फक्त असून अडचणच असतो याचा अनुभव आला होता. जेवढ्या अडचणी येण्याची शक्यता होती त्या सर्वांचा विचार करून कागदपत्रे तयार केली आणि घरातूनच संगणकावर व्हिसा कार्यालयाची मुलाखतीची वेळ घेतली.

व्हिसा साठी ज्येष्ठ नागरिकांना सवलत आहे ही समजूत चुकीची ठरली ८० वर्षे वा अधिक वयाच्या नागरिकांना मात्र व्हिसा मुलाखतीशिवाय मिळतो ही गोष्ट कळून सध्या काही फ़ायदा नव्हता त्यामुळे एकदा बोटांचे ठसे देण्यासाठी आणि नंतर मुलाखतीसाठी असे दोन दिवस जावे लागले. बोटांचे ठसे घेण्याचे काम एका कार्यालयात तर मुलाखत वकिलातीत होती. आता या कार्यालयात मात्र शिस्तशीर काम चालते त्यामुळे दिलेल्या वेळेत जाणाऱ्या व्यक्तीला एक तासापेक्षा जास्त वेळ लागत नाही यावेळीही मागील वेळेस आमच्या अमेरिकेच्या पूर्वीच्या भेटींविषयी जो हिशोब त्यानी मांडला होता तोच पुन्हा मांडायला सुरवात

केली त्यामुळे नमोनी अमेरिकन नागरिकांना ताबडतोब व्हिसा देण्याचे धोरण आरंभले तरी त्याची परतफेड करण्याचा विचार ओबामानी केल्याची लक्षणे काही दिसेनात आणि आतापर्यंत कोणत्याही परीक्षेत नापास होण्याची नामुष्की स्वीकारावी लागली नाही त्या सगळयांचे उट्टे निघणार की काय असे वाटू लागले. मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरून तो पुरुष असला तरी जपानी असल्याने तो आम्हास अनुकूल आहे की प्रतिकूल याचा काही अंदाज लागेना. शेवटी इतके दिवस आमची दोन्ही मुले तेथे होती म्हणून जास्त राहिलो असे सांगितले आता एकच मुलगा असल्यामुळे आता चार महिन्याच्यावर राहणार नाही असे त्याला पटवण्याचा प्रयत्न केला त्यावर त्याने "पहा हो जर जास्त राहिला तर तुमचा व्हिसा रद्द करण्यात येईल " असे सांगितल्यावर मी मनातल्या मनात "रद्द करायला अगोदर दे तरी" असे म्हणून आता आम्ही राहणार नाही अश्या त्याला दिलेल्या आश्वासनावर त्याचा विश्वास बसला असावा आणि त्याने परीक्षेत पास केले व अखेरीस व्हिसा प्राप्ती झाली

अश्या प्रकारे मी आगीतून फुफाट्यात उडी घेतली म्हणजे व्हिसा न मिळण्याच्या नामुष्कीतून सोडवणूक झाली पण आता अमेरिकेच्या प्रवासास तोंड देण्याची तयारी करावी लागली अमेरिकन प्रवेशपत्र मिळवण्याचा पराक्रम केल्यावर आता त्या प्रवेशपत्राचा उपयोग करून किल्ला सर करणे अर्थातच कर्तव्याचाच भाग होते. खरे तर परीक्षेत नापास

होण्याची नामुष्की टाळणे हा माझा उद्देश सफल झाल्यावर पुन्हा अमेरिकेच्या प्रवासास तोंड देण्याच्या दुसऱ्या संकटास तोंड देण्याची माझी फारशी इच्छा नव्हती पण आता जाणे न जाणे हा माझ्या इच्छेचा प्रश्न नव्हता जास्तीत जास्त केव्हां जायचे यावर विचार करण्याचा व मत व्यक्त करण्याचा अधिकारच काय तो मला होता, अर्थात आपले मत मांडता येण्याचे स्वातंत्र्य उपभोगून आपण किती चुकीचे मत व्यक्त करू शकतो याची पावती घेण्याची माझी इच्छा नव्हती आणि तशी आवश्यकताही नव्हती कारण व्हिसा हातात पडताक्षणीच आता गौरी गणपतीला आपण मुलाकडे असणार असे उद्गार माझ्या कानावर पडले आणि त्यामुळे जूनमध्ये निघण्याची आपल्या मनाची तयारी करायची आहे अशी मनात खूणगाठ बांधून पुढच्या तयारीस सज्ज राहण्याचा मी मनाला आदेश दिला.

अर्थात प्रत्यक्ष तयारी करण्याचे काम माझ्यावर नसणार याची मला खात्री होतीं त्यामुळे मला फक्त तिकिटे खरेदी करणे, प्रवासी विमा व तिकिटे खरेदी करणे व या साऱ्यासाठी लागणारे पैसे काढणे एवढ्याच कामाकडे लक्ष द्यावे लागले बाकी बॅगा काढण्यापासून त्या वजनाची मर्यादा राखून भरण्यापर्यंत सर्व कामे सौं ने आपल्याकडेच घेतली होती आणि त्यात मी दखल देऊन आपली नाचक्की करून घेण्याचे टाळले होते. कदाचित मी त्यात काही सुधारणा सुचवली तर लगेचच ती किती चुकीची होती हे सप्रमाण लगेच सिद्ध होण्याची शक्यता होती, शिवाय मी माझ्या अंदाजाने

ठेवलेली माझी वस्तूही नंतर मला न सापडता ती शोधण्यासाठी तिचीच मदत घ्यावी लागण्याची शक्यता असल्यामुळे मी दूर राहून दृष्टी फेकण्याचेच काय ते काम दूरदृष्टीने पत्करले.

आमच्या निघण्याच्या अगदी थोडॅच दिवस अगोदर मृग निघाला होता व तो आमच्यावर हल्ला करतो काय या काळजीने मला ग्रासले होते. हवामानखात्यानेही यंदा पाऊस वेळेवर सुरू होणार अशी भीती मला दाखवलीच होती. तसा हवामानखात्याचा लौकीक काही अचूक अंदाज करण्याचा नसला तरी चुकून त्यांचा अंदाज बरोबर ठरला तर काय घ्या असे मला वाटत होते आणि अगदी सात जूनलाच पुण्यास बऱ्यापैकी पाऊस पडलाही. अर्थात तो मान्सूनपूर्व पाऊस होता. आणि त्यानंतर पुण्यातून पावसाने काळे केले ते अगदी आम्ही निघण्याची वेळ येईपर्यंत! मात्र तो केरळात उतरला अशी बातमी फुटली आणि पाठोपाठ तो मुंबईत दाखल झाला तो अगदी बरोबर आमच्या निघण्याच्या चार दिवस अगोदर म्हणजे अठरा जूनला आणि तोही इतका जोराचा की मुंबईच्या तिन्ही लोहमार्ग वाहिन्या बंदच पडल्या. टी. व्ही. वर सर्व वाहिन्यांनी बंद पडलेल्या गाड्या व अडकलेल्या प्रवाश्यांच्या मुलाखती दाखवून माझ्या चिंतेत भर टाकली पुण्यात मात्र पावसाला जणू प्रवेशबंदी होती. मुंबईत ठाकरे कुटुंबीयांनी मान्सूनपूर्व शहराची पाहणी करून यंदा नागरिकांना कसलाच त्रास होणार नाही अशी ग्वाही दिलेली वरुणराजाच्या कानावर पडली आणि श्रीकृष्णाने

इंद्राची पूजा करण्याचे कारण नाही असे गोकुळवासीयांना सांगितल्याचा राग येऊन इंद्राने गोकुळावर अतिवृष्टी करावी त्याप्रमाणे वरुणराजालाही राग येऊन त्याने एका दिवसात विक्रमी पाऊस पाडून ठाकरे कुटुंबियांना आपले शब्द गिळण्याचे नित्यकर्म उरकून अश्या आपत्तीला आणखीनच इतर कोणती कारणे आहेत त्यांचा पाढा वाचावा लागला..

अर्थात पाऊस मुंबईतच पडला तरी माझ्या तोंडचे पाणी पळवण्यास अनुकूल होता कारण त्यामुळे महामार्गावर दरड कोसळून वाहतूक आठ तास ठप्प अशी बातमी आमच्या निघायच्याच दिवशी आली आणि त्याच बरोबर पुण्यातही धो धो पाऊस सुरू झाला. पण त आम्हाला मुंबई विमानपत्तनावर पोचवणाऱ्या प्रवासी वाहतूक कंपनीस मी दूरध्वनी करून विचारल्यावर त्यांनी मात्र "काळजी करू नका दरड कोसळली तरी तुम्हाला अगदी वेळेवर मुंबई विमानतळावर पोचवण्यात येईल असा दिलासा दिला.

अनुभव हा मोठा गुरू असतो असे म्हणतात पण कधी याच्या उलटही होते म्हणजे तोता मैनेच्या गोष्टीत जसे घडते, लबाड मैना भुई मुगाची शेंग लपवते आणि पोपटाला विचारते "तुला काय पाहिजे? आतले की बाहेरचे? " पोपट उत्तर देतो "बाहेरचे" तेव्हां ती आतले शेंगदाणॅ खाऊन वरची टरफले त्याला देते. दुसऱ्यावेळी ती खारिक लपवते व पुन्हा तोच प्रश्न विचारते आता पोपट शहाणा झाल्यामुळे उत्तर देतो "आतले दे " बेरकी मैना

तेव्हां त्याला आतली बी देते व स्वतः खारीक खाते थोडक्यात पोपटाला पूर्वानुभवाचा तोटाच होतो. आमचीही परिस्थिती तशीच झाली म्हणायला हरकत नाही त्याचे एक कारण म्हणजे आमचा पूर्वानुभव फारच पूर्वीचा म्हणजे मधील व्हिसा नकार प्रकरणामुळे आमच्या अमेरिका प्रवासास चार वर्षे लोटली होती आणि त्या काळात बराच बदल घडला होता अगदी मुंबई विमान पत्तन सुद्धा अगदी ओळखू न येण्याइतके बदलले म्हणजे सुधारले होते.

मागच्या वेळी आम्ही फार लवकर पोचल्यामुळे आम्हाला बाहेरच प्रतीक्षा गृहात बसावे लागले होते. याही वेळी आम्ही लवकर म्हणजे नऊ वाजता पोचल्यामुळे आत सोडणार नाहीत ही माझी समजूत चुकीची ठरवून आम्हाला आत प्रवेश मिळाला इतकेच नव्हे आम्ही आरक्षण केलेल्या जेट एअरवेजची सामान पडताळणीची रांगही उभी होती सुरक्षारक्षकांनी आमची पासपोर्ट तपासणी करून त्यावर चिठ्ठ्या चिकटवल्यावर बोर्डिंग पास मिळण्याच्या रांगेत आम्हाला पुढे जाण्याची सूचना मिळाली. गेल्या वेळी जेट एअर वेजच्या कौंटरवर सामान उतरवून बोर्डिंग पास मिळाल्यावर नको नको म्हणत असताना चाक खुर्ची कौंटर सुंदरीने आग्रहाने गळयात घातली होती. यावेळी मात्र आम्हाला आमच्या सामानाच्या बॅगा निर्धारित वजनापेक्षा थोड्या कमीच वजनाच्या असल्यामुळे लेबले लावून आत धाडल्यावर ती आम्हाला खुर्चीचा आग्रह केव्हां करते याची वाट पाहून

शेवटी "चाक खुर्ची आम्ही मागितली आहे "असे आम्हीच म्हटल्यावर तिने त्यासाठी १२ वाजेपर्यंत थांबावे लागेल असे सांगितले अर्थात मी लगेच चालतच जाण्याची तयारी दाखवली पण सौं. ने अगदी ठामपणे "नाही खुर्चीतूनच जावयाचे" असे म्हटल्यावर माझा नाइलाज झाला व सामान आत गेल्यामुळे उरलेल्या केबीन बॅगवर व सौ. ची पर्स व माझ्या गळयात तिनेच अडकवलेले पाउच (त्यात मी बोर्डिंग पास ठेवायचे म्हणजे केव्हांहि काढून दाखवायला सोयीचे जाते या प्रतिपादनासह ) यांवर लेबले लावून त्यावर आमची नांवे व पत्ते अगदी मन लावून गिरवीत बसलो.

आम्ही विमानतळावर पोचलो असून खुर्चीची वाट पाहत होतो ही बातमी मोबाइलवरून पुण्यातील व एडिसनमधील मुलालाही कळवली सौं. ने तिच्या काही मैत्रिणींनाही हे वृत्त म्हणजे विमानतळावर पोचल्याचे (चाकखुर्चीची वाट पहाण्याचे नाही) मोबाइलवरून कळवले कारण मोबाइल मधील शिल्लक रकमेचा उपयोग काही अमेरिकेत गेल्यावर होणार नाही आणि विमानात बसल्यावर एकदा मोबाइल बंद केल्यावर त्याचा हाच अंतीम उपयोग असेल म्हणून तो पुरेपूर वसूल करण्याचा उद्देश त्यामागे होता. यात थोडाफार वेळ गेला व अकरा वाजले. आमच्याशेजारी पाजारी आता चाक खुर्ची याचकांची बरीच गर्दी वाढू लागली. आमच्या गतप्रवासाची माहिती आमच्या वयाच्या इतरांना देताना आम्ही सर्वांना चाकखुर्ची घ्याच आपले बरेच श्रम कमी होतात असा जो सल्ला दिला होता

तसाच सल्ला इतरही बऱ्याच जणांनी आपल्या गणगोताला दिला असावा (हां सल्ला देणाऱ्याचे कुठलेच नुकसान होत नाही ) कारण एकूण प्रवाशांपैकी निम्मे अधिक प्रवासी चाकखुर्ची चा आग्रह धरणारे निघाले. आतापर्यंत सत्तेच्याच खुर्चीचाच हव्यास असतो या समजुतीत थोड़ा बदल करून त्यात चाकखुर्चीचाही समावेश करायला हवा असे वाटायला लागण्यासारखी परिस्थिती उत्पन्न झाली. काही काळानंतर तर चाकखुर्चीसाठी मुलाखती घेऊन अगदी योग्य व्यक्तींनाच चाक खुर्ची देण्यात येईल असे विमान वाहतूक कंपन्यांना ठरवावे लागेल आणि इमिग्रेशन चाचणीप्रमाणेच प्रवाशांची शारीरिक तपासणीही करण्याची आवश्यकता वाटून डॉक्टरांचे पथकही त्या रांगेत अंतर्भूत करावे लागेल असे मला वाटून गेले.

वेळ जसजसा जाऊ लागला तशी चाकखुर्चीची माझी चिंता वाढत होती चाकखुर्ची म्हणजे अगदी संगीत खुर्चीचा खेळ असल्याप्रमाणे कोणाला मिळणार आणि मुख्यत: आपल्याला मिळणार की नाही याविषयी शंका वाटू लागली कारण एकादा दुसरा चाकखुर्ची वाहक येई व "लंडनला कोण जाणार? " अशी विचारणा करून त्याना रवाना करण्यात येई कारण लंडन चे उड्डाण अगोदरचे होते. चाकखुर्ची न मिळाल्यामुळे फ्लाइट चुकली तर काय करावे लागते याविषयी माहिती देणारा कोणी मिळाला नाही. येऊन जाऊन चाकखुर्ची न मिळून उड्डाण चुकले तर यापुढे कधीच

अमेरिकेला जाण्याची यतायात करावी लागणार नाही कारण चाकखुर्चीचा आग्रह सौ. चा होता व बघ आता जन्माची अद्दल घडली तेव्हां उगीच अमेरिकेचे नाव काढू नको असे म्हणण्याची मला संधी होती एवढीच दुःखात सुखाची बाब! अर्थात तशी संधी मला उपलब्ध करून देईल तर ती सौ. कसली. तिने एकदम चाकखुर्ची निरीक्षकाला आम्हाला दोन ऐवजी एकच खुर्ची मिळाली तरी चालेल असे म्हणून आमचा नंबर लावला व जवळ जवळ एक वाजता मला चाकखुर्चीवर बसवून आम्हाला ज्या ७४ क्रमांकाच्या द्वारापाशी जाण्यास सांगितले होते तिकडे प्रयाण केले.

आम्ही आत शिरताना चाक खुर्चीमुळे आमचा प्रवास सुरळीत झाला. व अगदी दहा मिनिटातच आम्ही इष्ट प्रवेशद्वारापाशी पोचलो लगेचच प्रवाश्यांना विमानात सोडण्यासही सुरवात झाली व आमचेच क्रमांक पुकारण्यात आले व थोड्याच वेळात आम्ही स्थानापन्न झालो व दोम्ही मुलांना मोबाइलवरून संदेश पाठवून मी मोबाइल बंद केला तो पुन्हा न उघडण्यासाठीच, बाहेर बऱ्यापैकी पाऊस पडत असल्याचे खिडकीतून मला दिसत होते पण आता त्या पावसाची फिकिर करायचे कारण नव्हते कारण विमानतळावर आम्ही पोचलो होतो एवढेच नव्हे तर विमानातही बसलो होतो विमान चालकाने आपण अगदी वेळेवर निघत आहोत असा इशाराही दिला होता पण अजुन घरघराट सुरु झाला नव्हता।तेवढ्यात सूचना सुरु झाली " विमानातील पाण्याची पातळी खाली गेली आहे तेव्हां पाणी

भरून घेण्याचे काम सुरु आहे व् ते संपताच उड्डाण सुरु होईल " बाहेरच्या धुवाधार पावसामुळे विमानातील पाण्याची पातळी मात्र वाढली नव्हती. सुदैवाने पाण्याची पातळी लवकरच योग्य तेवढी झाली आणि विलम्बाबद्दल आमची क्षमा मागून वैमानिकाने विमान सुरु केले व आम्ही खरेच मुंबई चा विमानतळ सोडला पहाटेचे (की रात्रीचे दोन वाजून वीस मिनिटे होत होती.. विमानात बसल्याची सूचना दोघाही मुलांना दिलेलीच होती. आमच्या मागेच असलेले देसाई कुटुंब चाकखुर्चीच्या आमच्याच मेळाव्यात होते आणि त्यांच्यापैकीही एकालाच चाकखुर्चीवर (बसण्याचे) समाधान लाभले होते त्यामुळे समदु:खी किंवा समसुखी असलेल्या आमची ज़रा दोस्ती झाल्यासारखे झाले होते शिवाय ते बडोद्याचे असल्यामुळे त्यांना मराठी थोडेफार व हिंदी बऱ्यापैकी कळत होते त्यामुळे सौं ने त्यांच्याशी बातचीत सुरु करूनहीं टाकली होती. समोरच्या खुर्चीच्या मागील पटलावर चित्रपट पहाण्याची सधी होती त्यामुळे पुण्यात पहाणे शक्य न झालेले "एलिझाबेथ एकादशी " व इतरही काही चित्रपट पहाण्यास सौंने सुरवात केली व तिचेच अनुकरण मी केले.

ब्रुसेल्सला विमान थांबून आतील सेवक चमु बदलणार होता। विमान थांबल्यावर आम्हाला खाली उतरुन काही काळ विमानतळावर काढता येणार होता व नंतर पुन्हा विमानात प्रवेश करायचे होते।मागच्या वेळी ज्या प्रवेशद्वारातून बाहर पडलो त्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर

पुन्हा प्रवेश करण्याचे द्वार होते असे मला आठवत होते. देसाईनी परत आपण प्रवेश कोणत्या द्वारातून करणार ऐसे मला विचारल्यावर मी ती दोन्ही प्रवेशद्वारे जवळच असतील त्यामुळे येथे चाकखुर्चीची आवश्यकता पडणार नाही असेही सांगितले।आम्ही बाहर पडताना आम्हाला हसतमुखाने निरोप देणाऱ्या आमच्या चमूतील सहाय्यकास त्याने नंतर कोणत्या द्वाराने प्रवेश करायचे हे मात्र विचारले. बाहेर पडल्यावर यावेळी माझ्या विनंतीस मान देऊन सौंने चाक खुर्चीचा आग्रह धरला नाही व आम्ही केबिन बैगेज म्हणजे एक छोटी सूटकेस सौ. च्या गळयात पर्स व माझ्या गळयात पाऊच अश्या थाटात चालू कागलो व अगदीच जवळ असणारे प्रवेशद्वार सापडता सापडता अगदी "अजुन चालतोची वाट " अशी परिस्थिति झाली। मध्ये पुन्हा सुरक्षा चाळणी पण होती आम्ही तेथे असलेल्या मोठ्या रांगेत उभे असतानाच श्री व सौ देसाई आले त्यांनी चाक खुर्चीची वाट पाहिली होती व सर्व चाकखुर्चीवाल्यांना एकाच मोठ्या उघड्या गाडीतून आणण्यात आले असे त्यांनी सांगितले अर्थात आम्ही चालत आल्यामुळे त्यांच्या अगोदरच पोचलो होतो शिवाय माझे २३ ता. चे मॉर्निंग वॉक राहिलेच होते ते पूर्ण झाले असे मी मनाचे समाधान करून घेतले. सुरक्षा चाचणीनंतरही बरेच अंतर चालल्यावर आमचे द्वार क्रमांक ४० आले व स्वच्छतागृहात जाऊन येईपर्यंत पुन्हा आत सोडायला सुरवात झालेली होती.

या नंतरच्या प्रवासात पुन्हा एकदा पेयपान (आम्ही अर्थातच साधे सरबत ) व त्यानंतर भरपेट जेवण झाले। जेट एयरवेज़ ने आपला खाण्यापिण्याविषयीचा लौकिक पाळला।आठ तासात नेवार्क आले व "आपण अगदी नियोजित वेळेत म्हणजे स्थानिक वेळेनुसार दु. १२-३० वा नेवार्क विमानतळावर प्रवेश करात आहोत अशी उद्घोषणा झाली व विमान खाली उतरू लागले विमानातून उतरतानाही "आयक्रिया " हे फर्निचरचे मोठे मॉल दिसते ते पहाण्याची (ते मागील वास्तयात आतून अनेकवेळा पाहिले होते तरी) सौ. ची इच्छा होती पण आम्ही बसलेल्या विरुद्ध बाजूस ते असल्यामुळे तिची निराशा झाली यावेळी इमिग्रेशन प्रमाणपत्र एका कुटुम्बास एकच भरायचे होते त्यामुळे माझा त्रास थोड़ा कमी झाला कारण दोघांचे फॉर्म्स भारताना पासपोर्ट क्रमांक, जन्मतारखा यात अदलाबदल होऊन फॉर्म्स अनेकदा भरण्याची एकदा पाळी आलेली मी विसरलो नव्हतो एकच फॉर्म भरायचा असल्यामुळे तसे काही झाले नाही व तो फॉर्म व केबिन सामान घेऊन आम्ही नेवार्क विमानतळावर उतरलो। बाहेर पडल्यावरच चाक खुर्च्यासह बरेच वाहक उभे होते. त्यांच्या प्रमुखाजवळ चाकखुर्ची मागणाऱ्यांची यादी होती त्याच्या यादीत आमचे नाव नव्हते असे तो म्हणाला पण आमच्या तिकिटावरची नोंद पाहून अखेरीस आम्हाला एक चाकखुर्ची मिळाली। येथेही खुर्च्यांची संख्या कमीच होती त्यामुळे बहुतेक दोघांपैकी एकालाच खुर्ची मिळाली दोघेही अगदीच हालता येत नाही अशी

परिस्थिति असणाऱ्यानाच दोन खुर्च्या मिळाल्या आमच्या खुर्चीला व आणखी एका जोडीच्या खुर्चीला मिळून एकच वाहक मिळाली म्हणजे ती एक धष्टपुष्ट महिलाच होती दोन खुर्च्या (त्यावरील व्यक्तीसह ) आपण सहज नेऊ असा विश्वास तिने हसतमुखाने व्यक्त केला. ती भारतीयच होती त्यामुळे सौं ने तिच्याशी लगेच हिंदीत बोलून मैत्री करून मी तुला ढकलायला मदत करते असे पण सांगितले त्यामुळे बाहेर गेल्यावर टिपची विभागणी कशी करायची याचा मी विचार करू लागलो. मुंबईत विमानतळावर सी सी टीव्ही बसवले आहेत त्यामुळे चाकखुर्ची वाहक बक्षीशी (टिप) घेत नाहीत असे कोणीतरी सांगितले होते पण त्यात काही तथ्य नव्हते असे आढळून आले होते त्यामुळे अमेरिकेत तर टॅक्सी वालेही टिप घेतात तर विमानतळावरील खुर्चीवाहक घेणार नाही ही शक्यताच नव्हती. वाहिकेने सौ. च्या मदतीने दोन्ही खुर्च्यांचे चालकत्व सांभाळत इमिग्रेशन खिडकीपर्यंत आम्हास नेले. चाकखुर्चीधारकाची रांग वेगळी असल्याने तेथे आमच्या पुढे फारसे कोणी नव्हते आता इमिग्रेशनवाला आपल्याला शिक्का कोणता मारून देतो एवढीच एक चिंतेची बाब राहिली सुदैवाने आमचा चेहरा घरातून निघून चोवीस तास झाले तरी बराच फोटोशी मिळताजुळता राहिला होता व बोटाचे ठसेही जुळले व त्यानंतर तेथील अधिकाऱ्याने आम्हालाच किती दिवस राहणार विचारले व आम्ही अगदी काटेकोरपणे आमच्या तिकिटांच्या तारखानुसार चार महीने व दोन दिवस सांगितल्यावर (हो इथूनच

परत पाठवायला नको )कोणाकडे जाणार विचारले व "मुलाकडे" ऐसे उत्तर दिल्यावर "मुलाकडे आणि चारच महीने? ' असे उदगार हसत हसत काढले तेव्हां आता हा सहा महिन्याचाच शिक्का मारणार असे वाटले व त्याने शिक्का मारून आम्हाला सोडल्यावर पासपोर्ट पाहिल्यावर त्याच्यावर फक्त प्रवेशाच्या तारखेचाच शिक्का मारल्याचे दिसले. त्यामुळे पुन्हा प्रत्यक्षात त्याने नोंद काय केली आहे हे पाहायला सौ. ला पाठवले पण तिला त्याने समाधानकारक उत्तर दिल्यावर आता फक्त आपल्या बॅगा ओळखून त्या घेणे हे काम राहिले होते त्यासाठी सहा डॉलर्स टाकून ट्रॉली चाकखुर्चीतून उतरुन मीच घेऊन आलो म्हणजे चाकखुर्ची हे एक नाटकच झाले होते! शेवटी आमच्या बॅगा काढून त्या ट्रॉली वर लादून आम्ही बाहर पडलो आणि समोरुनच चिरंजीव येत आहेत असे दिसले मग त्यानेच आमचा ताबा घेत चाक खुर्ची चालिकेस (काय द्यायची ती )टिप देऊन खूष केले व आमचा मार्ग आता मोकळा झाला.

# ८. हास्यरंगी रंगले

मी ज्ञानेश्वरी वाचली आहे. तेवढेच मी करू शकतो, ती समजली आहे म्हणण्याचा आगाऊपणा मी करणार नाही. बऱ्याच विद्वानांनी तिचा अर्थ उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून काही गोष्टी उलगडल्यासारखे वाटले. पण रामदासानी `टवाळा आवडे विनोद! ' असे म्हटले आहे आणि मी त्या (पक्षी टवाळ)सदरात मोडत असल्याने मला ज्ञानेश्वरीतला हा पैलू मात्र कळला आणि रामदासानी नव्हे तर आतापर्यंतच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकानीही ती फारच गंभीरपणाने वाचली असावी असे वाटले कारण बऱ्याच ठिकाणी मार्मिक टीका करताना ज्ञानेश्वरानी केलेले विनोदी भाष्य वाचून त्यांचा मिस्किलपणा जाणवल्यावाचून रहात नाही. हा त्यांचा मिस्किलपणा आपल्या गुरूबरोबर त्यानी मधून केलेल्या अल्पसंभाषणातूनही डोकावतो.

ज्ञानेश्वरीच्या सुरवातीसच आपली भूमिका विशद करतानाच एक चौकार ज्ञानदेवानी मारला आहे. ते म्हणतात,

या गीतार्थाची थोरी।स्वये शंभू विवरी।

जेथ भवानी प्रश्नु करी।चमत्कारोनी ॥१. ७०॥

तेथ हरु म्हणे नेणिजे।देवी जैसे गा स्वरुप तुझे।

तैसे नित्यनूतन देखिजे।गीतातत्त्व॥१. ७१॥

म्हणजे या गीतार्थाची महती येवढी की प्रत्यक्ष शंकर त्यावर विचार करीत स्तब्ध बसल्यावर पार्वती मातेला काही राहवले नाही. बायकाना स्वतःला गप्प बसवत नाहीच पण नवराही गप्प बसलेला बघवत नाही. म्हणून त्यानी विचारलेच "अहो, येवढा कसला (कदाचित कोणच्या अप्सरेचा असेही)विचार चाललाय? "यावर शंभूमहादेव भोळे सांब म्हटले तरी महामिस्किल त्यामुळे सरळ उत्तर न देता म्हणतात, "देवी तुझ्या स्वरूपाचा (आणि स्वभावाचाही)जसा थांग लागत नाही तसच या गीतातत्त्वाच आहे. त्यातून (तुझ्या बोलण्याप्रमाणे)दररोज नवीन नवीन अर्थ निघत असतात. " आजच्या नवऱ्यांचाही हाच अनुभव असतो ना!

दुसऱ्या अध्यायात अर्जुनाचा शोक पाहून श्रीकृष्णास हा क्षत्रिय असून असा का बरळू लागलाय असे जे आश्चर्य वाटते ते व्यक्त करतानाही ज्ञानदेवानी श्रीकृष्णाच्या संवादाला विनोदाची फोडणी दिली आहे.

मग आपुलां चित्ती म्हणे।येथ काय आदरिले येणे।

अर्जुन सर्वथा काही नेणे।काय कीजे॥२. ८४॥

श्रीकृष्ण मनात म्हणतात, याने येथे काय चालवले आहे, आता याला जरा खडसावलेच पाहिजे म्हणून ते पुढे म्हणतात,

तू जाणता तरी म्हणविशी।परि नेणिवेते न संडसी।

आणि शिकवू म्हणो तरी बोलसी बहुसल॥२. ९२॥

आपले न ऐकणाऱ्या मुलास बापाने 'येवढा घोडा झालास तरी अजून काही अक्कल आली नाही आणि सांगायला गेले तर वर आपणच वर तोंड करून बोलतोय अगदी असेच हे शब्द. आणि पुढे पहा,

"तू आपणपे नेणसी।परि या कौरवाते शोचू पाहसी।
हा विस्मय बहु आम्हासी।पुढतपुढती॥२. ९४॥
तरी सांग पा अर्जुना।तुजपासूनि स्थिती या त्रिभुवना।
हे अनादि विश्वरचना।लटके कायी॥२. ९५॥
हो का सांप्रत ऐसे जाहले।जे हे जन्ममृत्यु तुवा सृजिले।
आणि नाशु पावे नाशिले।तुझेनि कायी॥२. ९७॥
परी मूर्खपणे नेणसी।ना चिंतावे ते चिंतसी।
आणि तूचि नीती सांगसी।आम्हाप्रती ॥२. १०१॥

एकाद्या लहान मुलाला कान पकडून सांगावे तसे श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, "अरे शहाण्या, धड स्वतःला ओळखत नाहीस आणि निघालाय कौरवांच्या मरण्याचा शोक करायला. जरा गावठी भाषेत सांगायचे म्हणजे अरे स्वतःचे *** धुता येत नाही आणि निघालाय उंटाच्या शेपटीचा मुका घ्यायला. मला हे सांग बाळा, जगाची जी काय बरी वाईट स्थिती आहे ती तुझ्यामुळे असे वाटतेय का तुला? मग ही रचना अनादि

वगैरे आहे म्हणतात ते सगळे खोटेच म्हणायचे. अवध्या जगात जे काय जन्ममृत्यु होत आहेत ते तूच घडवून आणतो आहेस असे तुला वाटतेय का? मूर्खपणा सोडत नाही नको तो विचार करतो आणि वर नीतीच्या गप्पा आम्हालाच झोडतो. "

तिसऱ्या अध्यायाच्या सुरवातीला मात्र पारडे पलटते आणि अर्जुनच कृष्णाची चांगली खरडपट्टी काढतो, तो भागही वाचून हसू आल्यावाचून रहावत नाही, अर्जुन म्हणतो,

तेथ कर्म आणि कर्ता।उरेचिना पाहता।
ऐसे मत तुझे अनंता।निश्चित तरी॥३. २॥
तरी माते केवी हरी।म्हणसी पार्था संग्रामु करी।
इये लाजसीना महाचोरी।कर्मी सुता॥३. ३॥
हां गा कर्म तूचि अशेष।निराकरसी निःशेष।
तरी मजकरवी हे हिंसक। का करविसी तू॥३. ४॥

अशाप्रकारे गुरूची विद्या गुरूवरच उलटवून अर्जुन म्हणतो, " अहो महाशय एकीकडे कर्ता कर्म असे काही नसतेच असे म्हणून कर्मसंन्यासाचा उपदेश मला करत आहात आणि मग मात्र पार्था लढ म्हणून युद्धाच्या महाघोर कर्मात मला ढकलायला लाज कशी वाटत नाही तुला? 'असे

म्हणून अर्जुनाने त्याची चक्क लाज काढली आहे आणि असा उलटसुलट उपदेश करून माझा बुद्धिभ्रम करत आहेस असे त्याला बजावत म्हणतो,

देवा तुवाचि ऐसे बोलावे।तरी आम्ही नेणती काय करावे।
आता संपले म्हण पा आघवे।विवेकाचे॥३. ६॥
हां गा उपदेशु जरी ऐसा।तरी अपभ्रंशु तो कैसा।
आता पुरता आम्हा घिंवसा।आत्मबोधाचा॥३. ७॥
वैद्य पथ्य करुनि जावे।मग जरी आणचि विष सुये।
तरी रोगीया कैसेनि जिये।सांग मज॥३. ८॥
जैसे आंधळे सुइजे आव्हांटा।का माजवण दिले मर्कटा।
तैसा उपदेशु हा गोमटा।वोढवला आम्हा॥३. ९॥
मी आधीचि काही नेणे।वरी कवळलो मोहे येणे।
कृष्णा विवेकु या कारणे।पुसला तुज॥३. १०॥
आम्ही तनुमनुजीवे।तुझिया बोला वोटंगावे।
आणि तुवाचि ऐसे करावे।तरी सरले म्हणे॥३. १२॥
आता ऐसियावरी बोधिसी।तरी निके आम्हा करिसी।
एथ ज्ञानाची आस कायसी।अर्जुन म्हणे॥३. १३॥
तरी जाणिवेचे कीर सरले।परि आणिक एक ऐसे झाले।

जी थिते डहुळले।मानस माझे॥३. १४॥

पुढे आणखी देवाला तो बजावतो "देवा तूच असे केलेस तर मग संपलेच म्हणायचे. आम्हाला काही कळत नाही म्हणून तुला विचारायला गेले तर तू उपदेश असा चक्करछाप करत आहेस की माझे मन जे थोडेफार ताळ्यावर होते तेही पार गडबडून गेलेय. देवा तूच जर असा बोलू लागलास तर आम्ही अडाण्यानी काय करावे? अरे यालाच जर उपदेश म्हणायचे तर बुद्धिभ्रंश कशाला म्हणायचे? अरे वैद्याने पथ्यपाणी सांगून औषध म्हणून जर विष दिले तर काय होणार? आंधळ्याला मुद्दाम आडवाटेला नेऊन सोडावे किंवा माकडाला भांग पाजावी तसाच तुझा हा उपदेश दिसतो. असाच उपदेश करणार असशील तर आमचे कल्याणच झाले म्हणायचे. "

सहाव्या अध्यायाच्या सुरवातीस ही त्यांच्या विनोदाचा पुन्हा प्रत्यय येतो. त्यात संजय आणि धृतराष्ट्र यांचा संवाद आहे,

कैसी देवाची थोरी नेणिजे।जैसा तान्हेलिया तोय सेविजे।

की तेचि चवी करुनि पाहिजे।तंव अमृत आहे॥६. ३॥

तैसा आम्हातुम्हा जाहले।जे आडमुठी तत्त्व पाहिले।

तंव धृतराष्ट्र म्हणितले।हे न पुसों तूते।६. ४॥

तया संजया येणे बोले।ऱायाचे हृदय जोचवले।

जे अवसरी आहे घेतले।कुमारांचिया॥६. ५॥

हे जाणोनि मनी हासला।म्हणे म्हातारा मोहे नाशिला।
एऱ्हवी बोलू तरी भला। अनसरिये॥६. ६॥
परि ते तैसे कैसेनि होईल।जात्यंधा कैसे पाहेल।
तेवीचि येरु रुसे येईल।म्हणोनि बिहे॥६. ७॥

मागील ५व्या अध्यायात कृष्णानी सांगितलेले तत्त्वज्ञान ऐकून झालेला आनंद संजय सहाव्या अध्यायाच्या तिसऱ्या ओवीत प्रकट करतो. आणि म्हणतो, ’’काय भाग्य आमचे, तहानलेल्याने पाणी मागावे आणि मिळालेले ते तर अमृत निघावे यापेक्षा थोर भाग्य ते काय? ’’ ते तत्त्वज्ञान धृतराष्ट्रानेही ऐकलेले असते त्यामुळे त्यालाही बरे वाटायला हरकत नव्हती पण त्याला संजयाकडून आपल्या पोरानी कुरुक्षेत्रावर काय दिवे लावले हे जाणण्याचीच काय ती उत्सुकता होती त्यामुळे तो म्हणतो, " अरे शहाण्या हे तुला कोणी विचारलेय? "यावर संजय हे ऐकून मनात हसतो आणि आपल्याशीच म्हणातो"हा म्हातारा पुत्रप्रेमाने अगदीच कामातून गेला. येवढे चांगले तत्त्वज्ञानही याला गोड लागत नाही "गाढवाला गुळाची काय चव असेच त्याला म्हणायचे आहे पण त्या म्हाताऱ्याला राग येईल म्हणून हे उघडपणे म्हणायला तो घाबरतो.

. धृतराष्ट्राची अशीच चंपी पुन्हा एकदा नवव्या अध्यायात केली आहे. त्यात संजय म्हणतो,

अहो ऐकिजत असे की अवधारा।तंव इया बोला निवांत म्हातारा।

जैसा भैसा नुठी का पुरां।तैसा उगाचि असे॥९. ५२२॥

तेथ संजये माथा तुकिला।अहा अमृताचा पाऊस वर्षला।

की हा एथ असतुचि गेला।सेजिया गावा॥९. ५२३॥

तऱ्ही दातारु हा आमुचा।म्हणून हे बोलता मैळेल वाचा।

काय झाले ययाचा।स्वभावोचि ऐसा॥९. ५२४॥

संजय थट्टेने म्हणतो, "अहो येवढे चांगले तत्त्वज्ञान ऐका म्हटले तरी हा म्हातारा अगदी पाण्यात बसलेल्या रेड्यासारखा सुस्त बसलाय, येवढा अमृताचा वर्षाव झाला पण हा जणु त्या गावचाच नाही असे दाखवतोय, पण काही झाले तरी तो आमचा मालक आहे तेव्हा गप्प रहाण्यातच शहाणपण आहे. पण याचा स्वभावच असा त्याला काय करावे?

अठराव्या अध्यायात पुन्हा धृतराष्ट्राच्या बालिश बुद्धीचे दर्शन विनोदी भाषेत घडवले आहे. संजयाच्या तत्त्वज्ञान कौतुकाला कंटाळून तो त्याला म्हणतो,

तेथ कोणी येकी अवसरी।होआवी ते करुनि दुरी।

रावो म्हणे संजया परी।कैशी तुझी गा॥१८. १६२३॥

तेणे तूंते येथे व्यासे।बैसविले कासया उद्देशे।

अप्रसंगामाजी ऐसे।बोलसी काई॥१६२४॥

जो जेथीचे गौरव नेणे।तयासि ते भिंगुळवाणे।

म्हणोनि अप्रसंगु तेणे।म्हणावा की तो॥१६२६॥

"अरे बाबा व्यासानी तुला येथे बसवलेय कोणत्या उद्देशाने? (धृतराष्ट्राच्या मते युद्धाचा वृत्तांत सांगण्यासाठी)आणि तू मात्र उगीचच नको त्या गोष्टी(म्ह. तत्त्वज्ञान) सांगून मला वैताग आणतो आहेस. "यावर संजय म्हणतो, "या गोष्टीची याला चव नसल्यामुळे याला हा वैतागच वाटणार"

पुढे मात्र धृतराष्ट्र मोठ्या आशेने या युद्धात जय कोणाचा होणार याविषयी संजयाचे स्पष्ट मत विचारतो. आणि पुन्हा त्याच्याकडून काय उत्तर अपेक्षित आहे हेही एकाद्या बालका(किंवा हुकुमशहा) सारखे सांगून टाकतो. "अरे संजया नाहीतरी दुर्योधन महाप्रतापी आहेच, शिवाय दुसऱ्या बाजूपेक्षा(पांडवांचा सरळ उल्लेखही टाळतो)दीडपट सैन्य त्याच्याकडे आहे तर मग त्यालाच विजय मिळायला नको का? " यावर संजय काय उत्तर देणार? पण तोही काही कच्च्या गुरूचा चेला नाही. सरळसरळ उत्तर न देता ज्या बाजूला योगेश्वर कृष्ण आणि धनंजय पार्थ आहे त्या बाजूलाच विजय मिळणार हे सांगून आपण सच्चा पत्रकार आहे हे दाखवून देतो.

म्हणे सांगे प्रस्तुत।उदयलेसे जे उत्कळित।

ते कोणासि बारे जैत।देईल शेखी॥१८. १६२७॥

एऱ्हवी विशेषे बहुतेक।अमुचे ऐसे मानसिक।

जे दुर्योधनाचे अधिक।प्रताप सदा॥१६२८॥

आणि येराचेनि पाडे।दळही याचे देव्हडे ।

म्हणोनि जैत फुडे।आणील ना ते॥१८२९॥

आम्हा तंव गमे ऐसे।मा तुझे जोतीष कैसे।

ते नेणो संजया ऐसे।तैसे सांग पा॥१६३०॥

यावरील संजयाचे उत्तर

यत्र योगेश्वरो कृष्णो

यत्र पार्थो धनंजयः।

तत्र श्रीविजयोर्भूतिर्ध्रुवानीतिर्मतिर्मम

तर प्रसिद्धच आहे, त्यावर बरेच भाष्य करून ज्ञानदेवानी संजयाच्या तोंडी घातले आहे,

म्हणोनि जेथ श्रीश्रीमंतु।जेथ तो पांडूचा सुतु।

तेथ विजय समस्तु।अभुदयो तेथ॥१६५५॥

# ९. चोर येता घरा

चोर घरी यावेत असे कुणाला वाटत असेल असे नाही पण चोराना मात्र सगळ्यांकडे जावेसे वाटते. चोर कोणाच्या घरी जावे हे कसे ठरवतात हा मला नेहमी प्रश्न पडतो. एकाद्या ठिकाणी डबोल मिळणार अशी कुणकुण लागल्यावर तेथे चोरांनी जाणे हे समजू शकते म्हणजे खूप परिश्रमपूर्वक बँका किंवा सोन्याचांदीच्या दुकानावर ते धाड घालतात यात काही आश्चर्य नाही पण आमच्यासारख्या कफल्लकांवरही मेहेरनजर करून आमची दारिद्र्यरेषेतून बढती केल्याचे पुण्य त्यांना लाभले तरी त्यांच्या गाठी मात्र काहीच पडत नाही हे त्यांना कसे समजत नाही कुणास ठाऊक, कदाचित कोणे एके काळी चारुदत्तासारख्या निष्कांचन माणसाकडे दागिन्यांचे घबाड सापडल्याचा दाखला शर्विलकांनी म्ह. चोरांच्या पूर्वजानी त्यांना दिल्यामुळे असाही एकादा प्रयत्न फुरसतीच्या काळात करायला हरकत नाही हाच आमच्या घराच्या भेटीमागे त्यांचा विचार असावा.

चोर येऊन गेल्याचा एक फायदा मात्र होतो तो म्हणजे आपली बरीच प्रसिद्धी होते. ज्याना येनकेन प्रकारेण प्रसिद्धपुरुषो भवेत् अशी इच्छा असते त्यांना हा चांगला योग असतो. पण ज्यांना तशी इच्छा नसते त्यानाही या प्रकारे प्रसिद्धी मिळणे आनंददायक वाटत असते असे काही मला वाटत

नाही. कारण ती बातमी कळताच आपल्या समाचारास येणाऱ्या लोकांकडून चोर येऊ नयेत म्हणून आपण दारेखिडक्या कशी बंद करायला हवी होती हा आता उपयोगी न पडणारा सल्ला आपल्याला ऐकावा लागतो. आपण ज्या घरात रहातो त्या घराच्या रचनेतील निरनिराळ्या इतक्या चुका ते आपल्याला दाखवतात की अशा असुरक्षित घरात इतके दिवस चोरी कशी झाली नाही याचेच आपल्याला नवल वाटायला लागते. येवढेच काय पण दुर्दैवाने ते घर आपणच बांधले असले तर ते पाडून पुन्हा नव्याने बांधावे असे वाटू लागते. चोरानी जर घरातील रोकड किंवा सोन्याचे दागिने वगैरे नेले असतील तर दागिने बॅंकेत लॉकरमध्ये का ठेवले नाहीत याचा जाब द्यावा लागतो तसेच एवढी रोकड घरात ठेवू नये अशी प्रेमळ दटावणी ऐकावी लागते. आपल्या पाठीमागे मात्र एवढी रक्कम अथवा दागिने ज्याअर्थी आपण घरात ठेवले त्याअर्थी त्यांच्या प्राप्तीमागे आपली काहीतरी भानगड असावी असा अंदाज केला जातो आणि ‘‘हपापाचा माल गपापा झाल्याबद्दल हे असेच होणार’’ असा अभिप्रायही व्यक्त केला जातो. अर्थात हे सर्व आपल्यावरील प्रेमापोटीच होते हे उघडच आहे. त्यातल्या काहीजणांना जर चोरी होऊनही आपले काहीच गेले नसेल तर त्याचेच (मनातल्यामनात) वाईट वाटते कारण यापूर्वी या लोकांचे घर काही इतर चोरांनी धुवून नेलेले असते.

काही लोक चोरांना फारच आवडतात. या लोकांनी कितीही वेळा घरे बदलली असो वा त्यांच्या घरात काही ऐवज मिळालेला असो वा नसो पण त्यांच्या घरास मधूनमधून भेट देणे हे आपले कर्तव्यच आहे असे का कोण जाणे चोरांना वाटत असते. माझी गणना अशा चोरांच्या लाडक्या लोकांत होत नसली तरी चोरांनी कधीच भेट दिली माही अशा सुदैवी लोकांतही माझी गणना होत नाही.

मला आठवते तशी आमच्या घरात पहिली चोरी मी अगदी लहान असताना झाली. म्हणजे मी फार तर तीन चार वर्षाचा असेन त्यावेळी! अर्थात मी मोठा असतो तरी चोरांना हाकलून लावण्यात मी फार मोठा हातभार लावला असता अशातला भाग नाही. त्यावेळी प्लेगच्या साथीमुळे आम्ही सर्व ग्रामस्थ गावातील घरे सोडून गावाबाहेर माळावर झोपड्या बांधून रहात होतो अशावेळी गावातली आमची घरे आयती मोकळी पडलेली असताना आमच्या झोपड्याना भेट देण्याची लहर चोरांना का आली कुणास ठाऊक? कदाचित त्या घरात शिरलो तर आपल्यालाही प्लेगची लागण होईल अशी भीती त्यांना वाटली असावी आणि समजा आमच्याकडे काही चीजवस्तु असलीच तर ती आम्ही झोपडीतच नेली असणार असा तर्क त्यानी केला असणार आणि तशी झोपडी बांधीव घरापेक्षा फोडायला सोपी हा त्यांचा अंदाज! पण झोपड्यातले लोक जवळजवळ असल्याने एकमेकाला जागे करतील हे त्यांच्या लक्षात न

आल्याने त्यांचा प्रयत्न यशस्वी होण्यापूर्वीच "चोर चोर" असा आरडाओरडा झाला आणि माझे वडील आणि शेजारी पळतपळत बाहेर पडल्याचे पहाटे कानावर पडल्यामुळे मलाही जाग आली आणि चोर घरात किंवा आसपास येऊन गेले हे मला समजले.

त्यानंतर मधल्या काळात बरीच वर्षे चोरांना आमची आठवण झाली नाही. कदाचित त्याहून महत्त्वाच्या मोहिमा पार पाडण्यात ते गुंतले असावेत. पुढे आम्ही औरंगाबादला स्थायिक झालो आणि एका बंगल्याच्या औटहौसमध्ये आम्हाला भाड्याने रहायला जागा मिळाली. तेव्हां ते अगदी सुरक्षित शहर आहे असा तेथील रहिवाशांचा समज होता त्याचे एक उदाहरण म्हणजे सायकल भाड्याने घेतली तर तिला कुलुप नसायचे आणि ती चोरीला जाणार नाही अशी सायकलच्या दुकानदारास खात्री असे. त्यामुळे औटहौसच्या मालकालाही चोर औटहाउसमध्ये मुद्दाम परिश्रमपूर्वक चोरी करतील असे वाटत नसावे, किंवा त्याला तेथे रहायचे नसल्याने त्याच्या ऐवजाला काही धोका नव्हताच त्यामुळे त्या घराची रचना चोरांच्या दृष्टीने अगदी आदर्श असली तरी त्याचे त्यांना (म्हणजे मालकांना, चोरांना नव्हे) मुळीच सोयरसुतक नव्हते. तसे पहाता त्या औटहाउसमध्ये रहाणाऱ्या आमच्यासारख्या भाडेकरूंची आर्थिक परिस्थिती खरे तर चोरीच्या दृष्टीने मुळीच आदर्श नव्हती, पण हे चोरही शर्विलकाचे वंशज असावेत! पण अपेक्षेप्रमाणेच बिचाऱ्याच्या हातास यश नव्हते. उभे गज

लावून सुरक्षित केलेल्या सताड उघड्या खिडकीच्या दारावर लटकवलेली वडिलांची काठी सहजपणे त्याच्या हाती आली. तिचा वापर करून भिंतीवरील खिळयास अडकवलेली माझी पँट व वडिलांचे धोतर त्याच्या हाती लागले. पँटच्या खिशाची पहाणी करून त्यात काहीच न सापडल्यामुळे बरीच भोके पडलेले धोतर व माझी पँट या बोहारणीनेही नाकारलेल्या वस्तु काठीसह अंगणात टाकून चोराने पलायन केले होते. सकाळी फिरायला जाताना वडील काठी शोधू लागल्यावर चोरांच्या या भेटीचा पत्ता आमच्याबरोबर आमच्या शेजाऱ्यानाही लागला आणि आमच्यापेक्षा चोराविषयीच जास्त हळहळ त्यांनी व्यक्त केली.

या भेटीमुळे चोरांचा आम्ही घेण्याऐवजी चोरांनीच आमच्या घराचा इतका धसका घेतला की त्यानी बरेच दिवस आमचे घर टाळले. त्यानंतर पुढे ज्या दुसऱ्या घरात आम्ही भाडेकरू म्हणून रहात होतो त्याचे घरमालक चोरांचे फारच लाडके होते. आम्ही त्यांच्या घरात रहायला लागण्यापूर्वी त्यांच्या घरास चोरांनी बऱ्याच भेटी दिल्या होत्या पण आमचा लौकिक माहीत असल्याने यावेळी चोरांनी त्यांच्या घराऐवजी आमच्या शेजारच्या घरास भेट देऊन पाहू असा विचार केला. त्या घराची एक खिडकी आम्ही रहात असलेल्या घराच्या आमच्या भागास अगदी लागून होतीआणि अंगणाच्या जमिनीपासून इतक्या कमी उंचीवर होती की दार उघडून घरात शिरण्यापेक्षा तिचे गज कापून घरात शिरणेच चोराला अधिक

सोपे वाटले. त्या खिडकीपाशीच घरातला कर्ता पुरुष झोपला होता आणि तो एवढ्या जोरात घोरत होता की चोरास ते जणु एक प्रकारे आवाहनच वाटले, गज कापण्याच्या आवाजाने त्या थोर पुरुषाला जाग आली नाहीच पण त्याच्या कुटुंबियानाही गज कापण्याचा आवाज हाही त्याच्या घोरण्याचाच भाग वाटला असल्यास नकळे! किंवा तो चोराच्या कौशल्याचाही भाग असेल पण दुर्दैव बिचाऱ्याचे, कारण एवढ्या कौशल्याने गज कापून तो घरात शिरायला आणि घरातले तान्हे मूल जागे होऊन रडायला लागायला एकच गाठ पडली आणि मुलाची आई जागी झाली. मुलाला थोपटून गप्प करून ती बाथरूमकडे जऊ लागली तो चोरमहाशय तिच्या नजरेस पडले. अर्धवट झोपेत असल्याने या घटनेचे गांभीर्य बिचारीच्या लक्षात न आल्याने "कोण आहे? " एवढाच प्रश्न झोपेतल्या झोपेत तिने विचारला, चोरमहाशयानी तेवढ्यात प्रसंगावधान दाखवून " बाई, दुधाच्या बाटल्या न्यायला आलोय" असे उत्तर दिले. बाई अजून झोपेतच होत्या त्यामुळे पुन्हा त्याच अवस्थेत त्यांनी " इतक्या लवकर रे कसल्या बाटल्या? " असे विचारले आणि एकदम लखकन् वीज चमकावी तशा त्या भानावर आल्या आणि विचारू लागल्या " पण तू आत कसा आलास? "

मग मात्र आपले बिंग उघडकीस आले हे लक्षात येऊन चोराने पळत बाहेरील दरवाजा गाठला आणि तो उघडून पळ काढला. बाई मात्र

खऱ्याच धीराच्या, शांतपणे दरवाजा बंद करून झोपल्या. खिडकीला पडदा असल्याने गज कापल्याचे काही त्यांच्या ध्यानात आले नाही चोरमहाशय घराबाहेर पडून आपल्या इतक्या परिश्रमावर पाणी पडल्यामुळे हळहळत चालत पुन्हा त्याच खिडकीपाशी आले. बाई काही आरडाओरडा न करता शांतपणे झोपल्यामुळे चोरास तेथून पळून जाण्याचे कारण उरले नाही. एवढी गज कापण्याची मेहनत करून आत शिरलो पण काम पूर्ण न करताच बाहेर पडलो याचा पश्चाताप त्यास होत असणार आणि त्याचबरोबर आता दुसऱ्या घरात शिरायचे म्हणजे पुन्हा पहिल्यापासून सुरवात करावी लागणार याचाही धसका त्याने घेतला असणार किंवा घराच्या दारातून बाहेर पडल्यामुळे त्या गल्लीत शिरल्यावर आपण कुठल्या घरातून बाहेर पडलो हे त्याच्या ध्यानात राहिले नाही की काय कोण जाणे पण त्यामुळे गज कापलेली खिडकी दिसताच ही आपल्यासाठी आणखी एक संधी आहे या समजुतीने तो पुन्हा त्याच खिडकीतून आत शिरू लागला पण यावेळी मात्र खिडकीजवळ झोपलेल्या गृहस्थाची झोप पुरी झाली असावी त्यामुळे चोराचा घरात प्रवेश होण्यापूर्वीच त्याना जाग येऊन त्यानी आरडाओरडा करायला सुरवात केली तेव्हा मात्र आपला प्रयत्न अर्धवट सोडणेच इष्ट हे ओळखून चोरसाहेबानी पोबारा केला. मीही खिडकीखालच्या गृहस्थासारखाच पण माझ्या घरात घोरण्यात दंग होतो त्यामुळे हा सर्व वृत्तांत आमच्या सौभाग्यवतीने एकाद्या

टी. व्ही. मालिकेप्रमाणे अगदी तिच्यासमोर घडावा अशा थाटात मला निवेदन करीपर्यंत या सगळ्या महाभारताचा पत्ता मलाही नव्हता.

आजकाल चोरांच्या भयानक कृत्यांच्या बातम्या वाचल्यावर आम्हाला भेट देणारे चोर फारच प्रेमळ होते असे म्हणावे लागेल. अर्थात त्याहूनही बेरकी चोर या ना त्या पद्धतीने जवळजवळ आपल्या खिशात हात घालूनच किंवा आपण बँकेत सुरक्षित म्हणून ठेवलेल्या आपल्या पैशावर डल्ला मारतात तेव्हा ते पहात बसणे यापलिकडे आपण काय करू शकतो? शिवाय तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे बॅंकेतीलच पैसे गायब करणे किंवा एटीएम मध्ये आपल्यावर पाळत ठेवून आपल्या एटीएम भेटीनंतर आपल्याच खात्यातून पैसे लांबवणे असे सुरक्षित मार्गही उपलब्ध असताना उगीच धोका पत्करून चोऱ्या करायला चोर वेडे थोडेच आहेत?

# १०. लाखमोलाची माणसं!

फोनची रिंग वाजू लागली आणि तो कोणाचा असेल याची जवळ जवळ खात्रीच असल्यामुळे आम्ही दोघेही तो घेण्यासाठी धावलो. आमच्या अंदाजाप्रमाणे तो सुजितचा म्हणजे आमच्या अमेरिकेतील मुलाचा होता. "काय चाललेय" त्याने नेहमीप्रमाणे विचारले पण त्यानंतर त्याने विचारलेल्या प्रश्नाने आम्ही एकदम चकितच झालो. कारण तो प्रश्न होता " काय भूमकरांकडे चोरी झाली म्हणे" "अरे ही काय इंटरनॅशनल न्यूज आहे की काय? म्हणजे भूमकर औरंगाबादला, आम्ही पुण्याला आणि त्यांच्याकडे चोरी झाल्याची बातमी आम्हाला कळण्याअगोदर अमेरिकेत तुला कशी काय कळली? " मी आश्चर्याने विचारले. या विचारण्यामागे आमच्याअगोदर ही बातमी अमेरिकेतल्या माझ्या मुलाला कळावी या आश्चर्यापेक्षाही भूमकरांकडे चोरी व्हावी याचेच जास्त आश्चर्य होते.

भूमकरांकडे चोरी होणे म्हणजे एकाद्या अभेद्य किल्ल्याला खिंडार पडणे असा माझाच काय पण आमच्या सगळ्यांचा आणि त्यांच्या आजूबाजूला राहणाऱ्याही सर्वांचा समज होता. आणि त्यात तथ्यही होते. आम्ही औरंगाबाद सोडण्याचा निर्णय केल्यावर त्यानी माझ्याकडून घर विकत घेतले. त्यावेळी आमच्या घरात यापूर्वी चोरीचे बरेच प्रयत्न झाले

(आणि त्यात चोराला काहीही मिळाले नाही हेही) ऐकून घेतल्यावर पहिले काम त्यानी काय केले असेल तर आमच्या (म्हणजे आता त्यांच्या) घराच्या खिडक्यांना प्रथम लोखंडी जाळी असूनही त्यावर त्याहून आणखी मजबूत जाळी बसवून घेतली. जिन्यातून घरात प्रवेश करता येत होता म्हणून तो त्यांनी सरळ भिंत घालून बंद केला. व्हरांड्याला जाळी होती तीही त्यानी बंद करून टाकली. गेटची जागा बदलून टाकली ज्यामुळे ते हॉलच्या दारासमोर आल्यामुळे त्यावर सर्वांचे लक्ष राहू लागले. याशिवाय घराच्या ज्या खोल्या बाहेरच्या अंगास होत्या त्यामधून मधल्या खोल्यात येणाऱ्या सर्व लाकडी दरवाजांना दुकानात बसवतात तशी रोलिंग शटर्स त्यांनी बसवून घेतली. शिवकाळात ते असते तर किल्ल्याचा बंदोबस्त कसा करावा याचे प्रशिक्षण त्यानी मावळयांना नक्की देऊ केले असते.

आम्ही पुन्हा काही दिवसांनी औरंगाबादला त्यांच्याकडे गेलो तेव्हां त्यानी मोठ्या अभिमानाने आमच्या (अजूनही ते आमच्याशी बोलताना तुमचा बंगला असाच उल्लेख करायचे) बंगल्यास कशी कडेकोट सुरक्षाव्यवस्था करून घेतली आहे हे प्रत्येक शटर वरखाली करून अभिमानाने दाखवले होते, आणि चोर आलेच तरी सगळे सुरक्षाकवच भेदून त्यांना घरात शिरायला किती वेळ लागेल याचे वर्णन करून तेवढ्या वेळात पोलिसांचे पथक घराला वेढा देऊ शकेल असा आशावादही व्यक्त केला आणि त्यांच्या कमिशनरपर्यंत ओळखी असल्यामुळे त्यांच्याकडे चोरी

झाली तर पोलिसपथक नसले तरी एकादा पोलिस तरी फिरकेल अशी शक्यता असल्यामुळे मीही तो मान्य केला. सुदैवाने त्यांच्याकडे स्टॉपवॉच नव्हते नाहीतर त्यांनी त्याचे प्रात्यक्षिक करताना वेळ किती लागतो याचेही प्रात्यक्षिक करून दाखवले असते. त्यामुळे एक वेळ राष्ट्रपतीभवनात किंवा अमेरिकन अध्यक्षांच्या घरी चोरी होईल पण भूमकरांकडे होणार नाही अशी आमची खात्री होती, अशा परिस्थितीत ती व्हावी आणि वर ही बातमी आमच्या अमेरिकेतल्या मुलाला अगोदर कळावी ही आश्चर्याचीच गोष्ट नव्हती का?

त्यामुळे औरंगाबादला गेल्यावर प्रथम त्यांच्याकडे जाऊन त्यांचे सांत्वन करणे आवश्यक होते. उडत उडत कळलेल्या बातम्यांवरून त्यांच्या घरातील कपाटात ठेवलेले एक लाख रुपये चोरीस गेले होते असे माहीत झाले होते. एक लाख ही काही आजकालच्या काळात फार मोठी रक्कम नाही तरी अगदीच दुर्लक्षित करण्यासारखी तरी निश्चितच नव्हती. आम्हाला पाहताच भूमकरांनी पूर्वीच्याच उत्साहाने आमचे स्वागत केले. त्यामुळे त्यांच्याकडे चोरी झाल्याबद्दल दुःख व्यक्त करण्याऐवजी त्यांचे अभिनंदन करावे अशी त्यांची अपेक्षा होती की काय अशी शंका मनात डोकावून गेली. पण त्याचवेळी त्यांच्या नातवाने आय. आय टीला प्रवेश मिळवण्याचा पराक्रम केल्यामुळे ते त्या आनंदात होते त्यामुळे आम्हालाही खरोखरीच त्यांचे अभिनंदन करण्याची चांगली संधी मिळाली.

शेवटी आम्हाला चोरीविषयी विचारणा करायला लागण्यापूर्वी त्यांनी्च तो विषय काढला आणि मग मला छळणारा प्रश्न मी त्यांना विचारला, " येवढी कडक सुरक्षाव्यवस्था करूनही अशी चोरी कशी झाली?"

" काय सांगू साहेब, " ते सांगू लागले; "घर अगदी सुरक्षित राहूनच चोरी झाली" आणि माझा प्रश्नांकित चेहरा पाहून ते पुढे म्हणाले. " अहो, संध्याकाळची वेळ होती. आम्ही दोघे एका कार्यक्रमासाठी बाहेर गेलो होतो घरात आमच्या मातोश्री झोपल्या होत्या समोर आमचा नेहमीचा विश्वासू सहाय्यक झाडांना पाणी घालत होता. आणि घरी परत येऊन पाहतो तो ही चोरी झालेली" हे ऐकल्यावर हा भुताटकीचा प्रकार तर नव्हे ना असे आम्हाला वाटले पण आमच्या कल्पनाशक्तीला अधिक ताण द्यायला न लावता त्यानी आम्हाला, " चला चोरी कशी झाली तेच तुम्हाला दाखवतो" हे ऐकल्यावर त्यांच्या घरच्या चोरीचे व्हिडिओशूटिंग झी टी. व्ही. ने घेऊन त्याची सीडी त्यांना दिली की काय अशी शंका मला आली.

पण त्या ऐवजी त्यानी आम्हाला बाहेर अंगणात नेले आणि तेथील झाडांकडे बोट दाखवून त्यांनी आम्हाला सांगितले, " या झाडांना आमचा सहाय्यक पाणी घालत होता" त्यावेळीही तो पाणीच घालत होता. हा बंगल्याचा समोरचा भाग होता. नंतर घरात नेऊन त्यांनी त्यांच्या मातोश्री ज्या खोलीत विश्रांती घेत होत्या ती खोली दाखवली आणि त्या

खोलीशेजारची खोली दाखवून ते म्हणाले, " या समोरच्या खोलीत लोखंडी कपाटात सेफमध्ये मी एक लाख रुपये ठेवले होते" त्यावेळी त्या खोलीला कुलूप होते आणि कुलूप असताना चोरी करणे शक्य नाही असा माझा समज असल्यामुळे, " मग त्यावेळी खोलीला कुलूप नव्हते की काय? " असे मी विचारताच " छे छे त्यावेळीही खोलीला आम्ही कुलूप लावूनच बाहेर गेलो होतो " असे त्यांनी सांगितल्यावर " मग चोर आत गेले कसे? " असे मी विचारल्यावर" अहो ते आत गेलेच नाहीत" असे त्यानी उत्तर दिल्यावर अगदी बिरबल आणि अकबर यांच्या गोष्टीतील चतुर चोरच हा असावा असे मला वाटू लागले आणि त्यामुळे. " मग चोरी झाली तरी कशी? " असा प्रश्न माझ्या तोंडून बाहेर पडला कारण त्यावेळपर्यंत ही चोरी झाली की नाही किंवा स्वतः भूमकरांनीच प्रसिद्धीचा स्टंट म्हणून ती चोरी केली की काय असे मला वाटू लागले होते, पण भूमकरानी मला लगेचच " चला तेच तर तुम्हाला दाखवायचे आहे" असे म्हणत जवळजवळ माझ्या हाताला धरून ओढतच पुम्हा घराबाहेर नेले.

त्यांचा विश्वासू सहाय्यक अजूनही पाणी घालत होताच. त्याच्यासमोरूनच आम्ही बंगल्याच्या मागच्या बाजूस गेलो आणि ज्या खोलीत ते कपाट ठेवलेले होते त्या खोलीच्या मागच्या बाजूस आम्ही आलो. तेथील खिडकी ज्या खोलीत चोरी झाली त्या खोलीत उघडत होती. यावरून ही खिडकी तोडून चोर आत शिरले असावेत असा मी तर्क केला.

पण त्या खिडकीसही आम्ही लावलेल्या लोखंडी जाळीवर आणखी एक भक्कम लोखंडी जाळी भूमकरानी बसवलेली होती आणि ती अगदी जशीच्यातशी होती, यावरून चोरीनंतर ताबडतोबीने त्यांनी त्या जाळीची दुरुस्ती करून घेतली असावी असा मी अंदाज बांधला. पण तो चुकीचा होता हे पुढे कळले.

"हा बांबू पेरू काढण्यासाठी आम्ही पेरूच्या झाडाखालीच ठेवतो तो त्यादिवशीही इथेच होता" भूमकरांनी त्या खिडकीखाली पडलेला बांबू उचलत आपली रनिंग कोमेंट्री सुरू केली. त्या बाबूला पुढे लोखंडी आकडा लावलेला होता. आता ते काय करतात हे आम्ही उत्सुकतेने पाहत राहिलो. खिडकीची दारे बंद करून घेण्यासाठी जाळीला ठेवलेल्या चौकोनी छिद्रातून तो बांबू आत ढकलून त्या खिडकीशेजारी ठेवलेल्या कपाटाच्या खालच्या भागात आकडा खुपसून त्यांनी थोडा जोर लावून तो बाहेर ओढल्यावर कपाट अगदी हळुवारपणे सरकून खिडकीसमोर आले. बांबू कपाटाखालून सोडवून बाजूला टाकून त्याच भोकातून त्यानी हात आत घातला आणि कपाटाची दारे उघडत " आम्ही त्यादिवशी खोलीचे दार बंद केले पण कपाटाला मात्र कुलूप लावायचे विसरलो" अशी कबुली देत तशीच कपाटातील तिजोरी उघडून त्यातील पर्स काढून त्यानी "त्यादिवशी आमच्या पाक्षिकासाठी कागद घ्यायचा होता म्हणून काढलेले एक लाख रुपये या पर्समध्ये ठेवले होते. चोरांनी अशी पर्स काढून पैसे काढून येथेच ती

टाकून दिली"असे सांगून पर्स जवळ ठेवत पुन्हा परत घरात शिरण्याच्या तयारीने ते वळले. आता इतके प्रात्यक्षिक झाल्यावर चोरी कसी झाली याविषयी आमच्या मनात काही शंका उरली नसली तरीही माझ्या मनात एक किडा वळवळत होताच त्यामुळे "पण इतके सगळे घडत असताना समोर तो तुमचा विश्वासू माणूस पाणी घालत होता त्याचे मुळीच लक्ष गेले नाही? शिवाय हे एकाद्या माहीतगार व्यक्तीचेच काम असणार " मी शंका व्यक्त केली. यावर काय बोलावे याविषयी त्यांच्या मनात असलेला संदेह त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटलेला दिसला. पण थोडा वेळ विचार करून ते म्हणाले, " चला आत जाऊ आणि मग बोलू"

पाणी घालणाऱ्या त्यांच्या विश्वासू सहाय्यकाला पार करून आम्ही घरात शिरलो आणि ते परत बोलू लागले, " अहो प्रत्येक जण मला हाच प्रश्न विचारतोय. इतकेच काय पोलिस कमिशनर माझ्या परिचयाचे आहेत तेही म्हणाले की थोडा वेळ या माणसाला आमच्या ताब्यात द्या बघा त्याला लगेच बोलते करू. तुमचे पैसे परत मिळतील. पण आमची परिस्थिती कशी आहे हे तुम्ही पाहताच. आम्ही दोघांनी आता सत्तरी पार केली आहे. आमच्या ८५ वर्षाच्या वृद्ध मातोश्रीं जवळ जवळ झोपूनच असतात त्यांना हा आणि त्याची पत्नी दोघे व्यवस्थित संभाळतात. त्याच्यावर आम्ही पूर्णपणे विसंबून आहोत. नुसत्या चौकशीसाठी त्याला घेऊन गेले तर लगेच आमचे हातपाय मोडल्यासारखे होईल. इतकी वर्षे त्याने घरच्या आणि

पेपरच्या कामात मला बहुमोल मदत केली आहे. चोरी प्रत्यक्ष त्याने केलेली नाही हे उघडच आहे. एक शक्यता आहे की त्याच्याकडून माहिती फुटली असेल की त्या कपाटात एक लाख रुपये आहेत. शिवाय त्या खोलीला कुलूप लावून कपाटाला मात्र कुलूप न लावण्याचा मूर्खपणा आमच्याच हातून घडला नसता तर ही चोरी झालीच नसती. आता ते पैसे तर गेलेच वर आता ही माणसेही गमावण्याची माझी इच्छा नाही. "

" बरोबर आहे आपण म्हणता ते, या माणसांची किंमत तुमच्या दृष्टीने त्या एक लाखापेक्षा कितीतरी जास्त आहे"

मी मनात म्हणालो.

# ११.यज्ञोपवीतं परमं पवित्रं ।

**(केवळ विनोद म्हणूनच या लेखाकडे पाहावे कोणाच्याही धार्मिक भावना दुखावण्याचा यात हेतू नाही )**

वयाच्या आठव्या वर्षी माझी मुंज करण्यात आली व माझ्या गळयात यज्ञोपवीत म्हणजे जानवे अडकवण्यात आले. त्यावेळीही केवळ मुंज झाल्याचा पुरावा म्हणूनच जानवे घालणे आवश्यक आहे असा माझा समज झाला, गुरुजींनी कदाचित मला समजावून सांगितलेही असेल पण मला आजूबाजूच्या गोंधळात ऐकू आले नसावे किंवा कदाचित ते काम माझ्या वडिलांनी करावे असे त्यांचे मत असण्याचीही शक्यता होती. नंतर वडिलांनाही त्यासाठी वेळ मिळाला नाही. किंवा याला सांगून काय उपयोग असेही त्याना वारले असावे शिवाय ते जाणून घेण्याची उत्सुकता मीही दाखवली नाही त्यामुळे ते राहूनच गेले असावे. माझ्या जानवे धारण करण्याविषयी तेही फारसे दक्ष होते अशातला भाग नाही. मुंजीनंतर काही दिवस गुरुजी संध्येची संथा देण्यास येत होते व तेवढाच काळ काय ती मी संध्या केली व म्हटली असेल. त्यानंतर त्यानी कधी मला संध्या केलीस का असे विचारले नाही किंवा माझ्या शर्टाच्या आत जानवे आहे की नाही याची

खात्रीही करून घेतली नाही. श्रावण महिन्यात मीच जानव्याविषयी दक्ष असे कारण बरेच दिवस आमच्या परिचितांच्या घरी मला शनिवारचा मुंजा म्हणून निमंत्रण असे व त्यावेळी मिळणाऱ्या मिष्टान्न भोजनामध्ये मुख्यत्वे मला रस असल्यामुळे त्यासाठी आपण मुंजा मुलगा असण्याचा पुरावा म्हणून जानवे सुरक्षित ठेवण्याची काळजी मी घेत असे.

बरेच वेळा गावातील तलावात पोहताना जानवे निसटून गेल्याचे समजत नसे. जानवे परत धारण करताना माझी पंचायत होत असे कारण जानवेजोड विकत मिळे व त्यातील एकच जानवे काढून घालण्यासाठी प्रयत्न केल्यावर बऱ्याच वेळा त्याचा गुंता होई व तो सोडवणे हे ब्रह्मगाठ सोडवण्यापेक्षाही मला अवघड वाटे. खरे तर ते जानवे हातात धरून गायत्री मंत्र म्हणून नंतर ते घालणे आवश्यक असे पण इतके विधीपूर्वक घालण्यामध्ये इअतर अनेक महत्त्वाचे उद्योग करण्यात गुंतल्यामुळे मला जमत नसे व त्याकडे कोणाचे लक्षही नसे. त्याच काळात "सुदाम्याचे पोहे"मधील कोल्हटकरांच्या जानवे, कद व श्रावणी या विषयावरील विनोदी लेखात सर्वच प्रकाराची घेतलेली हजेरी वाचून आधीच फार सश्रद्ध नसणाऱ्या माझ्या मनातील जानव्याविषयीची आपुलकी जवळ जवळ नाहीशीच झाली.

मुंज झाल्याचा पुरावा याव्यतिरिक्त जानव्याचा उपयोग म्हणता येईल अशी एक गोष्ट मला आढळली ती म्हणजे पाठीवर जेथपर्यंत हात पोचत नसेल अश्या जागी खाज सुटली तर जानवे योग्य तऱ्हेने पाठीवर फिरवल्यास तो कार्यभाग साधता येतो. पुढे वसतीगृहात स्वतंत्र रहायला लागल्यावर आपल्या खोलीची किल्ली हरवू नये म्हणून जानव्याला व्यवस्थित अडकवणे हा एक चांगला म्हणता येईल असा उपयोग करण्यास शिकलो. याशिवाय जानव्याचा वापर कसा चतुराईने करता येतो याविषयी माझ्या लहानपणी कीर्तनकारांच्या निरूपणात सांगितल्या जाणाऱ्या एका गोष्टीत ऐकल्याचे मला आठवते.

या गोष्टीत एक अतिशय देवभक्त फौजदार असतो. कदाचित प्लॅंचेटप्रमाणे देवपूजा हाही उपाय गुन्हेगार शोधून काढण्यात उपयोगी पडत असेल. तसे प्लॅंचेटच्या वापराविषयी डॉ. विजय भटकर यांनीही अगदी अमेरिकेतही या गोष्टीचा वापर गुन्हेअन्वेषणासाठी करतात असा हवाला दिल्यावर भारतीय पोलिसदलाचे मनोधर्य निश्चितच उंचावले असणार. असो तर या देवभक्त फौजदाराचा असा नियम होता की पूजा करताना बोलायचे नाही. तो पूजा करत असताना एका गुन्हेगाराला घेऊन काही पोलीस त्यांच्याकडे आले व याला काय शिक्षा करायची ते विचारू लागले. खरे तर त्यांनी असे विचारणे हा फौजदाराचा किंवा त्याही पेक्षा त्या गुन्हेगाराचा

गौरव होता. कालाय तस्मै नमः । आता फौजदारसाहेब तर पूजा करत आहेत व त्यांना बोलायचे नाही शिवाय ते अतिशय कर्तव्यतत्पर त्यामुळे आपल्यासमोर आलेल्या बाबीचा निकाल तर ताबडतोब लावायलाच हवा ही वृत्ती अंगी बाणलेली. बऱ्याच खाणाखुणा करूनही पोलिसांच्या डोक्यात प्रकाश पडेना तेव्हां संतापलेल्या फौजदारसाहेबांनी ताम्हणात स्नान घालून शूचिर्भूत झालेल्या लंगड्या बाळकृष्णाची मूर्ती एका हाताने उचलली , दुसऱ्या हाताने गळयातील जानव्याचे वेढे त्या मूर्तीच्या पायाला दिले व एका हातात ते जानवे पकडून दुसऱ्या हाताने आचमनासाठी ठेवलेली पळी उचलून त्या मूर्तीच्या पाठीवर पळीचे फटके दिले तेव्हां कोठे शिपायांच्या लक्षात आले की त्या गुन्हेगाराला उलटा टांगून फटके द्या. असो जानव्याचा हाही एक उपयोग म्हणता येईल. " सुदाम्याचे पोहे " मध्ये कोल्हटकरांनी उल्लेखलेला जानव्याचा उपयोग असाच विनोदी आहे.

सध्या चालू असलेल्या महिन्यात श्रावणी करताना व इतरही धार्मिक समरंभासाठी वापरावयास लागणाऱ्या सोवळे व जानवे या वस्तूंविषयी लिहिताना कोल्हटकरांनी एक विनोदी षटकार मारला आहे.

सुदाम्याला (सुदामा हा या पुस्तकाचा नायक) कद म्हणजे सोवळे हे रेशमी वस्त्र असते व रेशमी धाग्यातून विद्युतप्रवाह वाहतो या वैज्ञानिक सत्याची माहिती झाल्यावर ते वस्त्र धारण करताना बाहेर वीज कडाडली (कारण

श्रावणात पावसाळा असल्याने ही शक्यता असतेच) तर कदाचित आपल्या रेशमी वस्त्रात शिरून आपल्याला भस्मसात करेल अशी भीती वाटते पण उंच इमारतीवर जसे विद्युन्निरोधक बसवून इमारतीच्या तळाशी एक तांब्याची तार जमिनीत पुरतात याच तत्त्वाचा अतिशय चलाख उपयोग करून सुदामा या भीतीतून मुक्त होतो. त्यासाठी आपल्या जानव्यास अडकवलेल्या किल्लीच्या टोकास तांब्याची तार लावून ती जमिनीला टेकेल अशा पद्धतीने पूजेस अगर श्रावणी वगैरे धार्मिक समारंभास बसण्याची दक्षता तो घेतो म्हणजे यदाकदाचित रेशमी वस्त्राच्या आकर्षणाने वीज अंगावर कोसळलीच तर या तांब्याच्या तारेतून ती जमिनीत निघून जाईल.

लघू अथवा दीर्घशंकेस जाताना मात्र जानवे कानावर अडकवण्याचा सल्ला किंवा तसा नियमच मला सांगण्यात आल होता. या पद्धतीचा फायदा या दोन कृती करताना होतो असे कोठेतरी वाचायला मिळाले. आणि भारतीय परंपरेत वैज्ञानिक दृष्टिकोणही कसा अंतर्भूत आहे याचे दर्शन घडले. कदाचित जानव्याची लांबी जास्त असल्यास त्याचा अयोग्य जागी स्पर्श घडून ते अपवित्र होऊ नये अशीही दृष्टी त्यामागे असावी असे मला वाटले.

कॉलेजशिक्षणासाठी घर सोडल्यावर जानवेही कधीतरी निसटून गेल्यावर पुन्हा धारण करण्याच्या भानगडीत मी पडलो नाही. त्यानंतर मग

कारणपरत्वे म्हणजे स्वतःच्या लग्नात व त्यानंतर सत्यनारायणासारख्या धार्मिक प्रसंगात सव्य अपसव्य करता यावे म्हणून मी त्या त्या वेळी जानवे धारण करीत असे.

अलीकडे अश्याच कारणाने म्हणजे नातवांच्या मुंजीत एका नातवास मांडीवर घ्यावे लागल्यामुळे त्याला जानवे घालताना आपल्या गळ्यातही हवे म्हणून जानवे धारण केले व त्यानंतर काही दिवसांनी मला एका छोट्या शस्त्रक्रियेस सामोरे जावे लागले. त्यासाठी छातीचा एक्स रे काढणे आवश्यक होते म्हणून मी नजिकच्या अश्या प्रकारच्या चाचणी केंद्रात गेलो असता तेथील कर्मचाऱ्याने शर्ट काढून उभे राहण्यास सांगितले. क्षकिरण उपकरणापुढे उभा राहिल्यावर एकदम त्याला लक्षात आले की माझ्या गळ्यात जानवे आहे तेही त्याने उतरवावयास सांगितले. खरे तर त्यामुळे काही बिघडले नसते पण कदाचित त्यात किल्ली अडकवण्याचा जानव्याचा उपयोग त्यालाही माहीत असावा म्हणून त्याने ही खबरदारी घेतली असावी त्याचा कशाला हिरमोड करा म्हणून मी ही ते उतरवून ज्या खुंटाळ्यास शर्ट अडकवला होता त्याचशेजारी अडकवले.

क्षकिरण छायाचित्र काढून झाल्यावर नेहमीप्रमाणे शर्ट घातला पण जानवे मात्र तेथेच राहिले. (हेही नेहमीप्रमाणेच). छायाचित्र लगेचच मिळाले व ते घेऊन मी घरी आल्यावर थोड्याच वेळात केंद्रातील स्वागतिकेचा फोन

आला, मी तपासणीकेंद्रात माझी माहिती देताना केवळ औपचारिकता पुरी करणे या हेतूने माझा भ्रमणध्वनी क्रमांक दिला होता त्याचा इतका लगेचच वापर होईल असे वाटले नव्हते. स्वागतिकेने मधुर स्वरात सांगितले, " सर, तुमचे जानवे येथे राहिले आहे " घरी आल्यावर खरे तर लगेचच ही गोष्ट माझ्या लक्षात आली होती आणि आता राहिले तर राहूदे असा विचार मी करत होतो. पण आता फोन आल्यावर मात्र माझी जानव्याविषयीची भूमिका तिला सांगून तिला दुखवणे माझ्या जिवावर आले म्हणून संध्याकाळी येऊन घेऊन जातो असे मी उत्तर दिले. खरे तर संध्याकाळी तेवढ्यासाठी परत जाणे माझ्या जिवावर आले होते तरीही पावित्र्यविडंबनाचा माझ्यावर आरोप होण्याचा धोका टाळण्यासाठी मी परत केंद्रावर गेलो. मी आत शिरताच स्वागतिकेने माझी अतिशय मौल्यवान वस्तू केंद्रात राहिली असावी अश्या पद्धतीने "तुमचे जानवे त्याच खोलीत खुंटाळ्यालाच आहे" असे सांगितले व मी वर जात असताना, "आज पौर्णिमा आहे त्यामुळे आजोबांना जानवे बदलायचे असेल" असे दुसऱ्या स्वागतिकेशी बोलताना ऐकले व तेवढ्यासाठी परत आलो याचे सार्थक झाले असे वाटले.

# १२. जावळ ते टक्कल

माझ्या थोरल्या बहिणीच्या नातवाच्या जावळासाठी अमेरिकेत जाणे शक्य नसले तरी मी अमेरिकेतच असताना जावळ काढायचा तिच्या मुलीने घाट घातला म्हटल्यावर मला जाणे भागच होते. नाही म्हटले तरी माझ्या बारशाच्या घुगऱ्या तिने खाल्ल्या होत्या, त्यामुळे तिला एवढा मान द्यायलाच हवा होता.

नातवाच्या डोक्याला कसलीही इजा न होता जावळ काढणे या विषयावर नेहमीप्रमाणेच चर्चेच्या अनेक फेऱ्या पार पडल्या. मी मात्र मनाने अजून त्या जुनाट काळातच वावरत असल्याने "त्यात काय एवढे माझ्या हातात कात्री द्या मीच काढतो जावळ. "असे म्हटल्यावर ताईने एक असा कटाक्ष माझ्याकडे फेकला की त्या कात्रीने ती माझ्या जिभेचाच शेंडा उडवतेय की काय अशी भीती वाटू लागली. पण त्या चर्चेचा शेवट अनपेक्षितपणे माझ्या भाचीनेच केला.

"हे बघ मामा ही अमेरिका आहे इथ प्रत्येक गोष्ट शिस्तीत करावी लागते. मी मार्शाची अपॉइंट्मेंट एक महिन्यापूर्वीच घेऊन ठेवली आहे"इति माझी भाची

"आता ही मार्शा कोण? ती काय जावळ काढण्यातली तज्ञ आहे की काय? "

" हो तसेच म्हण म्हणजे ती इतक्या हळुवारपणे केस कापते की आमच्या पिट्टूला कळणारही नाही की त्याचे केस कुणी काढतय"

जावळ काढण्यासाठी नाभिकाला घरी बोलावण्यात येईल अशी माझी कल्पनाही खोटी ठरली मार्शाचे मोठे सलून होते त्याला किड्स कट असे नाव होते. वातानुकूलित तर होतेच, शिवाय लहान मुलाना गुंतवून ठेवणारी हरतऱ्हेची खेळणी तिथे होती. आम्ही सगळे पिट्टूला घेऊन तेथे गेलो. माझ्या भाचीने नावाजलेली मार्शा म्हणजे एक गोड दिसणारी आणि बोलणारी तरुणीच होती. आमच्या नातवाला तिने तिच्या खास खुर्चीत बसवले. ती आता आपल्यावर काही शस्त्रप्रयोग करणार आहे अशी कल्पनाही तिने त्याला येऊ दिली नाही, त्याच्यासमोरच्या खुर्चीच्या भागावर बरीच खेळणी ठेवून त्यात तिने त्याला अशा खुबीने गुंतवले की आपल्या केसांवर काही अत्याचार होत आहे याची त्या बिचाऱ्याला कल्पनाही आली नाही. शिवाय सर्व मंडळींचे फोटोसेशन चालूच होते. अगदी शांतपणे तासाभराचा तो कार्यक्रम पिट्टूला मुळीही न दुखवता पार पडला आणि तो न रडल्याबद्दल ताईने त्याचे मनापासून कौतुक केले.

" बघ हा पिट्टू, जराही रडला नाही. नाहीतर तू, तुझ्या जावळाला सगळ घर डोक्यावर घेतल होतस, अगदी बॅंडचा आवाजही तुझ्या आवाजापुढे फिक्का पडला.''

"अग ताई अशी मार्शा माझ्यासाठी आणली असतीस तर मी रडलो तर नसतोच उलट दररोजच जावळ काढायला जाऊया असा आग्रह धरला असता" मी ताईला म्हणालो हे उद्गार माझ्या बायकोच्या कानावर पडणार नाहीत याची काळजी घेण्याचा माझा प्रयत्न यशस्वी ठरला नाही आणि तिने "मग आता तुम्हीही घ्या की करून उरलेल्या केसांचे जावळ मार्शाकडून"अशी माझी संभावना केलीच..

आणि मग माझ्या जावळाची दु:खद आठवण मला झाली. तेव्हांपासूनच तोच आमच्या कुटुंबाचा पिढीजाद प्रसिद्ध बजरंग न्हावी माझ्या डोक्यावर आरूढ झालेला असणार याविषयी मला खात्री आहे. आजकालच्या सुधारित तंत्राने केस कापणाऱ्या दुकानाच्या तुलनेत बजा अर्थात बजरंग न्हाव्याचा सगळाच पुरातन थाट. अगदी त्याच्या दुकानाच्या नावापासून! त्याच्या दुकानाचे नाव सरळ सरळ ‘‘केस कापण्याचे दुकान’’ असे होते अमेरिकन दुकानांच्या नावाच्या सरळसोटपणाच्या या एका बाबतीतच फक्त त्याच्या दुकानाची तुलना होऊ शकत होती.

त्याच पाटीवर खाली प्रो. हे प्रोप्रायटरचे लघुरूप असले तरी बजाला ते प्रोफेसर या शब्दाचे आहे असे वाटे आणि माझी मान आवळून

मग प्रोफेसरचे लेक्चर चालावे तसे त्याच्या मशीनपेक्षाही वेगात त्याचे तोंड चाले. त्याच्या दुकानाइतकीच पुरातन त्याच्या दुकानातली खुर्ची होती आणि त्यात कधी काळी असणारा काथ्या बाहेरील अभ्र्याचा पार निकाल लागला असल्याने बाहेर डोकावून त्यावर बसणाऱ्याच्या पार्श्वभागाचे चिमटे काढत असे. त्याचे मशीन चालण्यापेक्षा खरे तर कुरकुरच जास्त करी आणि त्यात माझ्या केसांचे पुंजके कापले न जाता अधिकतर ओढून तोडलेच जात त्याचाच खरे तर मला त्रास जास्त होई. मशीन नीट चालत नसे म्हणून त्याने कात्रीचा आधार घेतल्यावर मला जरा थोडे बरे वाटते न वाटते तोच त्या कात्रीचीही धार कमीच असल्याने कसेबसे कापले गेलेले केसांचे पुंजके खाली न पडता मानेला गुंडाळलेल्या फाटक्या कापडातून आत शिरून लडिवाळपणे मानेशी खेळ करू लागत आणि अशा प्रकारे केस कापणाऱ्याच्या सर्वांगाशी केसांचा प्रेमळ संवाद घडू लागे आणि त्यामुळे मान, कंबर आणि शरीराचे इतर भागही खाजवण्यासाठी बोटे शिवशिवू लागत मात्र बजाच्या मगरमिठीत सापडल्याने कुठलीही हालचाल शक्य नसे.

अशा संकटास महिन्याकाठी कमीतकमी एकदा तरी मला तोंड द्यावे लागे. तरी त्यातल्या त्यात माझ्या काही इतर मित्रांच्या तुलनेत माझी स्थिती बरी होती. कारण त्याना तळ्याकाठी धोकटी घेऊन बसणाऱ्या गुंडू न्हाव्याच्या वस्तऱ्याला तोंड (नव्हे डोके) द्यावे लागे आणि वस्तऱ्याच्या

कमीतकमी फटकाऱ्यात डोक्याचे मैदान साफ करण्याचा धडा गुंडूने चीपर बाय डझन वाल्या गिलबर्थकडून घेतला असावा. त्यामुळे वस्तऱ्यांच्या मोजून सात फेऱ्यात त्यांचे केस तो होत्याचे नव्हते करून टाकत असे. त्यातला एक फायदा निश्चितच म्हणता येईल तो म्हणजे त्यांची सुटका त्याच्या मगरमिठीतून पटकन होई व त्यासाठी खर्चही बराच कमी येई.

त्यामुळे जनूमामांचा लहानपणी मला मोठा हेवा वाटायचा आणि त्याचे कारण अगदीच विचित्र होते ते म्हणजे मामाना अगदी साफ गुळगुळीत टक्कल होते त्यांच्या डोक्यावर अगदी औषधालाही केस नव्हता. मला वाटायचे किती मज्जा आहे त्यांची, कारण त्यामुळे आमच्यासारखे दर महिन्याला बजा (बजरंग ) न्हाव्याच्या तावडीत मान द्यायची पाळी त्यांच्यावर येत नाही. त्यावेळी बाकी इतर अनेक गोष्टींची वाढ व्हावी अशी इच्छा खूप असे. उंची वाढावी म्हणून दिसेल त्या आडव्या दांड्याला मी लोंबकळत असे व आपली उंची किती वाढली याचा दररोज शोध घेत असे बुद्धीची वाढ व्हावी अशी केवळ माझीच नाही तर घरातल्या सगळयांचीच इच्छा असे पण तिच्यात काही वृद्धी होण्याचे लक्षण नव्हते मात्र ती सगळी कसर केसांनी भरून काढलेली आणि बजाच्या तावडीतून सुटून पंधराही दिवस होतात न होतात तोच केसांची झुलपे कानावर डोकावू लागायची आणि आमच्या वडिलांची तीक्ष्ण नजर त्यांच्याकडे जायचीच की लगेच आमची रवानगी बजाकडे व्हायची.

पण तेच केस लहानपणी मी त्यांचा इतका तिटकारा केला म्हणून सूड उगवल्यासारखे अकालीच मला सोडून जायला लागले आणि मग मात्र मी हादरलो. कारण त्यावेळी मात्र शहरातील अद्यावत मेन्स पार्लर किंवा न्यू औटलुक अशा ज्या नावातून ते केस कापण्याचे दुकान असावे असा संशयही येणार नाही आणि आत शिरल्यावरही तेथील वातानुकूलित हवेत गुबगुबीत खुर्चीत स्थानापन्न होताच झोपीच जावे असे वाटावे अशा प्रकारच्या दुकानात मी केस कापू लागलो होतो आणि तेथील कारागीर (आता न्हावी हा शब्द बाद)किती कमीतकमी केस कापून कटिंग झाली असे जाहीर करायचे याबाबतीत एकमेकाशी स्पर्धा करू लागल्यामुळे केस कापण्याच्या क्रियेचा त्रास न होता ते इतके कमी केस का कापतात या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचाच त्रास अधिक होऊ लागला.

अशा काळात केस कमीतकमी कापायचे असल्यामुळे केसांवर बारीक लक्ष ठेवणाऱ्या तेथल्याच एका कारागिराने त्याची कातरी लागण्याची वाट न पहाताच माझे केस मला सोडून जात आहेत हा शोध लावून "साहेब टक्कल पडायला लागलेले दिसते" असा त्याचा पंचनामा केल्यावर मात्र असे आपले लाडके केस आपल्याला सोडून चालले या कल्पनेने त्रस्त होऊन आता त्याना कसे वाचवावे या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी डोके खाजवल्यामुळे काही कल्पना तर सुचण्याचे दूरच उलट आणखी काही केस मात्र माझा निरोप घेऊ लागले. अगदी मुंजीतसुद्धा फक्त

घेरा राखून बाकीचे केस कमी करण्याचे माझ्या जिवावर आले होते. पण लोकाग्रहास्तव त्यावेळी आयुष्यात फक्त एकदाच पुन्हा नाही अशा कबुलीवर वडीलधाऱ्यांचा तो आग्रह मी मान्य केला होता पण आता ती गोष्ट आपल्या हातातही राहिली नाही हे समजून मी अगदी बेचैन झालो.

जनूमामांनीच मला "अरे त्यात वाईट काय वाटून काय घेतोस लक्षात ठेव "खल्वाटो निर्धनः क्वचित ।"असे सांगून माझ्या धनप्राप्तीतील उज्वल भवितव्याकडे माझे लक्ष वेधून मला धीर देण्याचा प्रयत्न केला पण माझ्या मित्र मैत्रिणीना अजून त्या विषयाचे महत्व वाटत नसल्यामुळे त्यांच्याकडून माझी नाचक्की होण्याविषयी मला खात्री होती. शिवाय माझ्या मैत्रिणीबरोबर चाललो असता तिचा मित्र म्हणून मला न ओळखता तिचा बाप म्हणून मला ओळखतील की काय अशीही भीती मला वाटू लागली.

माझ्या एका मित्राची मनोहरची त्यावेळी मला तीव्रतेने आठवण झाली. त्यालाही अगदी छान, दाट कुरळे केस होते आणि तो त्यांची निगाही फारच काळजीपूर्वक राखत असे. मध्यंतरी बरेच दिवस आम्ही भेटलो नव्हतो आणि एक दिवस घराची घंटी वाजल्यावर दार उघडायला गेलो आणि आणि एक अगदी अपरिचित चेहऱ्याचा एक माणूस दारात उभा होता, मी त्याच्याकडे पहाताच पहिल्यांदा त्याने, "तू मला ओळखणार नाहीस " अशीच सुरवात केली आणि त्याचा आवाज ऐकल्यावर मात्र मी

त्याला ओळखले आणि "अरे मन्या तू? " असे उद्गार माझ्या तोंडून बाहेर पडले. अशीच परिस्थिती काही दिवसांनी आपली होणार आणि आपल्यालाही ज्याला त्याला नव्याने ओळख करून द्यावी लागणार असे वाटून मी अगदी हताश झालो.

त्यामुळे टक्कल पडू लागताच केस पुन्हा उगवावे म्हणून जेवढे म्हणून उपाय करणे शक्य होते तेवढे मी करून पाहिले. निरनिराळ्या जाहिरातींतील वेगवेगळ्या औषधींचा वापर मोठ्या प्रमाणात करून होणाऱ्या खर्चामुळे जनूमामांनी मला दिलेल्या दिलासायुक्त भवितव्याला अपवाद ठरून मी आताच निर्धन होणार असे वाटू लागले. जाहिरातीतील औषध वापरण्यापूर्वीचे टक्कलयुक्त व नंतरचे दाट केस असणारे दोन्ही चेहरे माझ्याकडे बघून कुत्सित हास्य करून मला"क्या फसाया" म्हणत असल्याचा भास मला होऊ लागला.

सुदैवाने माझ्या उत्तमांगाने मला धीर देऊन भानावर आणले. "अहो इतके हताश का होता, किती तरी थोर लोकांना टक्कल आहे म्हणून त्यांचे काय अडले आहे? " यात बराच तथ्यांश होता. त्यामुळे आता टक्कल पडल्यामुळे का होईना थोर होण्याची मी वाट पहात आहे

# १३.आम्हा सोयरी

तुकारामांनी जरी "वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे " असा प्रेमळ संदेश देऊन ठेवला असला तरी रामदासांसारख्या रोखठोक माणसाला असला काही संदेश देणे मानवले नाही उलट त्यातील काही सोयरे आपल्याला नकोसा जीव करून टाकतात आणि त्याचाच इशारा रामदासांनी त्यांच्या दासबोधाच्या पहिल्याच समासात देऊन ठेवला आहे. ते म्हणतात,

"मृत्तिका खणोनि घर केले । ते माझे ऐसे दृढ कल्पिले ।

परि तें बहुतांचे हें कळलें। नाहीच तयासी ॥१. १०. ३४॥

अगदी हौसेने माणसाने घर बांधले व ते माझे घर असे तो समजू लागला पण ते त्याचे नाहीच हे त्याला कळलेच नाही कारण समर्थ सांगतात "अरे मूर्खा तुझे घर कसले समजतो आहेस?, त्या घरात तू किती वेळ असतोस त्यापेक्षा जास्त वेळ त्या घरात राहणारे तुझे सोयरे काय म्हणतात पहा, "मूषक म्हणती घर आमुचे।पाली म्हणती घर आमुचे।मक्षिका म्हणती घर आमुचे।निश्चयेसी।३५॥

एवढ्यानेच भागले नाही

विंचू म्हणती अमुचे घर । सर्प म्हणती आमुचे घर ।
झुरळें म्हणती आमुचे घर ।निश्चयेसी ॥३७॥

आम्हाला तुकारामांच्या वचनापेक्षा या समर्थ उक्तीचाच अनुभव अधिक येतो.

अगदी नुकताच अमेरिकेत गेलो तेव्हा फिनिक्समधील भाच्याचे घर खूप मोठे अगदी प्रत्येकाच्या वाटणीस दोन शयनकक्ष पण त्यातही एक दिवस अगदी चक्क स्वयंपाकघरात भला मोठा विंचू निघाला व प्रत्येकजण "तू जपुन टाक पाऊल जरा" या उक्तीप्रमाणे वागू लागले.

मला लहानपणी विंचू फक्त दिसलाच नाही तर त्याने प्रत्यक्ष माझ्यावर हल्लाच केला होता, हे आमचे खेड्यातले घर असले तरी बऱ्यापैकी बांधलेले होते. तरी शेवटी ते मातीचेच घर. या घराला माडी पण होती व सोप्यातून माडीवर जायला लाकडी जिना होता. त्यावेळी मी असेन दहा बारा वर्षाचा! संध्याकाळच्या अर्धवट प्रकाशात काहीतरी गुणगुणत जिना उतरत होतो आणि शेवटच्या पायरीवर पाऊल ठेवल्यावर उजव्या पायाच्या अंगठ्याला एकदम सपकन जबरदस्त फटका बसला आणि माझ्या गाण्याचे एकदम रूपांतर झाले ते कर्णभेदक किंकाळीतच.

माझ्या किंकाळीने आई व घरातील समस्त बंधु भगिनी वर्ग गोळा झाला. आईने बरोबर कंदील आणला होता तो वर पकडून थोरल्या बहिणीने सर्वांना बाजूस सारीत " काय झाले म्हणून विचारणा केली. माझा अंगठा

इतका फुणफुणत होता की माझ्या रडण्यातून उसंत काढून काय झाले हे सांगायलाही मला जमत नव्हते शिवाय काय झाले हे मला तरी कुठे काय कळले होते. तेवढ्यात विजेचा दिवा आता लावता येईल हे कोणाला तरी सुचले. संध्याकाळी सात वाजता आमच्या गावातील पॉवरहाउस सुरू होई व मग घरातील विजेचे दिवे लागत. कोणीतरी बटण दाबले आणि त्या प्रकाशात एकदम जिन्याच्या भिंतीवरून एक मोठा विंचू तरा तरा जाताना सर्वांना दिसला व माझ्या गगनभेदी आरोळीचे रहस्य सर्वांच्या लक्षात आले. बहिणीने अगोदर कोपऱ्यातील वहाणेचा फटका मारून त्या विंचवाला गारद केले आणि मग माझ्याकडे सगळ्यांनी लक्ष द्यायला सुरवात केली.

तोपर्यंत माझ्या आरोळीचा नाद आसमंतात इतका घुमला होता की शेजारपाजारच्या तीन चार कुटुंबांना यांच्या घरी कोणी अचानक निजधामाला गेले की काय अशी शंका येऊन बराच मोठा जमाव आमच्या घरासमोर जमला व मला विंचू चावला हे जगजाहीर झाले. लगेच विष चढू नये म्हणून माझ्या त्या पायाच्या पोटरीवर एक फडके घट्ट पिरगाळण्यात आले ते पिरगाळणाऱ्याचा उत्साह एवढा दांडगा की विंचू चावल्याच्या वेदनेपेक्षा त्याचीच कळ माझ्या मस्तकात त्याहूनही अधिक जोरात शिरली. बहुधा एक दु:ख विसरण्यासाठी त्याहून दुसरे मोठे दु:ख कोसळावे लागते या मानसशास्त्रीय बाबीचा त्याने अभ्यास केला असावा.

विंचूदंशाच्या जागी चिंचोका किंवा आणखी काही पदार्थ उगाळून लावावे असे निरनिराळया लोकांनी सुचवलेले पदार्थ उगाळण्याची व त्यांचा लेप माझ्या पायावर चढवण्याची एकच स्पर्धा तेथे सुरू झाली तेवढ्यात आमच्या घराच्या मालकीणबाई आज्जी तेथे आल्या व त्यांनी आपणास मंत्र येतो असे सांगितल्यावर बाकी सर्वांनी आपले उपाय थांबवून त्यांच्या ताब्यात मला दिले. त्यांचा मंत्र मला माझ्या रौद्र रुदनात ऐकू येणे शक्य नव्हतेच. शिवाय तो विंचूही मारण्यात आल्यामुळे त्यालाही ऐकू येणे शक्य नव्हते. पण त्या विंचवाच्या मृत देहाला साक्षी ठेवूनच आजींनी मंत्रोच्चारण सुरू केले. त्यानंतर कशाचा परिणाम झाला कोणास माहीत कारण मला ग्लानी येत असल्याने माझे रौद्र रुदन मंदावले व विंचवापेक्षा माझ्या रडण्यानेच अधिक त्रस्त झालेले शेजारी ही शांत होऊन आपआपल्या घरी परतले व मला झोप लागली एवढे आठवते.

हा विंचवाचा माझा प्रथम परिचय. त्यानंतर मी थोडा मोठा झालो होतो. एस. एस. सी. ला असेन. रात्री अंथरुणावर बसून पुस्तक हातात घेऊ अभ्यास करत होतो. तेवढ्यात पाठीवर काहीतरी सरकले व एकदम सुई टोचल्यासारखे वाटले. पाठीवर जसा पुरेल तसा हात नेऊन मी पाठ खाजवण्याचा प्रयत्न केला पण त्यामुळे आणखीनच जोरात सुई टोचल्यासारखे वाटले शेवटी अंगातला शर्ट काढून उलटा केला तो काय एक छोटे विंचवाचे पिल्लू त्यातून बाहेर पडले बहुधा ते माझ्यावर पहिला

हल्ला करणाऱ्या व त्यावेळी धारातीर्थी पतन पावलेल्या त्या विंचवाचे हे वंशज असावे व माझ्यावर आपल्या पूर्वजाच्या रक्ताचा बदला घेण्याचा प्रयत्न त्याने केला असावा. यावेळी विंचू छोटा असल्यामुळे की विंचवाच्या विषाची माझ्या शरीरास सवय झाल्यामुळे कशामुळे कोण जाणे पण मला फारसा त्रास झाला नाही. त्या पिल्लाला त्याच्या पूर्वजाच्या भेटीस पाठवून पुन्हा मी शांतपणे अभ्यासाला लागलो.

पूर्वीच्या मोठ्या घरात भुजंग किंवा नाग हे घराचे व घरातील संपत्तीचे रक्षण करणारे अशी समजूत होती, ती कदाचित त्यांचेच संरक्षण व्हावे म्हणून करून देण्यात आली असावी पण तरीही "साप म्हणू नये धाकला ’या म्हणीतून साप दिसला की मारावा असाच संदेश जातो. माझ्या लहानपणी एकदा आमच्या घरातही साप निघाला होता व त्यावेळी सापाला मारू नये असा संदेश इतरांना देण्या इतका किंवा मी सांगितले तरी माझे ऐकले जाण्याइतका मोठा झालो नव्हतो. त्यामुळे तो बिचारा साप मारला गेला. त्यानंतर सोलापूरला वसतिगृहप्रमुख होतो त्यावेळी ते वसतिगृह अगदी रानातच असल्यासारखे होते व तेथे अनेक साप निघत पण माझे व प्राचार्यांचे निवासस्थान मंतरून टाकले असल्यामुळे घरात कधी साप निघाला नाही असे तेथील कर्मचारी सांगत. अं. नि. स. चे कार्य त्यावेळी फारसे अस्तित्वात नव्हते त्यामुळे मांत्रिकांची चलती असावी. पण आवारात बरेच साप निघत. आमच्या वास्तव्याच्या काळात ठराविक

दिवशी एक विशिष्ट मुळी घेऊन येऊन काही सर्पमित्र आवारातील साप पकडून घेऊन जात. तरीही आवारात साप निघतच. एकदा मी व माझा मोठा मुलगा तो त्यावेळी नऊ दहा वर्षाचा असेल आम्ही आवारातून बाहेर पडताना एक भला मोठा साप आमच्या दोघांच्या अगदी पायामधून गेला.

अमेरिकेतही सापाचा अनुभव आम्हाला आलाच. एडिसनला माझे दोन्ही मुलगे व आम्ही हिडन व्हॅली भागातील सदनिकेच्या तळमजल्यावर राहत होतो. एक दिवशी सकाळी सकाळी आमच्यापैकी कोणीतरी सहज दार उघडले तर दारासमोरच एक साप वेटोळे घालून बसलेला. ताबडतोब ज्याने दार उघडले होते त्याने ते बंद केले. पण आमची अवस्था चिमणरावांच्या पाहुण्यांना येऊ न देण्यासाठी पाळलेल्या कुत्र्याने घरातील लोकांनाही बाहेर येऊ देऊ नये तशी झाली, सुदैवाने या सदनिकेला मागील बाजूने एक प्रवेशद्वार होते त्यामुळे आमची रहदारी मागून सुरू झाली. ९११ ला फोन लावल्यावर त्यांनी कालियामर्दन करण्याऐवजी आम्हाला उलट माहिती दिली की एडिसनमधील साप विषारी नसतात. त्याचा गर्भित तो तुम्हाला काही इजा करणार नाही व त्यामुळे आम्हीही काही करणार नाही. तरी बरे मूक प्राणी अधिकार समितीने त्या सापाला घरात घेऊन त्याला खायला प्यायला घाला नाहीतर त्या प्राण्यांचे हक्करक्षण न केल्याबद्दल तुमच्यावर खटला भरण्यात येईल असे बजावले नाही हे आमचे भाग्य त्यावेळी जगातील मानवाधिकार संरक्षणाची जबाबदारी

आजच्याइतकी अमेरिकेने घेतली नव्हती असे दिसते.त्यामुळे त्या सापानेच त्याच्या सोयीनुसार मुक्काम हलवल्यावर आम्ही मुख्य प्रवेशद्वार वापरू लागलो.

याच सदनिकेत असताना नवरात्रीच्या काळात घटस्थापनेनंतर उगवलेले धान्य दसऱ्यानंतर माझ्या पत्नीने बाल्कनीत ठेवले होते ते खारीने ते रात्री पळवून नेले व त्यानंतर त्या बाल्कनीत कोणताही खाद्यपदार्थ टिकू शकला नाही. मुलाने स्वतंत्र घर घेतल्यावर मागील बाजूस खूप मोठी जागा असल्यामुळे माझ्या बायकोला आपली बागेची हौस पुरी करण्याची इच्छा झाली व तिने मोठ्या हौसेने कुंड्या आणून डॅकवर त्यांची प्रतिष्ठापना केली व त्यात वेगवेगळ्या बिया पेरल्या. पण दुसऱ्याच दिवशी कुंडीतील माती उकरली जाऊन त्या बिया गायब झालेल्या दिसल्या, मुलाने अगोदरच आईला बजावले होते की इथे बागकाम करण्याच्या फंदात पडू नको कारण खारी व ससे तुला ते करू देणार नाहीत व तोच अनुभव तिला आला. पण तीही इतकी चिकाटीची की तिने बारीक जाळी आणून त्या कुंड्या आच्छादून बियांचे पुन्हा रोपण केले व काही वांगी, काही काकड्या असे उत्पन्न मिळवण्याची जिद्द दाखवली.

औरंगाबादला स्वत:चे घर बांधल्यावर एका घुशीने आम्हाला असेच त्रस्त केले होते. आमची वसाहत अगदी नवीच असल्याने खरेतर त्यांच्या निवासस्थानावर आम्हीच आक्रमण केले होते. शिवाय आमच्या

घरांच्याच रांगेतील एक प्लॉट रिकामा होता. त्या प्लॉटमधील घुशीने अगदी ओळीने सर्व घरांच्या जमिनीखालून मार्ग काढत रांगेतील पहिल्या क्रमांकावर असणाऱ्या माझ्या घराच्या मोरी व संडासासाठी केलेल्या सेप्टिक टँकला आपले लक्ष केले होते. तेथील जमीन ती रात्री पूर्णपणे उकरून ठेवत असे. सकाळी उठल्यावर मग माझे काम त्या उकरलेल्या भागात काचेचे तुकडे वगैरे घालून पुन्हा जमिनीचा तो भाग पूर्ववत करणे हेच असे. तरी ती घूस आमच्या या संरक्षक फळीला दाद न देता आपला उपक्रम पुन्हा चालू ठेवी. त्यानंतर आम्ही गावाला गेल्यावर तर तिला मोकळे रानच सापडले त्यामुळे आम्ही घरी परत आल्यावर पाहतो तो काय ती घूस चक्क संडासामध्ये आमचा समाचार घेण्यास येऊ लागली. त्यामुळे संडासामध्ये जाण्यापूर्वी घूस तेथे आहे की नाही याची दखल घेऊन मगच आत प्रवेश करावा लागे. कधी आम्ही आत असताना तिला आमची भेट घेण्याची इच्छा झाली तर मग आमची तारांबळ काही विचारता सोय नाही. शेवटी तिच्या मूळ वसतिस्थान असलेल्या प्लॉटधारकासच तिचा बंदोबस्त न केल्यास त्याचा प्लॉट सोसायटी जप्त करेल असा दम दिल्यावर त्याने त्या घुशीला पळविल्यावर आमचा त्रास दूर झाला.

आम्ही पुण्यातील सदनिकेत राहत असताना आमच्या अमेरिकेतील वास्तव्याचा लाभ घेऊन उंदरांनी आमच्या सगळ्या

सदनिकेचाच ताबा घेऊन आपला संसार प्रचंड बहरास आणला होता याचे वर्णन मी वारीच्या एका भागात केले आहे.

या सोयऱ्यांना दोष देण्यापूर्वी खरे तर आपणच त्यांच्या वसतिस्थानावर आक्रमण केले आहे ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. प्रत्येक प्राणी आपल्या कक्षा ठरवून घेतो हे मारुती चित्तमपल्लीं किंवा व्यंकटेश माडगूळकर यांच्यासारख्या लेखकांचे साहित्य वाचल्यावर समजते. त्यांच्या जागेवर आपण आक्रमण केल्यामुळे उंदीर, साप, घुशी इतकेच काय पण आता लांडगे, बिबळे हे प्राणीही घरात दिसू लागणार किंवा दिसेनासेच होणार ह्या दोन शक्यता दिसत आहेत.

# १४. सख्खे शेजारी!

त्या दिवशी एक तास संपवून मी माझ्या केबिनमध्ये शिरलो आणि खडूचे हात साफ करून टेबलकडे वळलो, श्रमपरिहारासाठी चहा प्यायला जावे की काय अशा विचारात असतानाच माझ्या खोलीत अचानक एका व्यक्तीने प्रवेश केला. एकदम त्या व्यक्तीला मी ओळखलेच नाही. असेल कोणातरी विद्यार्थ्याचा पालक असा मी विचार करत असतानाच त्याने नमस्कार करत "नमस्कार काय ओळखल का? " असा प्रश्न विचारला आणि मग ही कोणीतरी परिचित व्यक्ती असावी असा अंदाज केला. मध्यंतरी माझी सोलापुरास बदली झाल्यामुळे त्यापूर्वीच्या ओळखीपैकीच कोणीतरी असणार असा विचार करून जरा स्मृतीला ताण दिला आणि एकदम डोक्यात प्रकाश पडला"अरे हे तर लोटांगणे" मी सोलापूरला जाण्यापूर्वी मी राहत असलेल्या शासकीय निवासस्थानातील माझे शेजारी. शिवाय ते सार्वजनिक बांधकामखात्यातच लिपिक होते.

"ओळखले तर लोटांगणेच ना? " त्याना नमस्कार करत मी म्हणालो.

"अरे वा! इतक्या वर्षात विसरला नाही "असे म्हणत त्यानी माझ्या नमस्काराचा स्वीकार केला.

खरतर त्यांची नि माझी भेट जवळ जवळ दहा वर्षानंतर पडत होती. जरी शासकीय निवासस्थानात ते माझे शेजारी असले तरी आमचा अगदी जुजबीच परिचय होता. शिवाय मी जरी त्या निवासस्थानात बारा वर्षे काढली तरी ते मात्र चारपाच वर्षातच स्वत:चे घर बांधून तिथे राहवयास गेले त्यामुळे परत त्यांची क्वचितच गाठ पडे त्यामुळे अचानक त्याना माझी गाठ घ्यायची उबळ का आली असावी मला समजेना. पण त्यानी फार वेळ मला आचंबित न ठेवता एकदम मुद्द्यालाच हात घातला आणि त्या संशयातून माझी सुटका केली,

"अहो हे सोलारकर तुमच्या परिचयाचे आहेत का? "असा प्रश्न त्यानी मला विचारला. आणि त्यामुळे मी आणखीनच बुचकळयात पडलो. कारण ते सोलारकर खरोखरच माझ्या परिचयाचेच होते. आणि त्या व्यक्तिमत्वाशी एकदा परिचय झालेली व्यक्ती त्याना विसरू म्हटले तरी विसरणे अशक्य होते. मग माझे तर काही दिवसापूर्वीच ते अगदी सख्खे शेजारी होते.

सोलारकर सोलापूरलाही होते पण मी ज्या काळात होतो तेव्हां ते नुकतेच बदली होऊन तेथून गेले होते पण तरी त्यांच्या बऱ्याच आख्यायिका संस्थेत ठेवून गेले होते. पण त्या व्यक्तीला प्रत्यक्ष पाहिले नसल्याने मला त्यामध्ये फारसा रस नव्हता आणि आता औरंगाबादला त्यानी माझ्या पाठोपाठ प्रवेश केल्यावरही त्यांची दखल घेणे मला आवश्यक होते

अशातला भाग नव्हता, कारण त्यांच्या आख्यायिका सोलापुरात ऐकल्यामुळे शिवाय त्यांचा विभाग माझ्या अभियांत्रिकीशाखेशी संबधित नसल्यामुळे त्यांच्या जवळ जाण्याचे मला काही कारण नव्हते..

सोलारकरांनी आल्या आल्या वसतीगृहात ठाण मांडले होते अशी बातमी वसतीगृह प्रमुख पाटील माझ्या चांगल्याच परिचयाचे असल्याने माझ्या कानावर आली होती. बदली होऊन येणाऱ्या प्राध्यापकास काही दिवस राहण्यापुरता वसतीगृहातील गेस्टरूमचा वापर करता येत असे. पण या सवलतीचा गैरफायदा बहुतेक कोणीच प्राध्यापक घेत नसत पण सोलारकरांनी मात्र आता आपण वसतीगृहातच राहू असा विचार केल्यासारखी त्यांची वागणूक होती कदाचित एकादा वॉर्डन म्हणून आपल्याला राहता येईल अशी त्यांची अपेक्षा असावी. खर तर वॉर्डन म्हणून रहायला ती एकप्रकारची डोकेदुखीच असल्याने सहसा कोणी तयार होत नसे त्यामुळे असा तयार बकरा मिळाला तर पाटलाला हवाच होता. एवढेच काय पण माझी जागेची अडचण पाहून त्याने मला तसा आग्रहही करून पाहिले होते. मात्र सोलारकरला त्याने दोनच दिवसात चांगलेच पारखले आणि याला वॉर्डन म्हणून घेतल्यास मुलांच्या ऐवजी यालाच कसे गप्प करायचे असा आपल्याला प्रश्न पडेल हे त्याने ओळखले आणि ही ब्याद लवकरात लवकर तेथून कशी बाहेर काढायची हाच विचार तो करत होता अशातच कधीतरी माझ्या तोंडून मी राहत असलेल्या बंगल्यात एक

जागा रिकामी आहे हे त्यांच्या कानावर घालण्याचा मूर्खपणा माझ्याकडून झाला होता.

मी ज्या बंगल्यात भाडेकरू म्हणून राहत होतो ती जागा मलाच माझ्या सहकारी प्राध्यापकाच्या ओळखीतून मिळाली होती. मालकांनी ती केवळ आपल्या जावयाचा मित्र म्हणून मुद्दाम मोकळी करून दिली होती. पुढे त्यानी सेवानिवृत्त झाल्यावर त्यात थोडी वाढ करून त्याच बंगल्यात आणखी दोन खोल्या भाड्याने देता येतील अशी व्यवस्था त्यांनी नुकतीच केली होती आणि ही गोष्ट मी व देशपांडे यांच्या दुर्दैवाने आणि सोलारकरांच्या सुदैवाने नेमकी त्यांची औरंगाबादला बदलून येण्याच्या सुमारासच घडली होती.

एक दिवस मी व माझी बायको काहीतरी खरेदीसाठी बाहेर पडलो आणि माझ्या मनात नसले तरी कधी नव्हे ते दोन तीन तास खरेदीत घालवून आम्ही घरात प्रवेश करताच मालकांनी विजयी मुद्रेने आमचे स्वागत करत आम्हाला बातमी दिली,

"तुमच्या मित्राला शेजारची जागा दिली बरका. " माझ्या मुळीच लक्षात येईना ते काय म्हणत आहेत ते. पण त्यांनी मित्राचे नाव काय हे विचारल्यावर जे उत्तर दिले ते ऐकून पाटलाने मी घरात नाही याचा फायदा घेऊन दावा साधल्याचे ध्यानात आले कारण त्यानी सांगितलेले नाव होते सोलारकर. त्यावेळी इतरांशी विशेषत: अगदी कमी ओळख असताना

समोरच्च्या व्यक्तीशी मोकळेपणाने बोलण्याच्या धुंडिराजी (पाहा भावबंधन) वृत्तीमुळे आणखी एक मूर्खपणा माझ्याकडून झाला होता तो म्हणजे सोलारकरांची गाठ पडली असताना त्यांच्या तोंडून ते यवतमाळला होते असा उल्लेख आल्यावर आपल्या सौ. च्या मातोश्रीही यवतमाळच्या बी. एड. महाविद्यालयात प्राध्यापक होत्या असे मी बोलता बोलता सांगून टाकले होते, माझ्या इतक्या क्षुल्लक चुकीचा पुढे होणारा घोर परिणाम इतका जालीम होईल याची कल्पनाही मी केली नव्हती, पण आमच्या मालकांशी बोलताना लगेच सोलारकरांनी आपली बायको आमच्या सौ. च्या आईची विद्यार्थिनी होती आणि त्या तिच्या आवडत्या प्राध्यापिका होत्या असे तिखटमीठ लावल्यावर त्याना जागा दिल्याचा आम्हाला आनंदच होणार असा मालकांचा हिशोब.!

मालक आपण आपल्या जावयाच्या आणखी एका मित्राला जागा दिली या आनंदात होते. कारण मी त्याच नात्याने त्यांच्या घरात राहत होतो. "अहो त्या तुमच्या मित्राच्या सौभाग्यवती तुमच्या सासूबाईंच्या विद्यार्थिनी होत्या खूपच तारीफ करत होत्या त्या किती छान शिकवतात याची. "सोलारकर आणि त्यांच्या सौ. नी मालकांच्यावर चांगलीच मोहिनी टाकलेली दिसली. पाटलाने वसतीगृहातली ब्याद अशा प्रकारे माझ्या शेजारी आणून टाकण्याचा डाव तर अगदी सफाईने पार पाडला. मी मात्र आपल्याला अगदी बरोबर त्याच वेळी बाहेर जावे लागल्याबददल

नशीबाला बोल लावत बसलो. खर तर मी सोलापूरकरांकडून सोलारकरांविषयी थोडेफार ऐकले होते तो तर केवळ ट्रेलरच होता हे ते प्रत्यक्ष शेजारी रहायला आल्यावर समजू लागले.

तसे सोलारकर बोलायला फार वाईट होते अशातला भाग नव्हता कधीतर ते फारच गोड बोलत. पण त्या गोड बोलण्यातून एक वेगळीच छटा डोकावे. घरात त्यांच वागण अगदी विक्षिप्त असे. त्यांच्या सौ. वती आणि त्याचे साधे बोलणेही भांडणासारखेच वाटे. तशी त्यांची पत्नी त्याना तोडीस तोड होती, तरीही त्यांच्या विचित्र अवतारापुढे तिला माघार घ्यावी लागायचीच. कारण हा गृहस्थ तिच्या अंगावर हात उचलायलाही कमी करणार नाही असे वाटे पण मग ते बाहेर गेले की ती अगदी सूड घेतल्यासारखे वागत असे. त्याकाळात येणाऱ्या बोहारणींना ती नवऱ्याचे अगदी नवे कोरे कपडेही आरामात देऊन टाकायची आणि ते जेव्हां त्याविषयी विचारत तेव्हां अगदी सहजपणे आपली कृती वर्णन करून त्याना सांगे, त्यावर सोलारकरांचा पारा चढून ते अद्वातद्वा बोलू लागत ते इतक्या जोरात की आमच्या घरात तर ऐकू येतच असे पण आजूबाजूच्या घरातही त्याचे प्रतिसाद उमटायचे. पुढे पुढे शेजाऱ्यांना ही अगदी करावाचून करमणूकच झाली.

सोलारकरांना आपली बायको सुंदर आहे असे वाटे आणि त्यामुळे तिच्याविषयी सदैव त्यांच्या मनात संशयाचे भूत उभे असे पण त्याचबरोबर

तिने नोकरी करावी अशीही त्यांची इच्छा असे. ती बाई हुशार होती आणि तिने चांगले प्रथम श्रेणीत एम. एस. सी केले होते शिवाय आमच्या सासूबाईंच्या हाताखाली त्यानी बी एड पण केले होते त्यामुळे त्याना कोणत्याही महाविद्यालयात सहज प्राध्यापक म्हणून नोकरी मिळण्यासारखी होती. लगेच सोलारकरांनी मोर्चे बांधायला सुरवात केली आणि एका महाविद्यालयाच्या प्राचार्यावर सपत्निक धाड घातली आणि त्यांच्या पत्नीला प्राध्यापक म्हणून नियुक्ती पण करून घेतली पण त्यामुळे तिला घर सोडणे भाग होते अर्थातच सोलारकर महाशयांना घराकडे लक्ष देणे भाग पडले. अगोदरच पत्नीचेही घराकडे लक्ष यथातथाच असलेले त्यात परत तिच्या नोकरीची भर पडलेली. त्यामुळे घर म्हणजे उकिरडा बरा म्हणण्याची पाळी आली. एकदा ती महाविद्यालयात गेल्यावर चहा करण्यासाठी पेटवलेला वातीचा स्टोव्ह हे महाशय तसाच चालू ठेवून कॉलेजात गेले. सुदैव एवढेच की त्यात तेलच कमी असल्याने तो फार काळ जळत राहिला नाही. आणि ही गोष्ट हे गृहस्थच अभिमानाने सांगू लागले.

या दांपत्यास एक मुलगीही होती ती होती हुशार पण त्यानाच शोभेल अशी गुणी पण होती त्यामुळे ती बाबांविषयी ते नसताना आईला आणि आई नसताना तिच्याविषयी बाबांना काहीबाही सांगून अगोदरच जळत असलेल्या आगीत तेल ओतण्याचे काम करत असे. एकदा संशयाच्या पिशाच्चाने झपाटलेल्या सोलारकरने बायकोला रात्रभर

घराबाहेर ठेवले आणि तीही तशीच दारात बसून राहिली. दारात पेपर पडला तरी तो आणायचा कोणी याविषयी दोघात भांडणे होत.

आमचे मालक म्हणजे अगदी भोळे सांब. घरात बदल करताना नळाची जोडणी मात्र त्यानी पूर्वीसारखीच ठेवली होती. पूर्वी त्यांच्याकडे असलेल्या स्वयंपाकघरातून नळाची जोडणी सुरू होऊन माझ्या घरातील खोल्यात व त्यांच्या नवीन बांधलेल्या भागात या पद्धतीने नळ नेलेला होता. आता मालकांचे स्वयंपाकघर सोलारकरांच्या वाटणीला आले होते. सकाळी पाण्याची वेळ झाल्यावर पाणी आता प्रथम सोलारकरांच्या नळास येत असे आणि ती सर्व मंडळी अगदी आरामात नळ उघडे ठेवून झोपत असत. त्यांच्या घरातून पाण्याचा व घोरण्याचा आवाज येई पण बाकी इतरत्र पाण्याचा ठणठणाट शेवटी त्यांच्या दारावर ठोकून त्यांना उठवावे लागे. तेव्हां इतरांना पाणी मिळे. म्हणजे आमच्या मालकांची स्थिती खरोखरच "असुनी खास मालक घरचा पाणी ना तयाला" अशी व्हायची.

सोलारकरांना कितीही सांगितले तरी त्यांच्या दिनक्रमात फरक पडायला तयार नव्हता. आमचे मालकही पाकने कितीही खोड्या काढल्या तरी खलितेच पाठचणाऱ्या सहिष्णू भारतीय मनोवृत्तीचे त्यामुळे यावर आपणच काहीतरी करायला हवे म्हणून मी एक दिवस आमच्या महाविद्यालयातील प्लंबरला घरी आणून अंगणात एक नळ होता त्याला तोटी बसवून घेतली आणि घरात पाणी नेणाऱ्या नळीवर एक झडप बसवून

ती बंद करून घेतली. आता मालकांसकट सर्वांनाच बाहेरूनच पाणी भरायला भाग पडले कारण नाहीतरी सोलारकरांच्या आडमुठेपणामुळे मालकानाही पाणी मिळत नसे. या उपायाने सोलारकर वठणीवर नाही तरी सर्वांच्या पातळीवर आले. आता त्यांना बाहेरून पाणी भरणे जड जाऊ लागले त्यामुळे त्यांनी आतून नळ उघडा ठेवणार नाही अशी कबुली दिली आणि मग सर्वांनाच पाणी घरात भरता येऊ लागले.

पाण्याचा त्रास जरी थांबला तरी सोलारकर पतीपत्नींची भांडणे ही मालकांना मोठी डोकेदुखी होती. सोलारकरांना परोपरीने समजावून सांगितले तरी त्यांच्या भांडणसत्रात काही फरक पडत नव्हता. मुख्य म्हणजे त्यांचे भांडण म्हणजे मालकाना व आम्हाला डोकेदुखी असली तरी शेजारच्या वाड्यातील लोकांना मात्र ती अगदी फुकटात करमणूक झाली होती ते सर्व लोक त्यांच्या भांडणाची विडिओफिल्म असल्यासारखे हा प्रकार दररोज एंजॉय करायचे. त्यावेळी औरंगाबादला दूरदर्शन आले नव्हते. शेवटी मालकांनी बराच बाबापुता करून ती ब्याद कशीबशी घालवली आणि आम्ही सर्वच जरा शांतपणे जीवन कंठू लागलो.

आज त्या थोर सोलारकरांची आठवण लोटांगण्यांनी काढली आणि या सर्व प्रकारांची मला आठवण झाली. मी लोटांगणे यांना विचारले, "अहो पण तुम्हाला कशाला हवे आहेत आमचे सोलारकर? "

" काय सांगू साहेब सध्या ते माझ्याकडे भाडेकरू आहेत आणि त्यांच्या भांडणामुळे आम्ही सगळे आणि आमचे सगळे शेजारी त्रस्त आहेत, तेव्हां मला वाटले तुमचा आणि त्यांचा परिचय असेल तर तुम्ही चार शब्द सांगून बघितले आणि त्यांच्यात काही फरक पडला तर पाहावे. "

" बरका लोटांगणे, तुमचा माझ्यावर असलेला हा विश्वास असाच राहावा म्हणून या गोष्टीत मला लक्ष घालायला लावू नका. " मी त्यांना अगदी गोड शब्दात कटवले. अखेर लोटांगण्यानी आपले सार्वजनिक बांधकाम खात्यात असलेले वजन खर्च करून सोलारकरांना शासकीय सदनिकेत जागा मिळवून दिली आणि लोटांगण्यांची सुटका झाली. अर्थात त्यामुळे त्यांच्या शासकीय सदनिकेतील त्यांचे शेजारी मात्र त्यांच्या तावडीत सापडले आणि त्यांची सुटका सोलारकर सेवानिवृत्त झाल्यावरच झाली.

-----------------------

# १५. पाककलेची ऐशी तैशी!

अगदी पुराणकालापासून स्वयंपाकाचे काम स्त्रीवर पडले ते केवळ पुरुषाला शिकारीसाठी किंवा आजच्या परिस्थितीत अर्थार्जनासाठी बराच काळ घराबाहेर रहावे लागते या कारणामुळेच. आता मात्र स्त्रीलाही अर्थार्जनासाठी बाहेर पडावे लागत असल्यामुळे सध्या काही स्त्रिया अजूनही स्वयंपाक करतात ते केवळ ती जबाबदारी कधीकाळी अंगावर पडली होती म्हणूनच (आता ही गोष्टही भूतकाळातच जमा होऊ लागली आहे. आणि त्यामुळे क्षुधाशांतीगृहांना चांगलीच ऊर्जितावस्था आली आहे.,) काही समाजधुरिणांच्या मते आता स्वयंपाकघर ही केवळ शोभेचीच चीज रहाणार, कारण बहुधा नवराबायको दोघेही नोकरीवरून दमून भागून घरी परतल्यावर एकमेकाकडे खाऊ की गिळू म्हणत पाहण्या ऐवजी बाहेरून आणलेले पदार्थ ज्याठिकाणी खातात त्या जागेलाच ही संज्ञा प्राप्त होणार.

पण चाणाक्ष स्त्रीवर्गाने ही खरे तर पुरुषाचीच जबाबदारी हे सिद्ध करणे सहज शक्य असताना तसे करण्याचे टाळले ही आश्चर्याचीच गोष्ट. नाहीतर बल्लवाचार्य हा शब्दच मुळी पुरुषलिंगी आहे त्यामुळे स्वयंपाक ही तर पुरुषाची मक्तेदारी असायला हवी. अगदी अज्ञातवासात पांडव असताना सुद्धा विराटाकडे आचाऱ्याचे काम भीमाने म्हणजे एका पुरुषानेच केले होते. आणि त्यावेळी त्याने धारण केलेल्या बल्लव या नावामुळे बल्लवाचार्य

म्हणजे आचारी असे नामकरण झाले होते.अगदी दूरदर्शनच्या इतक्या वाहिन्यांवर पाककलेचे कार्यक्रम सादर करणारे पुरुषच दिसतात. अर्थात निरनिराळ्या वाहिन्या कोणासाठी हे कार्यक्रम प्रसारित करतात आणि हे कार्यक्रम पाहून प्रत्यक्ष स्वयंपाक कोण करणार आहे हे मात्र देवच जाणे! पण आश्चर्य म्हणजे आमच्यासारखे सर्वसाधारण पुरुष मात्र स्वत:ला स्वयंपाक येत नाही हे सांगण्यात लाज वगैरे बाळगत नाही उलट काही जण तर अगदी अभिमानानेच सांगताता, "आपल्याला नाही बुवा तसली भानगड आवडत. " पण जेव्हां तशी गरज पडते तेव्हां मात्र फटफजिती होण्याची पाळी येते याचा काही काळ तरी अनुभव मला आला.

मी नोकरीला प्रथम लागलो तेव्हां औरंगाबादला एकटा रहाण्याची पाळी आली तेव्हां जाणीव झाली की आपल्याला पाकशास्त्राची तोंडओळख तरी असायला हवी होती. झाली. कारण तेव्हां औरंगाबादमधील होटेल्स खरोखरच केवळ नाइलाज म्हणूनच जेवण्याच्या लायकीची होती. त्यात मांसाहार मला वर्ज्य त्यामुळे तोही प्रश्न उरला नाही. अगदी नाइलाज म्हणून कोठल्या तरी हॉटेलात मी जेवायला जायचो. माझे दुसरे दोघे खोलीतील जोडीदार नेहनी फिरतीवर असल्यामुळे नियमित खानावळीत जाणे त्याना आवश्यक नव्हते. त्याच वेळी माझा शिकणारा भाऊही माझ्या जोडीस आल्यावर प्रश्न आणखीच बिकट झाला कारण तो आल्यावर दोघांना खानावळीत जाणे त्यावेळी परवडणारे नव्हते.

सुरवातीला आम्ही डबा मागवण्याचा प्रयत्न करून पाहिला, कारण वेळेच्या उपलब्धतेनुसार डबा खाणे शक्य व्हायचे. त्यात आमचे रूम पार्टनर पांडे व कुटे असले तर त्यानुसार डब्याच्या सामग्रीत वाढ करणे शक्य व्हायचे पण डब्याचा दर्जा इतका सुमार होता की त्यामुळे सर्वांचीच पोटे बिघडायची. डबा आमच्या कॉलेजच्या मेसमधूनही मागवून पाहिला पण त्यालाही काही फार उत्साहजनकच काय पण कसलीच चव नव्हती.

त्यामुळे नंतर आम्ही घरीच स्वयंपाक करण्याचा प्रयत्न केला. त्यात पांडे सर्वात तज्ञ कारण ते बराच काळ एकटे राहिलेले. अजूनही त्यांचे लग्न झालेलेच नव्हते. पण त्याच्या प्राविण्याचा फायदा ते सदैव फिरतीवर असल्यामुळे व औरंगाबादला असतील तेव्हांही कामासाठी बाहेरच असायचे त्यामुळे होण्याची शक्यता नव्हती. तर कुटे यांनी अगोदरच हात वर करून त्यातले आपल्याला काही जमणार नाही असे सांगितले असल्यामुळे मुख्य भार मी व माझा भाऊ या दोघांवरच होता. आणि तसे मुख्य जेवणारेही आम्हीच होतो.

एकदा स्वयंपाक करायचे म्हटल्यावर अक्षरश: संन्याश्याच्या लग्नाला शेंडीपासून तयारी करणेच भाग पडले. त्यामुळे त्यावेळी पहिल्यांदा आम्ही पितळी कुकर घेतला. प्रेस्टिज अथवा हॉकिन्स कुकर घेतला आणि आमचा स्वयंपाकाचा बेत ओम फस झाला तर इतके पैसे पाण्यात जायचे या विचाराने ! शिवाय त्या वेळच्या आर्थिक परिस्थितीचाही विचार करता

पितळी कुकरच घेणे योग्य होते, तो लावायचा कसा याविषयी मी, माझा भाऊ व कुटे(त्यावेळी फिरतीवर नसल्यामुळे हजर होते. ) यांच्यात चर्चा सुरू झाली. कुटे यांच्या मते कुकरमध्ये पाणी घालायचे व कोरडे तांदूळ पातेल्यात ठेवून ते पातेले कुकरमध्ये ठेवून कुकर बंद करायचा व शेगडीवर ठेवायचा कुकरमध्ये घातलेल्या पाण्याच्या वाफेवर पातेल्यातील भात शिजतो.

मला याविषयी जरा शंका वाटत होती तरी अश्या वेळी दुसऱ्यावर विश्वास ठेवण्याच्या माझ्या स्वभावानुसार मी कुट्यांचे मतच ग्राह्य मानले. पांडे नसल्यामुळे तज्ञाच्या अभावी अर्धतज्ञ कुटे यांच्या सल्ल्यानुसार भात कुकरमध्ये लावण्यात आला. कुटे यांच्या बाबतीत आतापर्यंत माझा अनुभव अतिशयोक्तीचा होता. पण या बाबतीत त्यांनी ऊनोक्ती करायचे ठरवले असेल असे वाटले नव्हते, कारण कुकरमधून बरीच वाफ बाहेर पडल्यावर आम्ही कुकर उघडल्यावर "चौदाशे वर्षे जगून चांगदेव अखेरीस कोराच" तसे बऱ्याच वाफ दवडूनही भात अखेरीस कोरडाच आढळला! त्यावेळी आम्हा तिघाच्या डोक्यात प्रकाश पडला की तांदळाच्या पातेल्यातही पाणी घातले पाहिजे. अर्थात ती सुधारणा करताना मात्र जरा अतिशयोक्ती झाल्यामुळे भाताची खीर झाली.

त्यानंतरचा धडा पोळ्या करण्याचा होता. कणीक भिजवण्याची युक्तीही अशीच पाण्याचे बरेच प्रयोग केल्यावर लक्षात आली. सुरवातीस

भरपूर पाणी घालणे आवश्यक आहे ही समजूत होती कारण सांगकाम्याच्या गोष्टीतील सांगकाम्या पहिल्या वेळी गिरवलेला धडा दुसऱ्यावेळी गिरवताना जसा फजित होतो तीच परिस्थिती आमची झाली होती. भात करताना पाणी कमी पडले ही गोष्ट चांगलीच लक्षात राहिल्यामुळे ती चूक कणीक मळताना करायची नाही हे इतके पक्के ध्यानात ठेवले की सुरवातीस कणकेची लापशीच झाली.

खरे तर तीच जरा आटवली असती व त्यात तिखट मीठ घातले असते तर भात आणि भाजी दोन्ही करण्याचा त्रास वाचला असता. पण आम्ही तसे न करता त्या लापशीत कणीकच वाढवत बसलो आणि ती पोळया करण्याइतकी घट्ट झाली होती तोपर्यंत त्या गोळयाचा आकार चांगला फूटबॉलएवढा झाला होता. त्याच्या पोळया करत बसलो असतो तर सहज एकादा महिना पोळया करतच बसावे लागले असते आणि सगळया आमच्या वसाहतीतील रहिवाशांना पुरतील इतक्या पोळया झाल्या असत्या, म्हणजे आम्ही करू शकलो असतो, आणि त्यानंतर बाकीचे रहिवासी खाऊ शकले असते हे अध्याहृत धरले तर! ती गोष्ट पुढचीच कारण अगोदरच त्यात एक अडचण होती ती म्हणजे आता पोळया लाटायच्या कश्या (ती गोष्ट भूखंडाचे श्रीखंड लाटण्याइतकी सोपी नव्हती) अर्थात यावर चर्चा सुरू झाली.

कुटे यानी अगोदरच भाताचा निकाल लावल्यामुळे व धाकट्या भावावर एकदम जबाबदारी टाकणे योग्य नव्हे म्हणून मीच याबाबतीत पुढाकार घ्यायचे ठरवले आणि पोळया लाटण्यासाठी अगोदर फूटबॉलच्या चेंडूतला एक छोटा गोळा काढून घेतला मग आई जशी प्रथम पिठीचा शिडकावा पोळपाटावर करते तसाच शिडकावा नाजुक हाताने करून त्या गोळयावर लाटणे फिरवायला सुरवात केली व त्यात इतका रंगून गेलो की फिरवता फिरवता गोळा अगदी लाटण्याशी एकरूप झाल्यावर त्याची पोळी म्हणजे एक कणकेची लांबलचक पट्टी तयार झाली आणि ती लाटण्याशी इतकी एकरूप झाली की लाटण्याशी जमलेली तिची गट्टी सोडवता सोडवेना, शेवटी त्यांची एकरूपता ती पट्टी खरडूनच सोडवणे भाग पडले व खरडल्यावर झालेले तुकडे पोळी म्हणून वापरात येणे शक्य नव्हते, यासाठी पोळीची गोळी मधून मधून लाटण्यापासून सोडवून उलटी करून परत तिला पिठीचा थोडा खुराक द्यावा असे ठरले.

या पद्धतीत आम्ही बरेच यशस्वी ठरलो व जरी आकाराने पोर्तुगाल, स्वीडन किंवा नॉर्वे अश्या माहीत नसलेल्या किंवा अगदी परिचित म्हण्जे भारताच्या नकाशाशी सदृश आकार पोळपाटावर बनविण्यात आम्ही यशस्वी ठरलो. हे नकाशे भूगोलाच्या उत्तरपत्रिकेत इतक्या सहज पणे काढणे जमले नव्हते याची तेव्हां आठवण झाल्यावाचून राहिले नाही. त्यानंतरची पुढची पायरी म्हणजे तो आकार तव्यावर टाकून भाजून काढणे. अर्थात

त्यासाठी त्या आकाराची पोळपाटापासून मुक्तता करणे आवश्यक होते. यावेळी कणकेची गुंडाळी लाटण्यापासून दूर ठेवण्यात आम्ही यशस्वी ठरलो तरी पोळपाटापासून त्या आकाराची मुक्तता करणे आवश्यक होते. यावेळी त्या नकाशाने पोळपाटाशी इतकी घट्ट मैत्री केली होती की त्याना अलग करणे हे "हमारे बसकी बात नही थी " अर्थात याही वेळी लाटण्यापासून कणकेच्या पट्टीची मुक्तता करताना वापरलेला उपायच अमलात आणावा लागला. कारण "सर सलामत तो पगडी पचास" सारखे पोळपाट लाटणे सलामत तो पोळी पचास"! या फूटबॉलमध्ये पोळी पचासच काय हजारदेखील होण्याची शक्यता होती फक्त त्या कोणी करायच्या हाच प्रश्न होता. तिसऱ्या प्रयत्नात विचित्र आकाराचा का होईना एक तुकडा पोळपाट व लाटण्रे या दोन्हीवरही प्रेम न करणारा आम्हाला मिळाला. अर्थातच त्याची रवानगी तापल्या तव्यावर झाली. इतक्या काळात तवा एवढा खरपूस तापला होता की तो तुकडा त्याच्या सहवासात जाताच कापरासारखा भुरकन जळून गेला तेव्हा तव्याखालील स्टोव्हची आग कमी करायला हवी ही गोष्ट आमच्या लक्षात आली.

त्यापुढील प्रयोगात पोळपाट लाटणे या दोन्हीशी फारसा लगट न करणारा भारताचा नकाशा बनवण्यात आम्हाला यश आले व तो तव्यावरही सुखाने नांदू लागला त्यामुळे आमचा आनंद गगनात मावेना परंतु तो अधिक काळ तव्यावर फक्त एकाच बाजूने राहू देणे अयोग्य होते हे समजण्याइतके

सामान्य ज्ञान आम्ही पैदा केलेले नव्हते व आता त्या तुकड्याची मैत्री तव्याबरोबर झाली होती त्यामुळे त्या दोघांना एकमेकापासून वेगळे करण्यात आमचे हात बरेच भाजून घ्यावे लागले शेवटी त्याला तव्यावर पालथे करून आमच्या कष्टाचे चीज करणारा शेवटचा क्षण म्हणजे आम्ही तयार केलेली पहिली पोळी लाटणे, पोळपाट व तवा या सर्व मित्रमंडळींचा निरोप घेऊन आमच्या ताब्यात आली तेव्हां आमच्या हातात आलेल्या त्या पदार्थास काय नाव द्यावे याविषयीच आमच्या मनात संभ्रम उत्पन्न झाला. त्याच्याकडे पाहून "तुज सगुण म्हणू की निर्गुण रे" या अभंगातील "तुज साकार म्हणू की निराकार रे "या ओळीची आठवण झाली.. फूटबॉलच्या काही भागाचे विविध नकाशे बनवून आम्ही त्याचा काही भाग तसाच राखून ठेवला व त्यानंतर भात व पोळी नामक पदार्थांच्या जोडीस काय खाता येईल याचा विचार करू लागलो.

आता आमटी व भाजी यापैकी एका किंवा दोन्ही पदार्थांची निर्मिती करण्याचा धाडसी बेत आम्ही आखला. आमटी हा प्रकार तुलनेने सोपा असेल अशी आमची समजूत पण त्यासाठी दाळ शिजवणे ही पूर्वतयारी आवश्यक होती व कुकर लावताना भाताचीच जी दुर्दशा आम्ही केली होती त्यात आणखी दाळीची भर घालण्याची आमची इच्छा नव्हती. दाळीतही पाणी घालावे लागेल इतके ज्ञान मात्र आम्ही संपादन केले होते. आणि ते पुढे उपयोगी पडलेच पण त्यासाठी आता पुन्हा कुकर लावणे

आवश्यक होते म्हणजेच आणखी किती वेळ लागेल याविषयी आम्ही अज्ञ होतो त्यामुळे कणिकेचे कडक तुकडे भातासह कसे खायचे याचा विचार आम्ही करू लागलो कारण भाजी करण्यासाठी भाजी आणण्यापासून सुरवात करावी लागली असती. अश्या वेळी "आपण मस्तपैकी पिठले करू "असे उद्गार कुटे यांनी काढल्यामुळे पिठल्यातील ते माहीतगार व्यक्ती असावेत असा आमचा गैरसमज झाला.

आम्ही वडील धारी माणसे काम करत असल्याने मध्ये बोलणे भावाला योग्य वाटले नसावे. कारण तसे तो घरी राहून आईला मदत करून थोडासा माहीतगार झाला होता पण त्याने मौन धारण केले होते. सुदैवाने हरभरा दाळीचे पीठ घरात होते. ते तिखट मिठासह पाण्यात मिसळायचे आणि ते पाणी गरम करून अगदी घट्ट करायचे की पिठले झाले अशी माहीतगार कुटे यांची व बिनमाहितगार मी अश्या दोन बुजुर्गांची कल्पना होती. त्याप्रमाणे आम्ही तयारीला लागलो असताना भावाने "त्याला फोडणी पण करावी लागते ना? "असा बॉबगोळा टाकला. फोडणी हा प्रकार स्वैंपाकात असतो पण तो कोणत्या स्टेजला वापरायचा असतो आणि त्यासाठी काय लागते आणि काय करावे लागते याविषयी आम्ही दोघे माहीतगार अगदीच अनभिज्ञ होतो त्यावर त्याने "आई तापलेल्या तव्यात तेल टाकून त्यात हिंग, जिरे, मोहरी असे पदार्थ टाकते व त्यांचा तड तड असा आवाज आल्यावर त्यावर अगोदर पाणी टाकून मग त्यात हळू हळू

गरजेप्रमाणे पीठ मिसळते म्हणजे मग पिठले तयार होते अशी आमच्या ज्ञानात भर टाकली. पिठले काय किंवा आमटी काय किंवा भाजी काय या गोष्टींना चव या फोडणीमुळेच येते. ही माहिती एवढीच आमची पूर्वतयारी होती. भावाच्या या सुधारित पद्धतीने मग आमचा पिठले करण्याचा बेत सिद्धीस गेला अर्थातच फोडणीवर पाणी टाकताना त्यातील काही भाग हातावर येऊन हात भाजणे, पीठ टाकताना ते नीट न मिसळता त्याचे गोळे होणे त्यातील काही भागातच तिखटाचे तर काही भागातच मिठाचे अंश सापडणे असे किरकोळ अपघात वगळता गरमागरम पिठले कढईत दिसू लागले व अश्या पाकसिद्धीनंतर आम्ही तिघे त्या तीन पदार्थाचा आस्वाद घेण्यास सज्ज झालो.

कुकर असल्यामुळे कुट्यांच्या पद्धतीत सुधारणा केल्यावर त्या सुधारणेचा जरा अतिरेक झाल्यामुळे भात पिठल्याशिवायही खाता येण्याइतका पातळ झाला होता. पण पिठल्यामुळे त्याला बरीच चव आली हे निश्चित. आमची खरी पंचाईत झाली आम्ही तयार केलेले कणकेचे नकाशे पोळया म्हणून खाताना. कारण ते अपेक्षेपेक्षा अधिकच कडक झाले होते. परंतु एक पोळया सोडल्या तर बाकीच्या स्वयंपाकात आम्ही थोड्याच दिवसात तरबेज झालो. म्हणजे अगदी "आम्ही सारे खवैये " मध्ये भाग घेण्याच्या लायकीचे झालो पण त्यावेळी दुरदर्शन फारच दूर होते आणि त्यामुळे बरेच प्रेक्षक (की दर्शक) बचावले.

# १६. ब्रह्माचा शोध

ब्रह्म हा शब्द प्रथम कानावर अगदी लहानपणी पडला त्याचे कारण आमच्या गावात घडणारा कीर्तन महोत्सव. बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे औंध संस्थानचे राजे होतेच पण त्याचबरोबर दोन गोष्टींबद्दल प्रसिद्ध होते. त्यातील एक म्हणजे सूर्यनमस्कार. आचार्य अत्रे यांनी सूर्यनमस्काराचे विडंबन आपल्या ' गुरुदक्षिणा ' नाटकात केल्याबद्दल बाळासाहेब हयात असेपर्यंत त्याना औंधात प्रवेश नव्हता. तो बाळासाहेब गेल्यावरच "श्यामची आई’ सिनेमा काढण्यासाठी त्याना करता आला. असो! आणि दुसरी गोष्ट त्यांची कलांची आवड. त्यात चित्रकला, मूर्तिकला, याबरोबर कीर्तनाचा समावेश होता, आषाढ महिन्यात महिनाभर औंधात कीर्तनमहोत्सव चालायचा. त्या कीर्तनास आमच्यासारखी (त्यावेळी)लहान (असलेली)मुले गेली तरी त्यांचे स्वागत असे फक्त आम्ही त्या कीर्तनात काही गोंधळ केला तर मात्र आमची उचलबांगडी होत असे.

या कीर्तनात एकदा एका कीर्तनकाराने एक गोष्ट सांगितली. त्या गोष्टीत संत रामदास (किंवा दुसरे कोणी संत असतील)एका गावात राहिले असता तेथील एका मंबाजीबोवांना त्यांची परीक्षा घ्यायची लहर आली व त्यांनी आपल्या एका शिष्याला एक मोकळी वाटी देऊन स्वामींच्याकडे

पाठवले आणि निरोप पाठवला, " महाराज कृपया या शिष्याबरोबर वाटीभर ब्रह्म पाठवून द्यावे' यावर रामदास यानी शिष्याबरोबर निरोप पाठवला "अवश्य महाराज, पण त्यासाठी वाटी रिकामी करून पाठवावी. "

वाटीभर ब्रह्म म्हटल्यावर आमच्यासारख्या पोरांना बहुधा हा बासुंदी अथवा सुधारस असा पदार्थ असावा असे वाटून नाही म्हटले तरी असे पदार्थ त्या काळी क्वचितच म्हणजे अगदी सणावारीच मिळत असल्याने त्या आठवणीने तोंडाला पाणी सुटते न सुटते तोच समर्थांचे उत्तर ऐकल्यावर एकदम फुसकन आमच्या मनोरथातील हवा निघून जायची शिवाय वाटी मोकळी असून ती मोकळी करून पाठवावी असा निरोप समर्थानी पाठवावा व त्यामुळे त्या मंबाजीबोवांची फजिती व्हावी त्या अर्थी ब्रह्म म्हणजे हवेसारखा पदार्थ असावा अशी समजूतही झाली

त्यानंतर आत्तापर्यंत वाटीभरच काय पण चमचाभर ब्रह्माचीही आवश्यकता न पडल्यामुळे कोणाकडे ब्रह्म मागण्याची पाळी आली नाही पण घरातही वडील कीर्तनकार असल्यामुळे त्यांच्याकडून तरी ब्रह्मप्राप्ती नाही झाली तरी ब्रह्म या शब्दाचा अर्थ कळेल असे वाटत होते. पण कीर्तन करताना शान्तिब्रह्म वाटणारे वडील मी असा प्रश्न विचारल्यावर कसा प्रतिसाद देतात याविषयी मी साशंक होतो.

माझे आवडते शिक्षक कदाचित या प्रश्नाचे उत्तर देतील अशी आशा करून त्यांना मी धीर करून विचारण्याचे ठरवले. यांचा उल्लेख

“माझा मराठाचि “ या लेखात केला आहे पण पुनरावृत्तीचा दोष पत्करून पुन्हा करतो. हे शिक्षक स्वत:स कवी समजत व प्रत्येक वर्षी वर्गातल्या सगळ्या मुलांची नावे एकत्र गुंफून कविता करणे हा त्यांचा छंद व तीच त्यांची कवितेची मोठी मजल. एकदा त्यानी "बापूजींनी बांना आश्रमातील लोकांची काळजी घेण्यास सांगितले" याचा अर्थ बापूजींनी आपल्या बापाला आश्रमातील लोकांची काळजी घेण्यास सांगितले "असा सांगितला व मी स्वत:स वर्गातील शहाणा मुलगा समजत असल्यामुळे त्यांना "अहो मास्तर(त्यावेळी गुरुजी म्हणण्याची पद्धत नव्हती) बा म्हणजे बाप नाही तर बा म्हणजे कस्तुरबा" अशी दुरुस्ती सुचवल्यावर त्यानी माझी ही समजूत, आणि वर्गातला हुषार विद्यार्थी ही माझ्याबद्दलचीही त्यांची व माझीही समजूत चुकीची ठरवून "गप्प बस उगीच काही तरी बडबडू नकोस, बा म्हणजे बापच " असे म्हणून मलाच वेड्य़त काढले आता बा म्हणजे बापच अशी ठाम समजूत असणाऱ्या गुरूकडून ब्रह्मज्ञान मिळवण्याची शक्यता बाळगणे म्हणजे ज्ञानदेवांचे रेड्याच्या तोंडून वेद बोलविण्याचे चमत्कारकौशल्य माझ्या अंगी असण्यासारखेच होते आणि तसे ते असते तर ब्रह्म म्हणजे काय हे मीच इतरांना शिकवू शकलो असतो. म्हटल्यावर त्यांच्याकडून ब्रह्मज्ञान होण्याची शक्यता मावळली..

शेवटी त्या कीर्तनकारासच गाठावे असे मी ठरवले कारण त्यांचा मुक्काम महिनाभर गावातच असे. ते अंघोळीसाठी तळयावर निघाले असता

मी वाटेत त्यांना गाठले व विचारले, "बुवा एक प्रश्न विचारू का? " मास्तरांचा मुलगा म्हणून बुवांना माझी माहिती होती व कधी कधी आमच्या घरी त्याना जेवायलाही बोलावले जायचे त्यामुळे त्यांनी माझ्याकडे दुर्लक्ष केले नाही उलट "अरे वा वा विचार ना बाळ" असे म्हणून उत्तेजनच दिले. त्यामुळे उत्साहित होऊन त्यांना विचारले "कालच्या कीर्तनात रामदास स्वामींची जी गोष्ट तुम्ही सांगितली त्यात वाटीभर ब्रह्म हा काय प्रकार आहे आणि वाटी रिकामी असताना ती मोकळी करून पाठवा असे उत्तर स्वामींनी का दिले? "

माझ्या या प्रश्नावर बुवा काही काळ विचारात पडले आणि मग म्हणाले, "बाळ तू अजून लहान आहेस ब्रह्म म्हणजे काय हे इतक्या लहान वयात समजणे अवघड आहे. " पुढे त्यांनी तुझ्या वयाला योग्य असा प्रश्न विचार असे म्हटले नाही, नाही तर बाल पु. ल. देशपांडे यानी न. चिं. केळकरांनी त्याना तसेच सांगितल्यावर "आज बाजारात आंब्याचा भाव काय? " असा उलट प्रश्न विचारण्याचे जे धाडस केले तसे मला करावे लागले असते व तसे ते माझ्या अंगी नसल्यामुळे संवाद इथेच संपला. अर्थात ब्रह्म म्हणजे काय हे समजण्याची एकुलती एक आशाही मावळली.

तरी ब्रह्म हा शब्द मात्र कानावर पडायचे राहिले नाही. कधी कधी आईसुद्धा मी फार बडबड करून बाकी काम मात्र काडीचे करत नसल्यामुळे मलाच उद्देशून "लोकां सांगे ब्रह्म ज्ञान आणि आपण कोरडा पाषाण "म्हणे

तर कधी मी केलेले (की बिघडवलेले) काम पाहून केलास का सगळा ब्रह्म घोटाळा असे उद्गार काढे. म्हणजे मी केलेला घोटाळा चांगला की वाईट कारण ब्रह्मज्ञान म्हणजे चांगलेच असणार पण घोटाळा चांगला कसा असणार असा प्रश्न विचारून आईचे "चल फाजिल कुठला" हे ब्रह्मवाक्य ऐकून पळ काढणे एवढेच माझ्या हातात होते.

त्यानंतर एका अद्भुत कथेत एक ब्रह्मराक्षस भेटला तर मुंजीत एकदम भलत्याच ठिकाणी ब्रह्म भेटले ते म्हणजे जानव्याला मारतात ती गाठ तिला ब्रह्मगाठ म्हणतात. असे कळले. व जी कधीच सोडवता येत नाही ती ब्रह्म गाठ हे त्यावेळी कळले आणि लग्नाला ब्रह्म गाठ का म्हणतात हे कळले पण हल्ली ही ब्रह्मगाठ फारच सैल झालेली दिसते किंवा तशी न मारताच जोड्या एकत्र राहून त्या गाठीचा जाचच होऊ देत नाहीत. पुढे जेव्हां जेव्हां ब्रह्म या शब्दाला अडखळलो तेव्हा त्याचा जोडशब्दच महत्वाचा आहे असे मानत गेलो उदाहरणार्थ "लोकां सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण" या म्हणीतील ब्रह्मज्ञान म्हणजे काहीतरी शहाणपणाचा प्रकार असेल असेच मी समजून चाललो

याहूनही इतर बरेच गहन प्रश्न त्या काळात माझ्या बालबुद्धीला सतावत असल्यामुळे वाटीभर ब्रह्मासाठी जीव आटवण्याची आवश्यकता भासली नाही. त्या वयात हा प्रश्न पडायचे कारणही नव्हते शिवाय वडील आणि शिक्षकांनी ते माझ्या आवाक्यातले काम नाही असे एकदा मला

पटवल्यावर रामरक्षा, भगवद्गीता यांचे पाठांतर झाले तरी ते संस्कृत असल्यामुळे त्यातले बरेच शब्द कळण्याची जशी आवश्यकता नव्हती तसेच "ब्रह्म" शब्दाचे झाले. ब्रह्म हा शब्द ज्याच्या मागे किंवा पुढे लागतो ती त्या प्रकारची उच्च स्थिती समजावी उदा: ब्रह्मानंद किंवा नादब्रह्म व त्यामुळे मोठेपणीही बायकोचा शब्द म्हणजे ब्रह्मवाक्य शिवाय मी जे काही करावयास जातो तो ब्रह्मघोटाळा हे तिनेच पढवल्यामुळे ब्रह्माची अधिक चौकशी करण्याचे फारसे मनावर घेतले नाही मुख्य म्हणजे ब्रह्म म्हणजे काय हे न कळताच माझे आयुष्य अगदी सुरळीतपणे चालले होते. "ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या " असे बऱ्याच ठिकाणी उल्लेखलेले पाहिल्यावर तर एकदा जगच मिथ्या असल्यावर ब्रह्म म्हणजे हे कळून तरी काय उपयोग असा सूज्ञ विचार मी केला...

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष
# श्री श्याम कुलकर्णी यांचे हे चौथे पुस्तक.

श्री श्याम कुलकर्णी हे इंजिनियरिंगचे शिक्षक. पण त्यांचे खरे गुरू पुलं च. समोरच्या परिस्थितीने कितीही छळ करायचे म्हटले तरी त्यातली विसंगती शोधून हे स्वतःचे मन रिझवणार आणि भोवतालालाही अपल्या खुसखुशीत विनोदाने मजेत ठेवणार. त्यांच्या लेखनातला विनोद हा दर्जेदार, नेमका आणि अत्रेंनी विनोदातल्या व्याकरणात ज्याला सर्वोच्च म्हटले आहे त्या प्रकारचा. याचे कारण त्यांचा बहुतांश विनोद हा स्वतःचीच खिल्ली उडवणारा असतो. किंचित अतिशयोक्तीची फ़ोडणी असेल, पण मुख्य गाभा वास्तवातल्या विसंगतीचा. कार्टुनिस्ट लक्ष्मण सांगत की इथले राजकारणी मला कधीच विषयांची कमी पडू देत नाहीत. पण श्यामजींना तर घरी दारी देशो देशी सर्वत्र विनोदाचे विषय येऊन स्वतःच भेटतात.

श्री. श्याम कुलकर्णी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३६), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे

(ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(१९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(९), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(४), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अरुण कुळकर्णी(११) अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक, मंगेश चौधरी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची दोन धमाल विनोदी आणि एक स्त्रीमनाचा वेध घेणारं अशी तीन पुस्तकं. यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा. (इंटरनेट पाहिजे हो. नाहीतर उघडणार नाही)







